२४ डिसेंबर १९६६ : चाळीस पैसे



साप्ताहिक

# माणूस

गोमंतकाचे अनभिषिक्त राजे श्री. दयानंद बांदोडकर



**मंगेशी** निसर्गरम्य गोमंतकातील शंकराचे हे जागृत कुलदैवत. सोळाव्या शतकात पोर्तुगीजांनी हिंदूंची देवस्थाने नष्ट करण्याचा सपाटा चालू केल्यावर, सासष्टातील कुडस्थाळ या गावी असलेली ही मंगेशाची पिंड तेथील धर्मभक्तांनी गुपचुप पळवून प्रियोळ या गावी आणली आणि तेथेच त्याची पुनर्स्थापना केली.



चारशे वर्षे तेथील गोमंतकीय जनतेप्रमाणेच पारतंत्र्याच्या काळ्या ढगात असणारे हे 'जागृत कुलदैवत' आज मात्र वैभवात नांदत आहे.





## एक समग्र साप्ताहिक

वर्ष : सहावे
अंक : पंचवीसावा
किंमत : चाळीस पैसे
वार्षिक वर्गणी : वीस रुपये

**संपादक**
श्री. ग. माजगावकर

**संपादक मंडळ**
अ. मा. साधू
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

**व्यवस्था विभाग**
अ. वा. गंधे
अ. वि. गणपत्ये

पत्ता – ४१९ नारायण, पुणे २.
दूरध्वनी – ५७३५१


प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

# पत्रमैत्री

स. न. ४ डिसें.

मी 'माणूस'चा वाचक आहे. त्यामुळे मी आपणास प्रेमळ सूचना देत आहे. आपल्या अलीकडील दोन-चार अंकांपासून 'माणूस'चे आकर्षण कमी होत आहे. 'हंसा वाडकर' लेखमाला एकदम बंद करणे 'नारायण धारप' (यांच्या कथा) 'निवडक रुपाय कथा', 'सुभाषचंद्र, चर्चिल, स्टालीन' आदी पुरुषांचा जीवनचित्रपट 'नाझी भस्मासुर' सारखी जोरदार लेखमाला सुरू करणे. ही सदरे चालू केली तर 'माणूस'मध्ये जोम येईल.

स्पष्ट लिहिल्याबद्दल क्षमा असावी.

शा. आ. मोरे

स. न. ११ डिसें.

दहा डिसेंबरच्या 'माणूस'मध्ये माझी कविता प्रसिद्ध केल्याबद्दल आभार. असो. अंक व कात्रण मिळाले.

हंसा वाडकर यांच्या आत्मनिवेदनातील प्रांजलपणामुळे त्यांची आत्मकथा मनाचा ठाव घेते. माणूस म्हणून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला वेगळीच किनार लाभते. हा प्रांजलपणा मराठीत सापडणे आज काल फार दूर्मिळ झाले आहे. कळावे. लोभ असावा, ही विनंती.

ह. शि. खरात

# निर्णायक लढाईच्या रोखाने पाटलांची पावले

मुंबईला धावती भेट देऊन कृष्ण मेनन दिल्लीला परतले आहेत. ईशान्य मुंबई मतदारसंघातून आपण उमेदवार म्हणून निवडणूक लढवावी किंवा नाही व लढविल्यास कोणते फलित हाती येईल याचा अंदाज बांधण्यासाठी ते मुंबईला गेले होते. साहजिक ते आपला निर्णय मुंबईतच जाहीर करतील, अशी अपेक्षा होती. आणखी आठ-दहा दिवस थांबा, असे मुंबईकरांना सांगून ते येथे आले. तीन मूर्ती मार्गावरल्या मेनन यांच्या निवासस्थानी वार्ताहरांची फारशी वर्दळ नसते. सध्या मात्र मेनन कोणाची भेट घेतात, ते आपला निर्णय केव्हा जाहीर करणार आहेत. त्यांच्या निर्णयास काँग्रेस श्रेष्ठांपैकी कोणाकोणाचा आशीर्वाद मिळणार आहे याची माहिती मिळावी म्हणून मेनन यांच्या बंगल्याभोवतालची वार्ताहरांची ये-जा वाढली आहे. यांत परदेशी वार्ताहरांचाही समावेश आहे.

नेहरूंच्या निधनानंतर पाटील आणि मेनन या टोकाच्या प्रवृत्ती एकत्र राहणे शक्यच नव्हते. या दोघांपैकी एकाला पक्षत्याग करण्यावाचून गत्यंतर नाही. आणि पाटील यांच्यामागे पक्षातील काही बडे महाभाग असल्यामुळे पक्षत्याग करण्याची पाळी मेनन यांच्यावर आली आहे. मागच्या दोन निवडणुकांमध्ये मेनन यांना उत्तर मुंबई मतदारसंघातील तिकिट देण्यास नेहरू यांचे दडपण कारणीभूत होते, असे पाटलांनी नुकतेच जाहीर केले आहे. मुंबई प्रदेश काँग्रेसशी मेनन नेहमीच फटकून वागले व त्यामुळे त्यांना या वेळी तिकिट न देण्याचे आम्ही बरेच दिवस अगोदर ठरविले, असेही पाटलांनी सांगून टाकले आहे.

याउलट उभा राहीन तर उत्तर मुंबईतूनच, अशी आग्रही भूमिका मेनन यांनी स्वीकारली आहे. देशातील दुसऱ्या कोणत्याही मतदारसंघातून उभा राहण्यास



जर मी पात्र असेन तर उत्तर मुंबईबाबत अपवाद कसा करता येतो, असा सवाल त्यांनी काँग्रेस श्रेष्ठांना विचारला होता. मुंबई प्रदेश काँग्रेसच्या इतर आरोपांनाही त्यांनी उत्तरे दिली आहेत. अशा रीतीने काहीही झाले तरी मेनन यांना उत्तर मुंबईचे तिकिट देणार नाही, अशी पाटलांची भूमिका व उभा राहीन तर उत्तर मुंबईतूनच, असा मेनन यांचा हटवाद असा संघर्ष निर्माण झाला. मध्यवर्ती निवडणूक समितीत पाटील यांच्या पाठिराख्यांचे बहुमत झाल्यामुळे मेनन यांचा पाठपुरावा करणाऱ्या कामराज, इंदिरा गांधी, यशवंतराव चव्हाण प्रभृतींना मेनन-प्रकरणी पाटलांपुढे पराभव स्वीकारावा लागला.

मेनन यांनी अपक्षीय उमेदवार म्हणून निवडणूक लढविल्यास आपण त्यांना पाठिंबा देऊ असे कम्युनिस्ट पक्षाचे अध्यक्ष श्री. अ. डांगे यांनी जाहीर केले आहे. मेनन यांना माझा का विरोध आहे, हे आता तरी समजून यावयास हरकत नाही, अशी त्यावर पाटलांनी मल्लिनाथी केली आहे. मेनन अपक्षीय उमेदवार म्हणून उभे राहिले तर पंचाईत होणार आहे ती कामराज व इंदिरा गांधी यांची. कारण मुंबई-तील काँग्रेसच्या प्रचार मोहिमेचा शुभारंभ कामराज व इंदिरा गांधी यांच्या हस्ते करण्याचा पाटलांचा विचार आहे. हे दोघेजण मुंबईस आले तर मेनन यांच्या विरोधी प्रचारमोहिमेत त्यांना सहभागी व्हावे लागणार आहे. पाटलांची विनंती नाकारणेही त्यांना जड जाणार आहे. मेनन यांच्या निर्णयाला अखिल भारतीय व काही प्रमाणांत आंतरराष्ट्रीय महत्त्व प्राप्त झाले ते या कारणामुळे. शत्रूप्रमाणेच मित्रांनाही मेनन अडचणीत टाकतात ते हे असे.

सरदार पटेल यांचे सहकारी म्हणून स्वातंत्र्यपूर्व काळात पाटील ओळखले जात

असत. परंतु पाटलांचे सारे गुणदोष सरदारांना माहीत असल्यामुळे १९४७ मध्ये पहिले मंत्रिमंडळ बनविताना पटेलांनी स. का. पाटलांना चार हात दूर ठेवले. पाटलांचे मुंबईतील प्रस्थ वाढले ते सरदार पटेल यांच्या निधनानंतरच. पाटील मुंबईचे महापौर झाल्यानंतर त्यांनी त्या वेळच्या मुंबई राज्याचे मुख्यमंत्री मोरारजी देसाई यांनाही मुंबई शहराच्या राजकारणात प्रवेश करू दिला नाही. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस व गुजरात प्रदेश काँग्रेस या दोघांपासून मुंबई काँग्रेस स्वतंत्र ठेवण्यात ते यशस्वी ठरले. याच काळात पं. नेहरूंशी मिळते घेण्याचे धोरण चाणाक्ष पाटलांनी स्वीकारले. त्याचा फायदा असा झाला की १९५६ च्या अखेरीस मोरारजीभाई केंद्रीय मंत्रिमंडळांत आल्यानंतर थोड्याच दिवसांच्या आत पाटीलही दिल्लीस येऊन दाखल झाले आणि गंमतीचा योगायोग असा की पाटील आणि मोरारजीभाई या दोघांनाही कामराज योजनेनुसार केंद्रीय मंत्रिमंडळातून बाहेर पडावे लागले.

पं. नेहरूंच्या निधनानंतर शास्त्रीजींनी प्रधानमंत्रिपदाची जबाबदारी स्वीकारली व पाटलांचा पुन्हा मंत्रिमंडळात प्रवेश झाला. प्रधानमंत्रिपदाची महत्त्वाकांक्षा असलेल्या मोरारजीभाईंनी मात्र 'क्रमांक १' ही मानाची जागा मिळत नसेल तर मंत्रिमंडळात येत नाही असे कळविले. शास्त्रीजींच्या आकस्मिक निधनानंतर पुन्हा प्रधानमंत्रिपद रिकामे पडले व या वेळी ही निवडणूक लढविण्याचे मोरारजीभाईंनी ठरविले. पाटील यांनी इंदिरा गांधी यांना पाठिंबा देण्याचे ठरविले आणि त्यामुळे मोरारजीभाईंना एकाकी निवडणूक लढवावी लागली. आपले हे कर्तृत्व ध्यानी घेऊन इंदिरा गांधी यांच्या मंत्रिमंडळातल्या आतल्या गोटात आपल्याला प्रवेश मिळेल, अशी पाटलांची योजना होती. परंतु त्याबाबत लवकरच त्यांचा भ्रमनिरास झाला. अशोक मेहता, दिनेशसिंग व सुब्रह्मण्यम यांच्या तंत्रानेच बाई वागतात ही तक्रार ते निकटवर्तीयांजवळ बोलून दाखवू लागले. श्री. यशवंतराव चव्हाण यांची गृहमंत्रिपदावर नेमणूक झाल्यानंतर तर पाटलांनी कामराज-इंदिरा गांधी यांच्या नेतृत्वाविरुद्ध उघड झुंज घेण्याचे ठरविले व त्यासाठी त्यांनी आतापर्यंत विरोध केलेल्या मोरारजीभाईंशी हातमिळवणी केली.

## २५ तारखेची निकाली बैठक

२५ नोव्हेंबरच्या पहिल्या लढाईत तर पाटील यांनी बाजी जिंकली आहे. मध्यवर्ती निवडणूक मंडळाच्या बैठकीत त्या दिवशी मेनन यांचे तिकिट-प्रकरण चर्चेला आले. फकरूद्दिन अली अहमद, यशवंतराव चव्हाण, गुलाम महंमद सादिक, द्वारकाप्रसाद मिश्रा व जगजीवनराम यांचा मेनन यांना पाठिंबा असल्यामुळे या बैठकीत पाटील यांच्यावर आपण सहज मात करू असा इंदिरा गांधी व कामराज यांना विश्वास होता. परंतु फकरूद्दिन आजारपणामुळे त्या बैठकीला उपस्थित राहू शकले नाहीत. व बैठक सुरू होण्यापूर्वीच गुलाम महंमद सादिक श्रीनगरला रवाना झाले. चव्हाण आणि मिश्रा यांनीही मेनन यांच्या बाजूने तोंड उघडण्याचे टाळले. जग-

जीवनरामांनीही ' मुंबई मिळत नसेल तर मेनन यांनी दुसरीकडून उभे राहावे ' असा सूर धरला. कामराज–इंदिरा गांधी यांची फळीही अशा रीतीने कोलमडून पडली. या उलट मोरारजीभाई देसाई, अतुल्य घोष, चंद्रभानु गुप्ता, रामसुभगसिंग व संजीव रेड्डी यांनी मात्र पाटील यांच्या भूमिकेचा ताठरपणात पुरस्कार केला. २५ नोव्हेंबरच्या बैठकीतच मेनन-प्रकरणी कामराजांचा पुरा पराभव झाला. परंतु मद्रासला जाऊन आल्याशिवाय व तेथील मुख्यमंत्रिपदाबाबतच्या वाटाघाटी पुऱ्या केल्याशिवाय पराभव जाहीर करणे कामराजांना गैरसोईचे वाटले व मेनन यांचे मत वळविण्यासाठी अवधी द्या असे सांगून त्यांनी आठ दिवसांची मुदत मागून घेतली. कामराज दिल्लीला परतल्यानंतर मध्यवर्ती निवडणूक मंडळाची जी बैठक भरली तिच्यात मेनन यांच्या तिकिटासंबंधी एक मिनिटही चर्चा न होता पाटलांचा विजय झाल्याची कामराजांना कबुली द्यावी लागली.

काँग्रेस-नेतृत्वाची ही वळणे पाहिल्यानंतरच मेनन यांनी काँग्रेसबाहेर पडून ईशान्य मुंबईतील निवडणूक लढविण्याचा निर्णय केला. परंतु तो तावडतोब जाहीर करणे त्यांना इष्ट वाटले नाही. आपल्याबरोबर काँग्रेसमधील केशवदेव मालवीय प्रभृतींचा डावा गट बाहेर पडत आहे, याची ते चाचपणी करीत असून तसे झाले तर साऱ्या डाव्या शक्तींनी पाटील-मोरारजींच्या हातात गेलेल्या काँग्रेस नेतृत्वाविरुद्ध उभे राहावे असा ते प्रयत्न करतील. या प्रयत्नात ते कितपत यशस्वी होतात हे सांगणे कठीण आहे. परंतु फेब्रुवारीच्या मध्यास होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीतील पहिली लढाई २५ नोव्हेंबरलाच घेतली गेली व त्या लढाईत मोरारजी-पाटील गट विजयी झाला आहे. इंदिरा गांधी आणि कामराज यांच्या नेतृत्वाविरुद्ध उभे राहून भारताचे प्रधानमंत्रिपद मोरारजींना द्यावयाचे गृहमंत्रिपद किंवा परराष्ट्रमंत्रिपद स्वतःसाठी मिळवावयाचे अशा जिद्दीने सदाशिव कान्होजी पाटील मैदानात उतरले आहेत. ●

**— सदाशिव पेठकर**


**परसूच्या पशुकथा** — **वसंत सबनीस**

**सहा साहसे** — **दा. सी. देसाई**

**मूल्य प्रत्येकी दोन रुपये**

**राजहंस प्रकाशन, ४१९ नारायण, पुणे २.**

# ठुकाकळे . . .



## □ तळहातावरचे केस

लोकशाहीत प्रत्येकाला मताचा अधिकार असतो. लोकशाहीत पक्ष असतात. पक्षाचे सरकार असते. जे लोक बुद्धिमान असतात त्यांचाच पक्ष निवडून येतो. कुणी पक्ष बैलबुद्धीने प्रयत्न करतात. कुणी ' गाय 'बुद्धीने करतात. ज्याची बुद्धी अधिक कुशाग्र ते निवडून येतात. राज्य करतात. आपल्या देशात गेली वीस वर्षे अशा बुद्धिमान काँग्रेस पक्षाचे सरकार राज्य करते आहे. आता या गोष्टीबद्दल कुणाचा मतभेद आहे का ? परंतु पराजयप्रकाश नेहमी अशा जवळजवळ सर्वमान्य घटनांवर नवीन प्रकाश टाकत असतात. परवा दिल्लीला अपक्ष मेळाव्यात त्यांनी अशी सूचना केली– ' अपक्ष बुद्धिमंतां 'चे सरकार भारतात असावे. आता बुद्धी ही काही स्थिर वस्तू आहे का ? हेच पराजयप्रकाश स्वातंत्र्यपूर्व काळात कसे कुशाग्र बुद्धीचे समाजवादी नेते होते. समाजवादी पक्षात राहिले तर पक्ष वाढला असता व बुद्धीही ! परंतु अपक्ष झाले आणि बुद्धीत फरक झाला. होते असे कधी कधी ! आता ते काही बाही बोलतात. तेव्हा बुद्धी चालू शकते, असा अनुभव गाठीशी असताना असा बुद्धिमंतांचा आग्रह त्यांनी का धरावा ? काही कळत नाही. तळहातावर केस असावेत किंवा बैलांनी मानेवर जूं न घेता गाडी ओढावी अशा विचित्र इच्छा पराजयप्रकाशांनी का कराव्यात ? आता ह्यात बुद्धिमंतांत नाव घेण्यासारखे अपक्ष बुद्धिमंत म्हणजे विनोबा ! ते काही सरकारात येणार नाहीत. दुसरे म्हणजे आपले सी. डी. देशमुख यांना. यांना एकदा सरकारात घेऊन झाले. पण पं. नेहरूंच्या बुद्धी-पुढे यांनी हार खाल्ली, संपले. पराजयप्रकाशांखेरीज अपक्ष बुद्धिमंत संपले ! परंतु पराजयप्रकाशांनी सरकारात मुळीच जाऊ नये. मग देशाला बहुमोल सूचना कोण करणार ?

## □ मोहनास्त्र

महाराष्ट्र काँग्रेसने नुकतेच एक मोहनास्त्र सोडले. प्रदेश काँग्रेसचे चिटणीस मोहन धारिया यांनी असे जाहीर केले आहे की भरपूर तरुण रक्त काँग्रेसमध्ये आता

आले आहे. २४२ तिकिटांपैकी फक्त ८९ च तिकीटे जुन्या आमदारांना दिली. बाकी सगळे तरुण रक्त. तिकडे काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष कामराज यांनी असे जाहीर केले की एखादा उमेदवार नालायक ठरेपर्यंत त्याचा मतदारसंघ कायम ठेवावा! मेननसाठी सांगितलेला हा सिद्धांत मोहनरावांच्या तरुण रक्त–सिद्धांताला लावला तर तिकिटे नाकारलेल्या १५३ आमदारांच्या बाबतीत गैरसमज पसरेल. आतापर्यंत शरीरात शुद्ध, अशुद्ध रक्तच असते असे आपण समजत होतो. परंतु मोहनरावांना फक्त तरुण रक्त व म्हातारे रक्त एवढाच भेद माहीत आहे. या तरुण रक्ताचे गुणवर्णन करताना यातले पदवीधर किती, पदवी घरू पाहणारे किती, मुसलमान किती, वकील किती, असा तपशील दिला आहे. यापेक्षा तरुण रक्त सिद्ध करण्यासाठी मोहनरावांनी या प्रत्येक उमेदवाराचे चालू वय, विवाहित की अविवाहित, लग्न झाले असल्यास कधी झाले, मुले किती, सध्याचा पोटाचा व्यवसाय व मासिक उत्पन्न असा सर्व तपशील दिला असता तर या तरुण रक्ताची अधिक ओळख पटली असती. अजून वेळ गेलेली नाही. मोहनरावांनी सूचना मनावर घ्यावी. नाही तर या तरुण उमेदवारांविषयी सांगण्यासारखे आता दुसरे काय उरलेले आहे? जे अपवाद असतील ते तरुण असले काय किंवा म्हातारे असले काय?

## ☐ अन्न आणि कला!

आपले हिंदी चित्रपट लोकांना किती आवडतात! सिनेमाविषयक मासिकांचा खप तर अचाट असतो. हिंदी चित्रपट–सृष्टीतील नटनटचा या मुख्यत: निवडणुकीत काँग्रेसला मदत करतात. पद्मिनीला तर काँग्रेसने तिकीटच दिले आहे. काँग्रेसशी एकरूप होणाऱ्या या आपल्या हिंदी चित्रपट–सृष्टीविषयी कितीतरी अभिमानाने बोलता येण्यासारखे आहे. परंतु आपल्या हिंदी चित्रपटसृष्टीतील हे सर्वांगीण यश पाश्चात्यांना पाहवत नाही. एका पाश्चात्य प्रवाशाने हिंदी चित्रपट पाहून लिहिलेला एक लेख नुकताच वाचला. त्यात तो काय म्हणतो ते आधी पाहू–

कथा : तरुण माणसांना सक्तीने प्रेमात पडावेच लागते. त्यांच्या प्रेमात कथानक तीन तास चालावे म्हणून सारख्या अडचणी येतात. या मुख्यत: भयंकर योगायोगाने निर्माण होतात.

स्वरूप : कसलाही प्रश्न वगैरे या चित्रपटात हाताळलेला नसतो. नायक-नायिकेचे लग्न कसे होईल हाच एकमेव प्रश्न या चित्रपटात असतो. सर्वसाधारणपणे ही प्रेमप्रकरणे श्रीमंतांची असतात. नायक सुरुवातीला गरीब दाखवला तरी मध्यंतरापर्यंत त्याला भरपूर पैसे मिळतात व तो बहुधा श्रीमंत माणसाचा हरवलेला मुलगा असतो. हे राजवाड्यासारख्या घरात राहतात. हे राजवाडे सहसा बाहेरून दाखवत नाहीत. एकदम आतल्या खोल्याच पाहायला मिळतात. खराखुरा रस्तादेखील चित्रपटात सहसा दिसत नाही.

नटी व नट : पुरुष नट हे देखणे व जाडेजुडे असतात. स्त्रिया या उंचनिंच, पसरट शरीराच्या व लहानशा डोक्याच्या असतात. केस लांब असतात. नायकाची वाट पाहणे हा यांचा मुख्य कार्यक्रम असतो. सिमला, काश्मीर, माथेरान ही ठिकाणे प्रेमासाठी वापरण्यात येतात.

प्रेम : या चित्रपटातले प्रम हे भयानक व उध्वस्त करून टाकणारे दाखवतात. हातात हात घेणे, शरीरे चिकटली न चिकटली इतपत आलिंगन देणे वगैरे गोष्टी लग्नापूर्वी दाखवतात व लग्नानंतरचे काही दाखवायचे तर ते काम बहुतेक डोळ्यांनी करतात किंवा नाचून करतात. नायिका ही सर्व शरीर हलवून नायकावरचे प्रेम व्यक्त करते. नायिकेच्या बापाची परवानगी मिळाल्यावर बहुधा हा प्रकार चालतो. गाणी हे प्रेमाच्या चाळ्यातले प्रमुख अंग. ही गाणी फक्त ओठांनी म्हटली जातात. बाकी शरीराशी याचा काही संबंध नसतो.

चाकर माणसे : या सिनेमातली चाकर माणसे ही मालकाची काळजी वाहतात. श्रीमंत माणसांनी आपली दु:खे उगाळावीत व या चाकरांनी त्याबद्दल हळहळ करावी असे काम यांचेकडे असते. कधीकधी ही अर्धवट व आचरट दाखवतात. त्यांना त्यांचे सुखदु:ख नसते.

असे का घडते ? : हा सगळा अवास्तव आचरटपणा हिंदी सिनेमात आढळतो. याचे मुख्य कारण भारतात निरक्षरांचे प्रमाण फार आहे. चागल्या कथा व कादंबऱ्या वाचणारे फारच थोडे. त्यामुळे नाच व गाणी यांना प्राधान्य देऊन भिकार कथांवरच चित्रपट काढणे परवडते.

हिंदी चित्रपटसृष्टीची काय ही बदनामी ! पडद्यावर चुंबन न दाखवता प्रेम व्यक्त करून दाखवणे हे किती कठिण असते याची या गोऱ्या साहेबांना कुठून कल्पना येणार ? आमच्या देशात महत्त्वाचा एकच प्रश्न व तो म्हणजे अन्नप्रश्न ! बाकी सगळे उपप्रश्न. हा प्रश्न चित्रपटात काय दाखवायचा ? तोही जर दाखवायचा ठरला तर नक्की प्रश्न काय आहे ते तर कळले पाहिजे ? या देशात अन्नाचीच अजून व्याख्या होत नाही. कुणी नुसतेच तांदूळ खातात, कुणी गायी खातात तर कुणी काहीच खात नाहीत. येथल्या माणसामाणसांतही फरक आहे. श्रमिक जनतेला जास्त अन्न लागते, असे मंत्री सांगतात. अमेरिका, कॅनडा, ऑस्ट्रेलिया सारखे गहू पाठवतात तरी आपला त्यांचा हिशेब चुकतोच.

साहेबाने तरी अशा वास्तव प्रश्नावर हिंदी चित्रपट काढून दाखवावा. हा प्रश्न सुटत नाहीच. तर निदान त्याचा विसर पडावा म्हणून तर हिंदी नटनट्यांची लग्ने, त्यांचा निवडणूक प्रचार याला आमचे सरकार सारखे प्रोत्साहन देते. जे प्रश्न सुटता सुटत नाहीत ते विसरता येणे हीच मोठी कला आहे. ●

— ग्यानबा

# आपण बाई उमेदवार बघून मत देणार !

(मध्यमवर्गीय कुटुंबाचे दोन खोल्यांचे घर. सुमारे ३५ वर्षे वयाची दोन मुलांची आई असलेली गृहिणी रेशनचे तांदूळ निवडीत आहे. जवळ एक दहा वर्षांची मुलगी खेळते आहे.)

गृहिणी : (मला बघताच) च्...च् च्...अगदी पाच मिनिटांनी उशीर केलात. नुकताच चहा झाला आमचा. कप विसळले आणि बसले तांदूळ निवडायला. तांदूळ कसले मेले. दगड नुसते.

मी : (पडलेल्या चेहऱ्याने) अहो, चहाचं कसलं घेऊन बसलायत वहिनी. दिवस बदललेयत. आपल्या आदरातिथ्याच्या कल्पनाही बदलल्या पाहिजेत.

गृ. : छे हो... तुम्हांला ठीक आहे बोलायला. आम्हा स्त्रियांचं आतडं कसं तुटतं तुम्हांला कळायचं नाही. आल्या माणसाला साधं या बसा म्हणण्याचीही सोय उरली नाही. काय तरी मेले दिवस आलेत. पूर्वी असं नव्हतं हो... आमच्या वॉर्डातून ते हे...आपले उभे राहतायतना असेंब्लीसाठी त्यांना मी चक्क सांगणार आहे, पोटापाण्याच्या वस्तू आधी स्वस्त करा. मग देते तुम्हांला मत...

मी : अरे वा: निवडणुकीत बराच रस घेतायसं दिसतं...

गृ. : घेतलाच पाहिजे. स्त्रिया असलो म्हणून काय झालं ? मतदानाचा अधिकार बजावलाच पाहिज...सुलभे ...अग दूर खेळ...बोलू दे मला जरा...

मी : पण एवढी कसली आली आहे तुम्हांला तिडीक ? तुम्ही मत दिलंच नाही तर काय होईल ?

गृ. : अगदीच अजब प्रश्न विचारता बाई तुम्ही. मी मत दिलं तर काहीच होणार नाही. पण मग सर्वांनीच ठरवलं असं तर मग गंमत नाही का होणार...? मी पण बाई आपली प्रत्येक निवडणुकीत मत देते, हो ... आपल्या लोकशाहीसाठी केलं पाहिजे काहीतरी ...

मी : बापरे– तुमचा लोकशाहीवर बराच विश्वास दिसतो वहिनी.

गृ. : न ठेवून काय करणार ? तसं पाह्यलं तर लोकशाहीला दिवे ओवाळावे असं काय काय घडलं आहे गल्या वीस वर्षांत ? साधी मेली चटणीभाकर तरी धड मिळते आहे का ? तरी आपला आहे हो विश्वास. आज नाही आणखी पंधरावीस वर्षांनी तरी चांगले दिवस येतील असं म्हणायचं आणि मतं द्यायची.

मी : मतं देणार म्हणजे काय करणार ? पक्ष बघून सरसकट मतं देणार की उमेदवार बघून ...

गृ. : पक्षाला म्हणून मतं द्यायची नाही मी. आपण बाई उमेदवार बघून मत देणार. आम्हांला जे माणूस चांगलं वाटतं त्यालाच मत द्यायचं. उगाच माहीत नसलेल्या माणसाला अमुक पक्षाचा अन् तमुक पक्षाचा म्हणून कशाला मत द्यायचं ? माझा तर या

पक्षांवर विश्वासच नाही. वाट्टेल त्या गोष्टीसाठी मोर्चे काढतात न् मारामाऱ्या करतात. महागाईचं नुसतं नाव घेतात पण ती थांबविण्यासाठी कुण्णी काही करत नाही. काय किमती वाढताहेत एकेक वस्तूच्या. शहारे येतात अगदी अंगावर. आता हे दुधाचंच बघा ना . . .

मी : हो ... ते ठीक आहे ... पण हे उमेदवार कोण ठरवणार ... ? मैत्रिणी सांगतात अमुक उमेदवाराला मत दे किंवा आणखी कुणी सांगतं म्हणून ...

गृ. : (चिडून) मुळ्ळीच नाही...कुणी सांगतं म्हणून मत देणार मी होय... ? बाई असले म्हणून काय झालं ! प्रत्यक्ष यांनी जरी सांगितलं तरी मी आपलं मत गहाण टाकणार नाही. हे भारीच बरं तुम्हा पुरुषांचं. तुम्हांला वाटतं आम्ही स्त्रिया म्हणजे काय सांगू तसं करू. दिवस बदलले पण पुरुषांची जात काही बदलली नाहीय्...

मी : अहो... अहो... तशा अर्थांनी म्हणत नाही मी...

गृ. : नाही कसं. तेच म्हणताय तुम्ही. ते काही नाही. स्त्रियांवर होणारा हा अन्याय थांबवलाच पाहिजे. काँग्रेस काय न् विरोधी पक्ष काय. कुणी लक्ष देत नाही स्त्रियांकडं. पुण्यातून एक तरी बाई उभी केली आहे का कुणी ? तीच गत सगळीकडे ! अन् म्हणे एक बाई या देशाची पंतप्रधान आहे ! हं ! ... मी म्हणते स्त्रियांनी स्वत:चाच पक्ष का स्थापू नये ? राज्यावर आल्या तर कशा काटकसरीने राज्य करतील... हां हसू नका... भूक कसली लागतेय ग तुला सदाची ? बरं बाई थांब... तुझ्याबरोबरच तुझ्या काकांनाही करते पोहे.

मी : अहो कशाला ... कशाला ...

गृ. : (आतल्या खोलीत स्टोव्ह पेटवीत) हांऽऽ टिंगल करू नका बरं. महागाईची झळ पुरुषांना कळणार नाही. अहो, काय भाव वाढलेयत एकेका वस्तूचे. आता हेच पाहा ना चार वर्षांपूर्वी...

(गेल्या चार वर्षांत महागाई किती तरी पटीने वाढली आहे, हे मला पुन्हा एकदा तीव्रतेने पटविण्यात येते. आणि खमंग पोह्यांवर आडवा हात मारीत या वाढत्या किमतींना आळा कसा घालावा या गहन प्रश्नाची मी '**माणूस**' प्रतिनिधी चिंतायुक्त मुद्रेने चर्चा करू लागतो...... ) ●

## राजस्थान
# उजव्या पक्षांची स्वप्नभूमी

राजस्थानातल्या कुठल्याही गावात तुम्ही शिरलात तरी दोन–तीन राजे महाराजे तिथे तुम्हांला खात्रीने सापडतील. या म्हणण्यात जरी थोडी अतिशयोक्ती असली तरी राजस्थानातल्यासारखी गतवैभवी राजे-महाराजांची खाण भारतात किंवा कदाचित साऱ्या जगातही दुसरीकडे कुठे सापडणार नाही. संस्थानांचे भार-

तात सामिलीकरण करण्याचे काम सरदार पटेलांनी हाती घेतले तेव्हा एक हद्राबाद आणि जुनागड सोडल्यास राजस्थानातील या असंख्य राजामहाराजांच्या गुंतागुंतीचाच त्यांना अधिक त्रास झाला असावा. राजे लोकांच्या या वैपुल्यामुळेच या वैराणभूमीला कदाचित राजस्थान म्हणत असावेत. एरवी वाळवंटे, वैराणमाळ, पडीक जमिनी आणि जमीनदारांच्या हाताखाली काम करणारे गरीब भूमिहीन शेतमजूर यांच्या या प्रदेशात दुसरा कुठलाच राजसपणा आढळत नाही. राजस्थानातील भोळीभाबडी अशिक्षित जनता मात्र मध्ययुगीन काळाप्रमाणे अजूनही आपापल्या जुन्याच राजांवर निष्ठेने प्रेम करते.

त्यामुळेच राजस्थान आज उजव्या विरोधी पक्षांचा बालेकिल्ला मानला जातो. जुन्या संस्थानिकांचा भरपूर पाठिंबा असलेल्या स्वतंत्र पक्षाचा सर्वांत जास्त जोर याच राज्यात आहे आणि येत्या सार्वत्रिक निवडणुकीत जनसंघाच्या सहकार्याने काँग्रेसला उलथून पाडून राजस्थानात स्वतंत्र–जनसंघाचे संयुक्त मंत्रिमंडळ बनविण्याचे स्वप्न उजवे विरोधी गट पाहत आहेत.

राजस्थानात अगदी प्रथमपासूनच उजव्या गटाची चलती आहे. १९५२ च्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकांतच राजस्थानातील पदभ्रष्ट संस्थानिकांनी एकत्र येऊन काँग्रेसला जोराचा दणका दिला होता. काँग्रेस आणि संस्थानिकांची ही विरोधी आघाडी यांना विधानसभेत तुल्यबल जागा मिळाल्या होत्या. अपक्ष उमेदवारांपैकी एकजण काँग्रेसला येऊन मिळाला होता. तेव्हा कुठे काँग्रेसला स्वतःचे मंत्रिमंडळ बनविणे कसेबसे शक्य झाले. आणि पुढली सगळी पाच वर्षे हे एका जागेचे बहुमत टिकवताना काँग्रेसच्या नाकी नऊ आले.

दुसऱ्या निवडणुकांत मात्र काँग्रेसला राजस्थानमध्ये जरा बरी परिस्थिती आली होती. ३१ जागांचे बहुमत काँग्रेसला मिळाले होते. आणि नेतृत्वाची पोकळी हळूहळू भरून निघत होती. राजस्थानात लोकांमध्ये संस्थानिकांएवढे वजन असलेले, मान असलेले लोकनेतेच नव्हते. श्री. मोहनलाल सुखाडिया यांनी ती जागा भरून काढली आणि राज्यात काँग्रेसला स्थिरता प्राप्त करून दिली.

आणि तेवढ्यात स्वतंत्र पक्षाचा उदय झाला. आपली सारी स्वप्ने विरलेल्या, पदभ्रष्ट झालेल्या विफल संस्थानिकांना आपल्या आकांक्षा पूर्ण करील असा पक्ष हवा होता. स्वतंत्र पक्ष त्यांना नेमका सापडला. आणि एकजात साऱ्या संस्थानिकांनी आपले वजन स्वतंत्र पक्षाच्या बाजूने टाकण्यास सुरुवात केली. जयपूरचे महाराजा आणि महाराणी गायत्रीदेवी यांनीही स्वतंत्र पक्षात प्रवेश केला. जयपूरच्या राजघराण्यावर अजून राजस्थानी जनतेची फार निष्ठा आहे. महाराणी गायत्रीदेवींची लोकप्रियता तर अमाप आहे.

भरीत भर म्हणून इतर राज्यांप्रमाणे राजस्थान काँग्रेसमध्येही लाथाळी सुरू झाली. या सर्व गोष्टींचा व्हायचा तोच परिणाम तिसऱ्या सार्वत्रिक निवडणुकीत

झाला. राजस्थान विधानसभेतील १७६ जागांपैकी बरोबर निम्म्या म्हणजे ८८ जागा काँग्रेसला मिळाल्या. उरलेल्यांपैकी ३७ स्वतंत्र, १५ जनसंघ, २२ अपक्ष आणि इतर किरकोळ पक्षांना मिळाल्या. विरोधकांमध्ये एकवाक्यता नसल्याने त्यांना मंत्रिमंडळ बनविता आले नाही. काही अपक्ष उमेदवार काँग्रेसमध्ये गेले तेव्हा कुठे श्री. सुखाडिया यांना काँग्रेसचे मंत्रिमंडळ बनविता आले. लोकसभेसाठी स्वतंत्र पक्षाच्या महाराणी गायत्रीदेवी जयपूरमधून निवडून गेल्या तेव्हा त्यांनी लोकसभेसाठी देशात जास्तीत जास्त मतांनी निवडून जाण्याचा विक्रम केला.

आता गेल्या पाच वर्षांत काँग्रेसची परिस्थिती राज्यात अधिकच विकट झालेली आहे. अंतर्गत लाथाळी वाढलेली आहेत. शिवाय काँग्रेसचे नेते मुख्यमंत्री श्री. मोहनलाल सुखाडिया यांच्यावर भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप राजस्थानातील आमदारांनी विधानसभेत तर केलेच. पण त्याचबरोबर दिल्लीच्या लोकसभेतही हे आरोप केले गेले. त्यांना प्रसिद्धी भरपूर मिळाली. प्रचंड प्रमाणावर सरकारी सोने दडपल्याचा आरोप श्री. सुखाडिया यांच्यावर आहे. त्या आरोपाला त्यांना अद्याप उत्तर देता आलेले नाही, त्यामुळे राजस्थानातील आधीच दुबळ्या असलेल्या काँग्रेसची प्रतिमा अधिकच डागाळली गेली आहे.

या उलट विरोधी पक्षांची स्थिती आहे. विशेषतः, स्वतंत्र आणि जनसंघ या दोन पक्षांनी गेल्या पाच वर्षांत राज्यात चांगलीच ताकद कमावली आहे. आणि या दोन पक्षांनी निवडणुकांपुरता समझोता करून काँग्रेसला सत्तेवरून खाली खेचण्याचा चंग बांधलेला आहे. मागील निवडणुकात त्यांनी हातमिळवणी केली नव्हती. संयुक्त समाजवादी पक्षदेखील आपल्या काँग्रेसविरोधी धोरणाला अनुसरून या दोन्ही पक्षांशी या निवडणुकीपुरता अलिखित समझोता करण्याच्या बेतात आहे.

गायत्रीदेवींसारख्या महाराण्यांची आणि महाराजांची राजस्थानात अजूनही प्रचंड लोकप्रियता आहे. आणि भरतपूरचे महाराजा व जैसलमेरच्या राजमाता यांच्यासारखे जे थोडेसे हाताच्या बोटांवर मोजण्याइतके संस्थानिक काँग्रेसमध्ये आतापर्यंत टिकून होते तेही आता हळू हळू काँग्रेस सोडून स्वतंत्र पक्षात जात आहेत.

अशा स्थितीत काही अघटित न घडले तर काँग्रेसला राज्यावर टिकून राहणे राजस्थानमध्ये फार कठीण जाणार आहे. काँग्रेसला पदभ्रष्ट होण्याचा मोठा धोका केरळनंतर दुसरीकडे कुठे असेल तर तो राजस्थानातच. पण केरळात काँग्रेसला शह डाव्यांचा आहे तर राजस्थानात उजव्यांचा.

• •

# मोहन रानडे यांस

नको मोहना खंत करू तू नको कपाळी हात धरू
तुला न आम्ही कधी विसरलो. तुझ्या मुक्तिची शर्थ करू ॥ध्रु०॥
अम्हीच वीरा पडलो होतो वैफल्याच्या ग्लानीत
नव आशांचे अमृतसिंचन करून उठलो जोषात
देशभक्तिची तुझी कहाणी भाविर्कतेने नित्य स्मरू ॥ १ ॥
मृतवत् राष्ट्रा जाग आणुनी कर्तव्याचे धडे दिले
गोव्यामधल्या त्रस्त बांधवां देशभक्तिचे वेड दिले
आयुष्याची समिधा अर्पुन स्वातंत्र्ययज्ञ तू करसि सुरू ॥ २ ॥
फिरंगियांची पाशवी सत्ता चौ शतकांची जुलमी सत्ता
क्रांतिलढ्याचि बसता लत्ता पोर्तुगिजांच्या भिववी चित्ता
यशामागुनी यशे पाहुनी गनिमा ये बघ धडकि भरू ॥ ३ ॥
गुलामगिरीचे पाश तोडण्या निर्बलांसि तू बलही दिले
बंदुकिच्या तू गोळ्या झेलुन हासत मरणा परतविले
घायळ सिंहा बघून लांडगे लचके तोडुन बघति चरू ॥ ४ ॥
कपटी रिपुने डाव खेळुनि न्यायसभे तुज आणविले
बेडर धैर्या तुझ्या पाहुनी न्यायमूर्तिने आदरिले
दो दशके अन् सहा सालसी सक्तमजुरी होय सुरू ॥ ५ ॥
लिस्बनची ती क्रूर लालसा पाहून येशू हळहळला
मानव्याचा अंत देखता तुरुंग देखिल कळवळला,
अशा भयंकर जाचामधुनी "प्रभू' तुझे तारिल तारू ॥ ६ ॥
नररत्नांच्या मुगुटांमधला तूच शोभसी एक हिरा
क्रांतिविरांच्या मालिकेत तुज पाहुन तोषे माय धरा
स्वागत करण्या तुझेच वीरा देह फुलांच्या घड्या अंथरू ॥ ७ ॥

— दत्ता खरे

२४ डिसेंबर १९६६

# विचारवारे

— अनिल

## □ भारत आणि अध्यक्षीय लोकशाही

दिल्ली हे आंतरराष्ट्रीय परिषद-परिसंवादांचे माहेरघर. एखादा तरी परिसंवाद चालू नाही, असा दिवस दिल्लीत विरळाच. नुकताच असा एक आंतरराष्ट्रीय परिसंवाद झाला. तो ‘ संसदीय विरुद्ध अध्यक्षीय राज्यपद्धती ’ या विषयावर. प्रमुख वक्ते म्हणून आपले विचार मांडताना ऑक्सफर्डचे प्रा. मॅक्स बेलॉफ् म्हणाले की, अमेरिकेत वापरात असलेली अध्यक्षीय राज्यपद्धती सध्याच्या परिस्थितीत भारताला योग्य नाही. अमेरिकन अध्यक्षांची निवड करताना राष्ट्रव्यापी मोहीम आरंभण्यात येते ती चालविणे हिंदुस्थानात शक्य नाही. कारण येथे जनसंपर्काची साधने तुटपुंजी आहेत. शिवाय येथे प्रांत राज्यांचे केंद्रावर बरेच वजन आहे, तेव्हा येथला अध्यक्ष जर कार्यकारी अध्यक्ष झाला तर त्याला सर्वांचे समाधान करू शकणारे निर्णय घेणे जड जाईल. अनुकूल परिस्थितीतही ही गोष्ट सोपी नसते. हिंदुस्थान तर बहुभाषी व ‘बहु सांस्कृतिक ’ देश असल्याने येथे ते अधिकच कठीण आहे.

अध्यक्षाला अधिक अधिकार देऊन व विधानसभेचे अधिकार छाटून ‘ इहलोक-परलोक साधणे ’ देखील शक्य नाही. “ या दोन पद्धतीत मूलभूत फरक असल्याने कुठलीतरी एक पद्धत निवडली पाहिजे.”

शिकागोचे प्रा. लॉइड रुडॉल्फ व प्रा. सौ. लॉइड रुडॉल्फ यांनी असे मत प्रकट केले की अध्यक्षीय पद्धतीचे सरकार स्थापन करण्याच्या दृष्टीने काँग्रेस पक्ष अगदी योग्य असला तरी बहुसंख्य मतदारांची निरक्षरता आणि जनसंपर्काच्या साधनांचा तुटवडा या कारणांमुळे अध्यक्षीय पद्धत हिंदुस्थानात चालणे जवळजवळ अशक्य आहे.

पेन्सिल्व्हानिया विश्वविद्यालयाचे डॉ. नॉर्मन पामर यांच्या मतेही हिंदुस्थानात अध्यक्षीय राज्यपद्धती स्थापन होण्याचा संभव नाही. पुनःपुन्हा हॅरॉल्ड लास्कीचा हवाला देऊन त्यांनी म्हटले, प्रत्येक देशाला आपल्या परिस्थितीला अनुरूप अशी राज्यपद्धती स्वीकारावी लागते.

# विचारवारे

— अनिल

## □ भारत आणि अध्यक्षीय लोकशाही

दिल्ली हे आंतरराष्ट्रीय परिषद-परिसंवादांचे माहेरघर. एखादा तरी परिसंवाद चालू नाही, असा दिवस दिल्लीत विरळाच. नुकताच असा एक आंतरराष्ट्रीय परिसंवाद झाला. तो 'संसदीय विरुद्ध अध्यक्षीय राज्यपद्धती' या विषयावर. प्रमुख वक्ते म्हणून आपले विचार मांडताना ऑक्सफर्डचे प्रा. मॅक्स बेलॉफ् म्हणाले की, अमेरिकेत वापरात असलेली अध्यक्षीय राज्यपद्धती सध्याच्या परिस्थितीत भारताला योग्य नाही. अमेरिकन अध्यक्षांची निवड करताना राष्ट्रव्यापी मोहीम आरंभण्यात येते ती चालविणे हिंदुस्थानात शक्य नाही. कारण येथे जनसंपर्काची साधने तुटपुंजी आहेत. शिवाय येथे प्रांत राज्यांचे केंद्रावर बरेच वजन आहे, तेव्हा येथला अध्यक्ष जर कार्यकारी अध्यक्ष झाला तर त्याला सर्वांचे समाधान करू शकणारे निर्णय घेणे जड जाईल. अनुकूल परिस्थितीतही ही गोष्ट सोपी नसते. हिंदुस्थान तर बहुभाषी व 'बहु सांस्कृतिक' देश असल्याने येथे ते अधिकच कठीण आहे.

अध्यक्षाला अधिक अधिकार देऊन व विधानसभेचे अधिकार छाटून 'इहलोक-परलोक साधणे' देखील शक्य नाही. "या दोन पद्धतीत मूलमूत फरक असल्याने कुठलीतरी एक पद्धत निवडली पाहिजे."

शिकागोचे प्रा. लॉइड रुडॉल्फ व प्रा. सौ. लॉइड रुडॉल्फ यांनी असे मत प्रकट केले की अध्यक्षीय पद्धतीचे सरकार स्थापन करण्याच्या दृष्टीने काँग्रेस पक्ष अगदी योग्य असला तरी बहुसंख्य मतदारांची निरक्षरता आणि जनसंपर्काच्या साधनांचा तुटवडा या कारणांमुळे अध्यक्षीय पद्धत हिंदुस्थानात चालणे जवळजवळ अशक्य आहे.

पेन्सिल्व्हानिया विश्वविद्यालयाचे डॉ. नॉर्मन पामर यांच्या मतेही हिंदुस्थानात अध्यक्षीय राज्यपद्धती स्थापन होण्याचा संभव नाही. पुनःपुन्हा हॅरॉल्ड लास्कीचा हवाला देऊन त्यांनी म्हटले, प्रत्येक देशाला आपल्या परिस्थितीला अनुरूप अशी राज्यपद्धती स्वीकारावी लागते.

## ☐ भारतात राजकारणाला अवास्तव महत्त्व

डॉ. पामर यांनी भारतातल्या राजकीय परिस्थितीच्या निरनिराळ्या पैलूंबद्दल बरेच परखड विचार प्रकट केले. त्यांनी स्पष्टपणे म्हटले की, हिंदुस्थान सध्या नैराश्य व असंतोषाच्या गर्तेत जेवढा खोल रुतला आहे, तेवढा पूर्वी कधीही रुतला नव्हता. पण स्वराज्याच्या बाल्यावस्थेतदेखील हिंदुस्थानाला काही चांगले दिवस आले. सध्याची परिस्थिती येणे अपरिहार्य होते. हिंदुस्थानातल्या सध्याच्या समस्या वाढीला लागण्याच्या समस्या आहेत व त्यांच्यामुळे मूलभूत स्थैर्याला धक्का पोचण्याचा संभव नाही.

हिंदुस्थानात राजकारणाने आयुष्याचा वाजवीपेक्षा जास्त मोठा भाग व्यापला आहे. "एकाच भांड्यात सगळ्या गोष्टी कोंबून शिजवायच्या म्हटल्या म्हणजे केव्हातरी भांड्याचे झाकण उडणारच. म्हणून अधिक भांडी पाहिजेत." बरेचसे कार्यक्रम व बऱ्याचशा योजना अंमलात येत नाहीत याचे एक कारण म्हणजे सरकारपासून निरनिराळ्या संस्थांपर्यंत प्रत्येक ठिकाणी वैयक्तिक हेव्यादाव्याला फार महत्त्व देण्यात येते.

हिंदुस्थानात जर लोकशाही यशस्वी व्हायची असेल तर सर्वसाधारण जनतेने राजकारणात अधिक कृतिशील व विधायक भाग घेतला पाहिजे. भारताची अजून लोकशाहीला योग्य एवढी तयारी झालेली नाही हे खरे आहे, पण कुठल्याच उदीयमान देशाची एवढी तयारी नसते. माझ्या मते मतदार सुशिक्षित व साक्षर असण्याची आवश्यकता नाही. गेल्या काही वर्षांत भारतीय लोकशाही अधिक जोमदार झाली आहे, पण त्याचबरोबर तिची 'झिलई' काही अंशी गेली आहे. एकूण पाहता हिंदुस्थानचे ठीक चालले आहे.

हिंदुस्थानाच्या परराष्ट्रीय धोरणाबद्दल बोलताना डॉ. पामर यांनी तटस्थतेचा उल्लेख केला. हिंदुस्थानने हे लक्षात घेतले पाहिजे की ज्याप्रमाणे लोणच्याचे अनेक प्रकार असतात त्याप्रमाणेच तटस्थतेचे असतात. तटस्थता ही एक सापेक्ष संज्ञा असून तिचे अनेक अर्थ असतात. तटस्थता ही हिंदुस्थानात धोरण म्हणून राबविली जाते तशी ती नसून तो एक दृष्टिकोन आहे.

हिंदुस्थानची दुसरी मोठी चूक म्हणजे त्याने पंचशील स्वीकारणाऱ्या देशांवर ठेवलेला भरंवसा. हिंदुस्थानाचा आंतरराष्ट्रीय दर्जा खचितच पूर्वीइतका वजनदार राहिला नाही. या क्षणी हिंदुस्थानने सर्वप्रथम काय करायला हवे असेल तर ते म्हणजे अंतर्गत सामर्थ्य वाढविणे. जोपर्यंत अंतर्गत मामल्यात हिंदुस्थान एक बलशाली व स्वतंत्र देश म्हणून ओळखला जात नाही तोपर्यंत त्याचा आवाज आपल्या सीमेच्या पलीकडे ऐकू जाणार नाही.

# गोमंतकाचे अनभिषिक्त राजे श्री. दयानंद बांदोडकर

'माणूस' प्रतिनिधीकडून

"महाराष्ट्रात विलीन होण्याविषयी गोव्यात जनमत कौल घेण्याला आमची केव्हाच तयारी होती–" जनमत कौल घेण्याआधीची तयारी म्हणून नुकताच राजीनामा दिलेले गोव्याचे मुख्यमंत्री श्री. दयानंद बांदोडकर 'माणूस' प्रतिनिधीशी बोलताना म्हणाले. "पण हा कौल घेण्याची मूळ सूचना आमचे विरोधक श्री. जॅक सिक्वेरा यांची. ओपीनियन पोलमध्ये साऱ्या भारतातले गोवन्स घ्या अशी आपण मागणी केली की, काँग्रेसश्रेष्ठी पोलच घेणार नाहीत आणि हा प्रश्न तसाच पुढे ढकलला जाईल, अशी त्यांची अपेक्षा होती. पण तसे घडावयाचे नव्हते."

पुढच्या महिन्यात गोमंतकात ज्या दिवशी हा जनमताचा कौल घेण्यात येणार आहे, त्या दिवशी सह्याद्रीच्या कुशीत सिंधुसागराच्या किनारी एखाद्या कोंदणाप्रमाणे दडलेल्या या छोटयाशा निसर्गरम्य भूमीवरील असंख्य देवळांतील आणि चर्चेसमधील घंटा मंगलनिनाद करीत एका महान ऐतिहासिक घटनेचे स्वागत करणार आहेत. कारण, त्याच दिवशी उण्यापुऱ्या साडेचारशे वर्षांच्या ताटातुटीनंतर महाराष्ट्र भूमीचे हे गोंडस अपत्य आपल्या मातेच्या कुशीत धाव घेणार आहे. जनमत कौलाचा निर्णय ठरल्यासारखाच आहे.

फेसाळत्या सागरावरील चकाकत्या रंगमय किनाऱ्यांच्या, उंच उंच ताडांच्या झुळझुळ वाहणाऱ्या निळ्याशार नद्यांच्या या हिरव्यागार देशाने महाराष्ट्राला आणि भारताला आजवर अनेक कलावंत दिले आहेत. साडेचारशे वर्षे अत्यंत क्रूर आणि जाचक अशा परक्या राजवटीच्या अंमलाखाली काढूनही या सुजला, सुफला भूमीने उमलत्या फुलासारखा आपला रसरशीत ताजेपणा आणि आपली अभिजात रसिकता गमावली नाही. उलट पारतंत्र्याच्या नरकमय चिखलातही असंख्य कला-



वंत कमलांचे ताटवेच्या ताटवे इथे अव्याहतपणे फुलतच राहिले. पोर्तुगीज मिशनऱ्यांच्या आक्रमक दडपणाला न जुमानता इथे जसे उच्च स्वरातले वेदघोष घुमत राहिले, तसेच पाश्चात्य नृत्यसंगीताच्या बेछूट स्वैराचाराला दोन हात दूरच ठेवून इथले गोड गळे अभिजात भारतीय संगीताचे स्वर आळवीतच राहिले. पोर्तुगीज सांस्कृतिक आक्रमणाची प्रतिक्रिया म्हणून की काय, भारतीय संस्कृतीतील आणि भारतीय कलांमधील अस्सलपणा गोमंतकीयांनी मोठ्या हिरीरीने टिकविला आहे.

## गोवामुक्तीत महाराष्ट्र आघाडीवर

महाराष्ट्रातील कितीतरी कलावंतांचे माहेर गोवेच. म्हणूनच महाराष्ट्राला आणि महाराष्ट्रीयांना गोव्याविषयी अधिक जिव्हाळा, आकर्षण आणि प्रेम.

म्हणूनच गोवामुक्तीच्या प्रयत्नात महाराष्ट्रच प्रथमपासून आघाडीवर होता. संभाजी महाराजांच्या हातून गोवे अगदी थोडक्यात सुटले. गोव्यातील भूमिगत क्रांतिकारकांचे नेहमीचे आश्रयस्थान म्हणजे सरहद्दीपलीकडची महाराष्ट्रातील खेडी. गोवामुक्ती संग्रामात, चळवळींत आणि सत्याग्रहांमध्ये सतत आघाडीवर होते ते महाराष्ट्रीय नेतेच. लिस्बनच्या तुरुंगात नराधम पोर्तुगीज शिपायांच्या हातून हाल-अपेष्टा सोसल्या त्या मराठी क्रांतिकारकांनीच. मोहन रानड्यांसारखे काही तेजस्वी वीरतर आजही आपले स्वप्न साकार झालेले असतानाही स्वतः मात्र अद्याप हे हाल भोगीत आहेत.

भारताला १९४७ साली स्वातंत्र्य मिळाले पण अवघ्या १३०१ चौरस मैलांचा एखाद्या छोट्या तालुक्याएवढा हा तुकडा 'पोर्तुगीज़ एम्पायर इन इंडिया' अशा प्रचंड नावाखाली पोर्तुगीजांनी आपल्या टाचेखालीच ठेवला होता. भारत सरकारच्या-

अनेक विनवण्यांना न जुमानता, गोमंतकीय क्रांतिकारकांना दडपून पोर्तुगीज सरकारने हे आपले 'साम्राज्य' घट्ट धरून ठेवले होते. भारतीय सैन्याने एक फुंकर मारण्याचा अवकाश, आपण पार साता समुद्रापलीकडे उडून जाऊ हे माहीत असूनही पोर्तुगीज भारतीय भूमीला एखाद्या जळवेप्रमाणे चिकटून बसले होते. स्वातंत्र्याच्या घोषणा देत सरहद्द पार करणाऱ्या निःशस्त्र भारतीय सत्याग्रह्यांवर निर्घृणपणे गोळ्या घालीत होते.

अखेर व्हायचे तेच झाले. १९६१ साली पोर्तुगीज अक्षरशः फुंकर घातल्याप्रमाणे उडून गेले. गोमंतकाच्या पारतंत्र्याच्या शृंखला खळखळून तुटून पडल्या. गोमंतक स्वतंत्र झाला. उभ्या भारतात वाहणारे स्वातंत्र्याचे मुक्त वारे आता गोव्यातूनही वाहू लागले आणि मराठीला मायबोली मानणारे गोमंतकीय लवकरच महाराष्ट्रात विलीन होण्याची स्वप्ने पाहू लागले. परंतु इच्छित लवकर घडत नाही. गोव्याची 'स्वतंत्र आगळी संस्कृती' मानणारे लोक गोमंतकाला महाराष्ट्रापासून कायमचे दूर ठेवू बघत होते. बऱ्याच केंद्रीय पुढाऱ्यांचा त्यांना पाठिंबा होता. १९६३ सालच्या निवडणुकांमध्ये महाराष्ट्रवादी गोमंतक पक्ष बहुमताने निवडून आला तरी गोव्याचा हा न्याय्य हक्क मान्य करण्यास केंद्राने नकार दिला. आता अखेर महाराष्ट्रात विलिनीकरण की, स्वतंत्र सवता सुभा या प्रश्नावर जनमताचा कौल घेण्याचे केन्द्राने मान्य केले आहे. कौलाचा निर्णय काय लागणार हे उघड आहे.

गोमंतकाच्या परंपरेला साजेसे असेच गोमंतकाचे अनभिषिक्त नेते आहेत श्री. दयानंद बाळकृष्ण तथा भाऊसाहेब बांदोडकर. दिलदार, उदार, रसिक, कलाप्रेमी, क्रीडाप्रेमी व सिंहाप्रमाणे झुंजार. जनतेवर जागरूक प्रेम करणारे, लोकांच्या उद्धारासाठी तळमळीने सक्रिय झटणारे, जनतेची हाक येताच धावून जाणारे. म्हणूनच १९६३ च्या निवडणुकीनंतर नव्या गोमंतक राज्याची धुरा सांभाळण्याची पाळी आली तेव्हा गोमंतकीयांनी श्री. बांदोडकरांनाच हाक दिली आणि त्यांनाच मुख्यमंत्रिपदाचा अभिषेक केला.

## दादरच्या 'मेयर' बिल्डिंगमध्ये

अनिच्छेनेच राजकरणात पडून केवळ नाइलाजाने कर्तव्य म्हणून सत्तास्थान स्वीकारणारे श्री. बांदोडकरांसारखे नेते फार विरळा. दिवसाचे चोवीस तास दिले तरी पुरणार नाहीत, असा श्री. बांदोडकरांचा खाणव्यवसाय आहे. या रसिक आणि प्रामाणिक उद्योगपतीला राजकरणाचा प्रथमापासून कंटाळा. आणि राजकारणातील खोटयानाटया डावपेचांचा तर मनस्वी तिटकारा. राजकारणात पडायचे नाही असे त्यांनी प्रथमपासून ठरवले होते. पण गोमंतकीयांच्या हाकेने त्यांना स्वस्थ बसू दिले नाही. आणि एकदा जनसत्तेची सूत्रे हाती आल्यानंतर त्यांना विरोधकांच्या कुजक्या हलकट कारवायांना तोंड देणे प्राप्त झाले. पण अतिशय धीमेपणाने आणि झुंजारपणे, जनहिताकडे सतत नजर ठेवन त्यांनी आपल्याविरुद्धच्या कोल्हेकुईला तोंड दिले.

गोमंतकीयांचे भवितव्य सुरक्षित राखले. आणि इच्छित ध्येयप्राप्ती जवळ यताच ते आपणहून सन्मानाने खुर्चीतून खाली उतरले.

बांदोडकरांची मुलाखतीसाठी 'माणूस' प्रतिनिधीची गाठ पडली ती मुंबईत दादरला त्यांच्या 'मेयर' बिल्डिंगमध्ये. दिवसभर उन्हात बसून रणजी ट्रॉफी क्रिकेटची मॅच बघून ते आले होते. थकून एका कोचावर बसले होते. एका बाजूला फायलींवर सह्या करीत, अधूनमधून येणाऱ्या टेलिफोनला उत्तरे देत, आल्या-गेल्याशी ते बोलत होते. मी त्यांना विचारले, "गोवा महाराष्ट्रात विलीन झाला की आपण राजकारण संन्यास घेणार असे ऐकतो?"

यावर ते हसून ते उत्तरले, "मला तर खूप वाटते. पण ते जमायला हवे ना. प्रथमापासून माझं असंच होत गेलं. महाराष्ट्रवादी गोमंतक पक्ष स्थापन केला तेव्हा मी ठरवलं होतं पक्षाचं अध्यक्षपद स्वीकारायच नाही. पण स्वीकारावंच लागलं. नंतर निवडणूकही लढवायची नाही असं ठरवलं. निवडणूक लढवली नाही पण पुढ एकदम मुख्यमंत्री व्हावं लागलं. आता मला विश्वास वाटत नाही. गोव्याच्या जनतेला मी आश्वासनं दिली आहेत. ती जर पूर्ण झाली नाहीत आणि जनतेची मला हाक आली तर जावंच लागेल—"

## सीधा समाजकार्यकर्ता

म्हणूनच त्यांची जेव्हा गोव्याच्या मुख्यमंत्रिपदावर निवड झाली तेव्हा त्यांनी केलेल्या महाराष्ट्राच्या दौऱ्यात त्यांच्या सर्व भाषणांचे सूत्र एकच होते—"मी एक शिपाईगडी आहे. जनतेची हाक आली म्हणून धावून आलो. तिच्या आकांक्षा पूर्ण करणे हे माझे कर्तव्य आहे. माझे काम पूर्ण झाले की मी कृतार्थ होईन."

राजकारणाच्या वायफळ चेष्टांपेक्षा प्रत्यक्ष भरीव काम करण्यावर श्री. बांदोडकरांचा भर आहे. त्यांचे सारे आयुष्यच तसे काम करण्यात गेले. १९११ साली मार्च महिन्याच्या बारा तारखेला श्री. दयानंद बांदोडकरांचा गोव्यातील पेडणे या गावी एका मध्यमवर्गीय व्यापारी घराण्यात जन्म झाला. अवघे आठ वर्षांचे वय असताना ते आणि त्यांची एक बहीण अशी ही दोन भावंडे पोरकी झाली. आणि त्यांच्या एका चुलत्याने त्यांचा सांभाळ केला.

परंतु त्यांच्यावरील चुलत्याचेही छत्र फार दिवस टिकले नाही. शालेय शिक्षण पूर्ण करून गोव्यातील महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण होण्याच्या बेतात असतानाच श्री. बांदोडकरांच्या चुलत्यांचेही देहावसान झाले. आणि कोवळ्या वयात स्वतःच्या आणि चुलत्याच्या कुटुंबाची जबाबदारी त्यांच्यावर येऊन पडली. बाहेर भारतात येऊन उच्च शिक्षण घेण्याची त्यांची आकांक्षा त्यांना सोडून द्यावी लागली.

श्री. बांदोडकरांनी मोठ्या धैर्याने आलेल्या संकटांना तोंड दिले. त्यांनी प्रथम काही दिवस शिक्षकी पेशा पत्करला. आणि त्याचबरोबर चुना, वाळू व रंग-कामाच्या घरच्या व्यापारातही ते लक्ष घालू लागले. व्यापारात ते चांगली प्रगती

करीत होते. पण एवढ्या संकुचित क्षेत्रात त्यांच्या कर्तबगारीला वाव मिळत नव्हता. त्यांना मोठे धाडसाचे क्षेत्र हवे होते.

### क्षेत्र सापडले

गोव्यातच दूरच्या एका शेतात बांदोडकरांची एक लहानशी खाण होती. ती साधारण तोटयातच चालत होती. एके दिवशी अचानक या खाणीत लोखंडी खनिजांचे आणि मँगेनीजचे प्रचंड साठे असल्याचे आढळून आले, तेव्हा त्यांना त्यांचे खरे क्षेत्र सापडले. ज्या जागेत ी खनिजे सापडली ती जागा चांगल्या रस्त्यापासून बरीच दूर होती आणि तेथपर्यंत रस्ता करणे अतिशय कठीण काम होते. ज्या ज्या तंत्रज्ञांना बांदोडकरांनी गाठले त्या सर्वांनी तो रस्ता करणे अशक्य आहे म्हणून काम हाती घेण्यास नकार दिला.

मग बांदोडकरांनी स्वत:च ते काम हाती घेतले. आजूबाजूच्या गावकऱ्यांना त्यांनी मदतीला घेतले आणि केवळ स्वत:च्या कल्पनांच्या बळावर त्यांनी तो रस्ता बांधायला घेतला. ते स्वत: हाती कुदळ–फावडी घेऊन आपल्या मजुरांबरोबर खपत आणि घाम गाळीत. तंत्रज्ञांनी 'अशक्य' म्हणून सांगितलेला तो रस्ता बांदोडकरांनी अशिक्षित खेडुतांच्या मदतीने तीन वर्षांत बांधून पूर्ण केला. या घटनेने त्यांच्या आयुष्याला एकदम कलाटणी मिळाली. मजुरांमध्ये प्रत्यक्ष खपत असल्यामुळे त्यांना प्रचंड लोकप्रियता लाभू लागली. धंद्यातही त्यांचा चांगलाच जम बसू लागला.

कीर्ती, मान आणि संपत्ती त्यांना चारी दिशांनी मिळत होती आणि दोन्ही हातांनी ते मुक्तपणे अनेक धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक संस्थांना, गोरगरिबांना दान करीत होते. लवकरच त्यांनी एक दानशूर उद्योगपती आणि कळकळीचा समाजकार्यकर्ता म्हणून गोव्यात नाव कमावले. भाऊसाहेब बांदोडकरांना ओळखणार नाही, असा एक माणूसही गोव्यात सापडेनासा झाला.

समाजकार्यावर, शिक्षणसंस्थांवर भाऊसाहेबांचा जसा वरदहस्त होता तसाच पोर्तुगीज राजवटीत चालू असलेल्या भूमिगत क्रांतीकारकांवरही. या राष्ट्रीय क्रांतीकारकांना भाऊसाहेबांचा सतत पाठिंबा असे आणि वेळोवेळी ते भूमिगतांना वाटेल तेवढी आर्थिक मदत देत. भूमिगत कार्यकर्त्यांना मदत केल्याच्या आरोपावरून १९५६ साली पोर्तुगीज राजवटीने त्यांना दोन महिन्यांची तुरुंगवासाची शिक्षाही दिली होती.

भारताच्या मुक्तिसेना जेव्हा गोव्यात घुसल्या तेव्हा बांदोडकरांनी मुक्तहस्ते मिठाई आणि अन्न वाटून जवानांचे स्वागत केले. संस्कृती, भाषा, समाज, व्यापार, शिक्षण, दळणवळण या बाबतींत नेहमीच महाराष्ट्रावर अवलंबून असलेले गोमंतक महाराष्ट्राचाच अविभाज्य भाग आहे, अशी श्री. बांदोडकर यांची खात्री होती आणि त्यामुळे गोव्याचे भारतात सामीलीकरण होताच त्याचे लवकरच महाराष्ट्रात विलीनीकरण होईल अशी त्यांची अपेक्षा होती.

## मडकईची पोटनिवडणूक

परंतु राजकारण वेगळे खेळले जात होते. गोमंतकातल्या मूठभर उद्योगपतींना आपल्या स्वार्थासाठी गोवा महाराष्ट्रात विलीन होणे मान्य नव्हते. पोर्तुगीज राजवटीत ज्यांनी भारतात सामीलीकरणास विरोध केला त्या लोकांनी आणि नेहमीच महाराष्ट्रविरोधी पवित्रे घेणाऱ्या लोकांनी या मूठभर लोकांची तळी उचलून धरली.

गोव्याच्या निवडणुका जवळ आल्या तशी महाराष्ट्रीय गोमंतक पक्षाची स्थापना झाली. पक्षाचे अध्यक्षपद आपणहून श्री. बांदोडकरांकडे चालत आले. बांदोडकरांनी हिरीरीने निवडणुका लढविल्या. महाराष्ट्रवादी गोमंतक पक्ष सत्तेवर आला आणि स्वतः निवडणूक लढविली नसतानाही पुन्हा श्री. बांदोडकरांच्याच गळ्यात नेतेपदाची माळ पडली. त्यांना मुख्यमंत्रिपद स्वीकारावे लागले.

मुख्यमंत्रिपद स्वीकारल्यावर श्री. बांदोडकरांना सहा महिन्यांच्या आत विधानसभेवर निवडून येणे भाग होते. मडकई मतदारसंघातून श्री. वसंतराव वेलिंगकर हे गोमंतक विधानसभेवर सर्वाधिक मते मिळवून आले होते. त्यांनी राजीनामा देऊन श्री. बांदोडकरांना ती जागा खाली करून दिली.

मडकई मतदारसंघातील ही पोटनिवडणूक खूप गाजली. युनायटेड गोवन्स पक्षाने श्री. बांदोडकरांच्या विरुद्ध पुरुषोत्तम तारी यांना उभे केले होते. बांदोडकरांच्या विरुद्ध वैयक्तिक निंदानालस्तीने भरलेला प्रचार करण्याची यु. गो. ने शिकस्त केली. मडगावच्या 'राष्ट्रमत' या मराठी आणि 'सोत' (सत्य) या कोकणी दैनिकांनी सभ्यतेच्या साऱ्या मर्यादा सोडून दिल्या होत्या. पुरुषोत्तम तारी यांचे निवडणुकीचे चिन्ह होते हात. "हा हात सेंट झेवियरचा आहे, म्हणून या हातालाच मते द्या" असाही प्रचार यु. गो. ने केला. पण बांदोडकरांची लोकप्रियता प्रचंड होती. ख्रिश्चन, हिंदू साऱ्यांनी भरभरून आपली मते बांदोडकरांनाच टाकली आणि श्री. वेलिंगकर यांचा विक्रम मोडून, प्रचंड बहुमताने ९० टक्क्यांच्यावर मते मिळवून श्री. बांदोडकर विजयी झाले.

महाराष्ट्रवादी गोमंतक पक्षात दोन गट होते. शंभू पालेकर, पो. पु. शिरोडकर आदी त्वरित विलीनीकरणवाद्यांचा एक आणि सबुरीने घ्या म्हणणाऱ्यांचा दुसरा. बांदोडकरांनी या दोहोतला सुवर्णमध्य घेतला होता. विलीनीकरण अटळ आहे. पण त्यासाठी घटनात्मक मार्गाने जाऊ. घाई नको. विलीनीकरणविरोधी मते आणि मने समजून घेऊन त्यांच्यांत आत्मविश्वास निर्माण करू, हे त्यांचे धोरण होते व त्या दिशेने त्यांची वाटचाल चालू होती.

## विरोधकांच्या कारवाया

श्री. बांदोडकर यांच्या मंत्रिमंडळाला बदनाम करण्यासाठी, त्यांची नाचक्की करण्यासाठी युनायटेड गोवन्स आणि काँग्रेस यांनी एकत्र येऊन नाही नाही ते विफल प्रयत्न केले. तथाकथित गोवा काँग्रेसलाही गोमंतकाचे महाराष्ट्रात विलीनीकरण

नको होते. गोवे केंद्रशासितच हवे होते. पांडुरंग मुळगावकर आणि पुरुषोत्तम काकोडकर हे या काँग्रेसचे म्होरके. वेळोवेळी बांदोडकर मंत्रिमंडळाची अडवणूक करण्याचे त्यांचे धोरण. पण बांदोडकर त्यांना पुरून उरले.

गोवा काँग्रेसचे अध्यक्ष श्री. पुरुषोत्तम काकोडकर हे एक नंबरचे अस्थिर, चंचल, संशयी, कारस्थानी, हेकेखोर, विफलता आलेले गृहस्थ. बांदोडकर मंत्रिमंडळाला बदनाम करण्यासाठी अनेक युक्त्या-प्रयुक्त्या त्यांनी योजून पाहण्याचा प्रयत्न केला. पण त्या सर्व त्यांच्याच अंगाशी आल्या. पं. जवाहरलाल नेहरूंच्या अस्थींचे प्रकरण तर खूपच गाजले. काँग्रेसचे अध्यक्ष या नात्याने काकोडकर अस्थी आणण्यासाठी म्हणून दिल्लीला गेले. अमुक विमानान अस्थी घेऊन येणार म्हणून त्यांनी पणजीला कळविले. इकडे श्री. बांदोडकरांनी अस्थींच्या स्वागताची जय्यत तयारी करून ठेवली होती. हजारोंचा समुदाय स्वागतासाठी पणजी विमानतळावर जमला होता. अस्थींची मिरवणूक ज्या मार्गाने जाणार होती त्या रस्त्यावर लोक दुतर्फा दाटी-वाटीने उभे होते. सारा सरकारी बंदोबस्त जय्यत तयार होता. स्वत: बांदोडकर विमानतळावर अस्थी स्वीकारण्यास आपल्या मंत्रिमंडळासकट आले होते. विमान आले. काकोडकर खाली उतरले. पण त्यांच्या हाती अस्थीकलश कुठे होता ? त्यांनी सांगितले, " मला वाटलं मुख्यमंत्री स्वत:च जातीन अस्थी आणणार आहेत. "

ऐन वेळी बांदोडकरांचा घात करण्याचा हा डाव होता. श्री. बांदोडकरांनी लगेच दुसऱ्या विमानाने अस्थी आणल्या व प्रसंग साजरा केला.

गोवा काँग्रेसमध्ये अनेक भानगडी झाल्या. मारामाऱ्या झाल्या आणि शेवटी एके दिवशी काकोडकर गुपचूपपणे मुंबईतून नाहीसे झाले. आणि अशा रीतीने नाहीसे झाले की महाराष्ट्रावर आणि बांदोडकरांवर संशय यावा. त्याप्रमाणे बांदोड-करांच्या हितशत्रूंनी त्यांच्यावर नाही नाही ते आरोप केलेच. भगवी वस्त्रे परिधान केलेले काकोडकर हृषिकेशला सापडले तेव्हा या प्रकरणावर पडदा पडला.

युनायटेड गोवन्स आणि काँग्रेसने हातमिळवणी करून गोमंतक विधानसभेत आतून व बाहेरून वेळोवेळी अडवणूक करण्याचे धोरण स्वीकारले. निदर्शने, चळ-वळी यांचे सत्र मोडन देशात बांदोडकरांवि द्ध आणि महाराष्ट्राविरुद्ध प्रचार करा-यला सुरुवात केली. विधानसभेत असहकाराचे धोरण स्वीकारून दोन वेळ अविश्वा-साचे ठराव आणले. तरी मुळीही तोल न ढळू देता बांदोडकरांनी या संकटांना धीमे-पणाने तोंड दिले.

**म्हार्दोळचे देऊळ आणि म्हापशाचे चर्च**

यु. गो. आणि काँग्रेसचे लोक बांदोडकरांवर जे आक्षेप घेत त्यांमध्ये ते जातीय आहेत आणि ख्रिश्चनांची गळचेपी करतात असा एक अत्यंत हास्यास्पद आरोप होता. त्या आरोपामुळे बांदोडकरांना जेव दु:ख होत असेल, त्यापेक्षा जास्तच शरम त्या आरोप घेणारांना मनोमन वाटत असली पाहिजे. मडकई मतदार संघातील

ख्रिश्चनांनी ज्या प्रमाणात बांदोडकरांना मते टाकली त्यावरून या आरोपाला परस्परच उत्तर मिळते. पण त्याचबरोबर बांदोडकरांनी किती चर्चेसना मदत केली ? किती ख्रिश्चन विद्यार्थ्यांचे शिक्षण केले ही आकडेवारी काढली तर या आरोपातला मूर्खपणा कळून येईल. धार्मिक आणि सामाजिक बाबतींत त्यांची दृष्टी विशाल आणि सर्वव्यापक आहे. हिंदू, ख्रिश्चन, मुस्लीम या साऱ्यांच्याच शाळांना ते सारख्याच प्रेमाने मदत करतात. कोणत्याही जातिजमातीच्या विद्यार्थ्याला त्यांची मदत मिळते. म्हार्दोळच्या देवळाचे जसे त्यांनी पुनरुज्जीवन केले, तसेच म्हापशाच्या चर्चच्या दुरुस्तीसाठी जो निधीं जमविण्यात आला होता त्यामध्येही सर्वांत मोठी देणगी बांदोडकरांची आहे.

बांदोडकरांवर चिखलफेक करण्यात जॅक सिक्वेरा आदी यु. गो. च्या पुढाऱ्यांपेक्षाही आघाडीवर होती ती काकोडकर, बा. म. ऊर्फ बाकीबाव बोरकर, आचार्य काका कालेलकर आणि म्हैसूर प्रदेश कॉंग्रेसचे नेते आणि मंत्री ही मंडळी !

आजपर्यंत सीध्या मार्गाने गेलेल्या, कधी कुणाचे वाकडे बोलणे न ऐकलेल्या बांदोडकरांना राजकारणातील ही अनपेक्षित चिखलफेक फारच जाणवली. त्यांना राग येत होता; पण जास्त वाईट वाटत होते. पण तरीही कर्तव्यबुद्धीने ते झुंजारपण हे सारे हल्ले प्रभावीपणे परतवून लावीत होते. विधानसभेतले सर्वच्या सर्व अविश्वासाचे ठराव फेटाळून लावण्यात आले.

दरम्यान महाराष्ट्रात विलीनीकरण करण्यासाठी बांदोडकरांचे प्रयत्न चालूच होते. निवडणुकांनंतरही गोव्याचे शासन भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाकडेच होते. बांदोडकरांनी हा कारभार गृहमंत्रालयाकडे सोपवावा म्हणून कितीतरी शिष्टमंडळे नेली, विनंत्या केल्या. शेवटी गृहखात्याकडे कारभार आले. श्री. दामले हे गोव्याचे लेफ्टनंट गव्हर्नर म्हणून आले. महाराष्ट्रात विलीनीकरण करण्याचा ठराव विधानसभेत मांडून तो संमत केला. राजीनामे, उपोषण, या सर्व मार्गांचे धाक घालून पाहिले.

## दोन सभा

कै. लाल बहादूर शास्त्री यांचा गोमंतकाचे महाराष्ट्रात विलीनीकरण करण्यास पाठिंबा असावा. कारण गोमंतकातील निवडणुकांच्या वेळेस शास्त्री प्रचाराला गोव्यात गले होते. काकोडकरांच्या प्रचारासाठी शास्त्री आणि चव्हाण यांच्या सभेला शेपन्नासही श्रोते नाहीत आणि समोरच महाराष्ट्रवादी गोमंतकपक्षाच्या विठ्ठल करमाळींच्या सभेला हजारोंच्या संख्येने जनसागर लोटला आहे हे शास्त्रींनी स्वत: पाहिले होते. वातावरणाचा अंदाज घेतला होता. ते पंतप्रधान असतानाच गोव्याचा कारभार गृहखात्याकडे आला होता. म्हणूनच बांदोडकरांना गोव्याचे महाराष्ट्रात विलीनीकरण होणे अटळ आहे, असे वाटत होते. आणि त्याच श्रद्धेने ते राजकारणातला निखळ प्रवास करीत होते. आता गोव्याचे विलीनीकरण जवळ आले. त्यांचे

स्वप्न साकार होत आले. तपस्येचे फळ जवळ आले आहे.

## 'भाऊं'चे सामाजिक कार्य

परंतु राजकारणापेक्षा प्रत्यक्ष भरीव कार्यावर बांदोडकरांचा अधिक विश्वास. देणग्यांच्या आणि प्रत्यक्ष कार्याच्या रूपाने बांदोडकरांनी गोव्यातील शिक्षण प्रसाराला प्रचंड हातभार लावला आहे. कित्येक वर्षांपूर्वी सुरू केलेल्या मुष्टिफंडातून आज अनेक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. दर वर्षी ते गोव्यातील वीस कॉलेज विद्यार्थ्यांना आणि तीनशे शाळा विद्यार्थ्यांना 'साखळी' शिष्यवृत्त्या देतात. शिष्यवृत्ती मिळणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याने आपले शिक्षण पूर्ण झाल्यावर आपल्यासारख्याच एका होतकरू विद्यार्थ्याला मदत करावी, अशी ी साखळी पद्धत आहे. 'गोवा एज्युकेशन सोसायटी' या ख्यातनाम शिक्षण संस्थेचे ते संस्थापक आहेत. गोव्यातील आणि महाराष्ट्रातील अनेक शाळांना त्यांनी आश्रय दिला आहे. आपण दिलेली मदत ही योग्य रीतीने वापरली जाते आहे की नाही याकडे त्यांचे लक्ष असते. महाराष्ट्रातील एका सुप्रसिद्ध देवालयाला त्यांनी कित्येक लाखांचे अनुदान दिले होते. पण त्याचा दुरुपयोग होतो आहे असे बघताच त्यांनी ते अनुदान तावडतोब बंद केले.

मर्दानी खेळांबरोबरच शास्त्रीय संगीत, नाटके यांचीही बांदोडकरांना आवड आहे. ते स्वतः शिकार उत्तम करतात. क्रिकेट व फुटबॉलही खेळतात. क्रिकेटचे त्यांचे वेड सर्वश्रुत आहे. पणजीमधले एकुलते एक क्रिकेट मैदान त्यांनीच बांधून दिले. मैदानाचे नावच आहे 'बांदोडकर मैदान.' तऱ्हतऱ्हेची कुत्री पाळण्याचा त्यांना षौक आहे.

बांदोडकरांच्या घरचे वातावरण अत्यंत शालीन आणि भाविक आहे. सकाळी उठल्याबरोबर त्यांचा पहिला तास देवपूजेत जातो. त्यांच्या चार मुली आणि एक मुलगाही लोकसेवेच्या बाबतीत आपल्या कर्तृत्ववान पित्याचाच कित्ता गिरवतात. मडगावच्या मराठी साहित्य संमेलनाला त्यांनी बरीच मदत दिली. त्याचप्रमाणे सेंट झेवियरच्या शवप्रदर्शनाचीही व्यवस्था त्यांनी जातीने पाहिली. गोमंतकातले सारेच गोरगरीब बांदोडकरांना अक्षरशः देव मानतात. कुठल्याही गावात 'भाऊ' गेले तरी त्यांचा शब्द खाली पडत नाही. हिंदू-ख्रिश्चन सारेच त्यांना मानतात.

## धर्म नव्हे, व्यक्तिगत स्वार्थ

म्हणूनच बांदोडकर म्हणतात, "महाराष्ट्रवादी आणि महाराष्ट्रविरोधी असे जे दोन तट गोव्यात आहेत त्यांची हिंदू आणि ख्रिश्चन गट अशी गफलत करू नका. केवळ धार्मिक वेगळेपणा म्हणून ख्रिश्चनच गोव्याचा वेगळा प्रांत मागत आहेत असे मुळीच नाही. या मागणीमागे धर्म नाही. काही लोकांचा केवळ व्यक्तिगत स्वार्थ आहे. सारी ख्रिश्चन जनता स्वतंत्र गोवावाद्यांच्या बाजूने मुळीच नाही."

"या स्वतंत्र गोव्याच्या मागणीमागे काही परकीय हात असण्याची शक्यता आहे का?" असे मी विचारता श्री. बांदोडकर म्हणाले, "काही चर्चेसचा या मागणीला

पाठिंबा असला पाहिजे. त्याशिवाय त्यांना जे कोटचवधी रुपय मिळतात ते कोठून येतात ? काही परकीय चर्चेसना गोवा हे आशियातील 'रोम' राहावे असे वाटते. आपली ही इच्छा पूर्ण करण्यासाठी काही परकीय संस्थांनी १९५५ मध्ये ब्राझील-मध्ये एक संघटनाही स्थापन केली होती. रोमन कॅथॉलिकांच्या या संघटनेत खुद्द गोमंतकीय मात्र कुणीच नव्हते."

गोव्याचे 'सांस्कृतिक वैशिष्टच', गोव्याची 'आगळी संस्कृती' म्हणून जे लोक नारे लावतात त्यांची बांदोडकरांना गंमत वाटते. ते म्हणतात, "गोवा हा सांस्कृतिक-दृष्टचा महाराष्ट्राचा आणि भारताचा अविभाज्य घटक आहे. मडमांसारखे फ्रॉक घालणे, युरोपियन पद्धतीने नाचणे आणि बारमध्ये जाऊन बसणे याच गोष्टींना काही लोक आपले 'सांस्कृतिक वैशिष्टच' समजत असतील तर भारतातल्या मोठचा शहरांमधल्या कोणत्याही हॉटेलमधून या साऱ्या गोष्टी दिसतील, त्यापेक्षा काही वेगळेपणा गोव्यात आहे, असे मला वाटत नाही."

बांदोडकर पुढे मला म्हणाले, "भारत आणि महाराष्ट्र याविषयींचं अज्ञान आणि स्वतःविषयींचा अहंगंड यातून बहुधा ही वेगळचा सांस्कृतिक वैशिष्टचाची भावना निर्माण झाली असावी. त्या छोटचाशा पोर्तुगीज राजवटीच्या कोंदट हवेत आम्ही राहत होतो. बाहेरचे जग पाहिले नव्हते त्यामुळे 'माझाच बाबल्या चांगला' असं काही लोकांना वाटू लागलं. तो स्वभावगुण आहे. काही लोक स्वतःला फार शहाणे समजतात. गोव्याचे मंत्रिमंडळ बनवण्यासाठी मी प्रथम दिल्लीला गेलो तेव्हा या शहाण्यांमधली काही मातब्बर मंडळी माझ्याबरोबर होती. त्यांना वाटत होतं दिल्लीत असून असून काय असणार ? आपण तेथे सहज जम बसवू. पण जेव्हा त्यांनी तिकडचे हुशार सेक्रेटरी वगैरे पाहिले तेव्हाच माझ्याजवळ कबूल केलं की गोव्याबाहेरही बुद्धिमत्ता आहे. मला वाटते अशाच अज्ञानामधून हा सांस्कृतिक वैशिष्टचाचा गंड निर्माण केला गेला आहे."

बोलण्याच्या ओघात विदर्भ आणि मराठवाडा महाराष्ट्रात विलीन झाल्या-वर आपल्यावर अन्याय होत असल्याच्या तक्रारी तेथील लोक सतत करीत अस-तात, याकडे मी बांदोडकरांचे लक्ष वेधले.

बांदोडकर म्हणाले, "जोवर खुद्द जनतेमध्येच जाणीव नाही आणि स्वतःच्या विकासासाठी कसोशीचे प्रयत्न करण्याची तयारी नाही तोवर तिचा विकासच होणार नाही. ती जाणीव नसली म्हणजे मग अन्याय झाल्यासारखे वाटते. गोव्या-तल्या जनतेत ती जाणीव भरपूर आहे. म्हणून गोमंतक केव्हाच मागे पडणार नाही. गोमंतक मुंबईपासून त्या मानाने फारच जवळ आहे. गोमंतकीयांची राजकीय तयारी बरीच आहे. औद्योगीकरणाचीही चांगली तयारी आहे. फक्त व्यापक वाव मात्र हवा. हा वाव कसा मिळवावा हे आम्हा गोमंतकीयांना चांगलं ठाऊक आहे. महा-राष्ट्रात व्यापारी जाणीव नाही. गोमंतकीयांत त्या मानाने ती बरीच आहे–"

**प्रश्न :** " गोवा महाराष्ट्राबाहेर राहूनच त्याची अधिक प्रगती होईल. दरवर्षी केंद्र सरकारकडून मिळणारे आर्थिक अनुदान पदरात पाडून घेता येईल असे मुद्दे मांडले जातात ते खरे आहेत काय ? "

**बांदोडकर :** " आर्थिक अनुदानाविषयीच म्हणायचं झालं तर केंद्र सरकार जेवढं अनुदान देतं तेवढंच द्यायची तयारी महाराष्ट्र सरकारने दाखवली आहे. दुसरं म्हणजे केंद्रीय नोकर आपुलकीच्या भावनेनं कधीच काम करीत नाहीत. त्यांना कामाची घाई नसते. १० लाख रुपयांच्या वरखर्च असला की तो दिल्लीहून मंजूर व्हावा लागतो. त्याची फाईल सहा सहा महिने पडून असते. मग कामं भराभर कशी उरकली जातील ? कामाचं प्रोसिजर लांबलचक त्यामुळे बरेचसे पैसे खर्चच होत नाहीत. मग वर्ष संपत आलं की फेब्रुवारी–मार्च महिन्यांत घाईघाईने सगळे पैसे खर्च करायचे. अधिकारी समरस होत नाहीत. ते आपल्या खुर्चीवर गुर्मीत बसून असतात. आणि त्यांच्याविरुद्ध आम्ही काही ॲक्शन घेऊ शकत नाही –

## बांदोडकर आणि दैव

**गेल्या निवडणूकीपूर्वी तीन पक्ष जोरात होते. ते म्हणजे काँग्रेस, युनायटेड गोवन्स आणि महाराष्ट्रवादी गोमंतक. काँग्रेसचे पुरुषोत्तम काकोडकर हे काँग्रेस हा पक्ष हिंदुस्थानांत मोठा आहे. त्याचा 'अश्वमेघ' कोणीही, कुठेही रोखू शकत नाही तेव्हा काँग्रेस निश्चित विजयी होऊन आपण मुख्य मंत्री होणार असे सांगत होते.**

**युनायटेड गोवन्सचे डॉ. जॅक सिकेरा ह्यांनी निवडणुकांचे पहिल्या दिवशीच्या निकालावर आपणच मुख्यमंत्री होणार असे निश्चित केले होते; आणि तसे सर्वांना वाटत होते कारण पहिल्या दिवशी फक्त १२ जणांची मतमोजणी झाली त्यांत १० जागा यु. गो. ला मिळाल्या होत्या.**

**महाराष्ट्रवादी गोमंतक पक्षाला सर्वांत जास्त जागा मिळाल्या. ३० पैकी १६. तेव्हां श्री. पांडुरंग पुरुषोत्तम शिरोडकर हे आपणच आता निश्चित मुख्यमंत्री होणार म्हणून धरून चालले होते; कारण बांदोडकर हे निवडणुकीला उभे राहिलेच नव्हते.**

**हे तीनही पक्ष आणि तीन प्रमुख, मुख्यमंत्री होणार म्हणून मांडे खात होते. परंतु म. गो. पक्षाने नेतेपदी श्री. भाऊ बांदोडकरच पाहिजेत असा ठराव केला. नंतर बांदोडकरांसाठी एकाने राजीनामा दिला. त्या जागी बांदोडकर निवडून आले, आणि मुख्यमंत्री झाले. श्री. शिरोडकर हे सभापती झाले, डॉ. जॅक सिकेरा विरोधी पक्षनेते झाले आणि श्री. पुरुषोत्तम काकोडकर वनवासाला गेले.**

" – शिवाय आताची सगळी नोकरशाहीची चौकट अत्यंत खर्चिक आहे. **साडेसहा लाख वस्तीच्या गोमंतकाला अकरा हजार सरकारी कर्मचारी आणि त्यांच्यावरचा खर्च चार कोट रुपये. उत्पन्न मात्र जेमतेम सव्वातीन कोट रुपये. एवढा अवास्तव खर्च दुसरीकडे कुठेच होत नसेल.** थोडक्यात म्हणजे स्वतंत्र राज्य म्हणून राहणे गोमंतकाला मुळीच हितकारक नाही.

गोव्याच्या औद्योगिक क्षमतेबद्दल बोलताना बांदोडकर म्हणाले, " खाण व्यवसाय आणि कापड गिरण्यांचा व्यवसाय यांना गोव्यात भरपूर वाव असला तरी गोव्यात खरा भर स्मॉल स्केल इंडस्ट्रीजवर हवा. त्या दृष्टीने प्रयत्नही चालू आहेत. गोव्यातील मध्यम वर्ग आणि कनिष्ठ वर्ग हे अत्यंत उद्योगी आहेत. लघुउद्योग हे त्यांना खूप हितकारक ठरतील. त्यामुळे मोठ्या कारखान्यांवर गोव्याच्या विकासयोजनांवर विशेष भर नाही. "

## बांदोडकर आणि नेहरू

गेल्या निवडणुकीत पोर्तुगीजधार्जिणा युनायटेड गोवन्स पक्ष विजयी व्हावा, बहुमताने निवडून यावा आणि ख्रिश्चनांचे प्राबल्य तसेच राहावे, गोव्याचे 'पूर्वेकडील रोम' व्हावे म्हणून परदेशांतून पुष्कळच पैसा आला. पोर्तुगाल आणि रोमहून या निवडणूकीसाठी ३॥ लाख ( साडेतीन लाख रुपये ) रुपये गोव्यात आले. गोव्यातील चर्चमधून व्यवस्थित रीत्या हे पैसे इलेक्शनसाठी वाटले गेले. हे पैसे रोमच्या पोपचे प्रतिनिधी श्री. नाक्स आणि गोव्याचे बिशप फादर श्री. रिबेलो यांचे नावे आले होते. त्यांनी हे पैसे निवडणुकीसाठी वापरले. ह्या पैशाच्या सर्व पत्रव्यवहाराच्या प्रती (Photo-copy) नेहरूंना बांदोडकरांनी दाखविल्या. ही गोष्ट श्री. नॉक्स यांना कळतांच 'ते सर्व खोटं आहे' असे त्यांनी नेहरूंना सांगितले आणि ते सर्व Record जाळण्यात आले. पं. नेहरूंनी श्री. नाक्सवर विश्वास ठेवून ह्या घटनेकडे दुर्लक्ष केले. कारण बांदोडकरांविरुद्ध श्री. नेहरू विश्वास ठवायला तयार नव्हते, कारण बांदोडकरांनी कॉंग्रेसचा पराभव केला होता, अनामत रकमा जप्त केल्या त्या.

आणि श्री. नाक्स आणि फादर रिबेलो यांनी फक्त भारताविरुद्ध अपप्रचार करून नेहरूंना शिव्या दिल्या होत्या.

## खुर्चीची हौस नाही

ओपीनियन पोलविषयी श्री. बांदोडकरांना विचारलं तेव्हा पोलमध्ये इतर प्रांतांतील गोमंतकीय भाग घेऊ शकणार की नाही, याविषयी केंद्र सरकारने निर्णय घ्यायचा होता. पण बाहेरच्या लोकांना मतदानाचा हक्क मिळण्याचा संभव नाही, असं त्यांनी सांगितलं. बहुधा त्यांना तशा प्रकारचं आश्वासन मिळालं असावं. ते म्हणाले, अंतर्गत प्रश्नांसाठी जनमत कौल घेण्यास काहीच हरकत नाही. शिवाय या कौलाची जबाबदारी केंद्र सरकार घेत असल्यावर तर त्याविषयी वादंग माजविण्याचं काहीच कारण नाही.

निरोप घेताना श्री. बांदोडकरांचे नेहमीचे लेटर पॅड पाहायला मिळाले. त्यावर नुसतं साधं 'डी. बी. बांदोडकर, पणजी, गोवा' असं लिहिलं होतं. बांदोडकर म्हणाले, "मुख्यमंत्री होऊन तीन वर्षं झालीत पण मी हेच पॅड वापरतो. त्यावर 'मुख्यमंत्री' असंही मी घातलं नाही मुद्दामच. खुर्चीतून केव्हाही खाली उतरायची माझी तयारी आहे. काही टवाळखोर म्हणतात, खुर्चीची मला हौस आहे. त्यांनी हे

### गोव्यातील जनतेकडून अपेक्षा

मातींत लोळणारा एक पोरगा. डोंगर-दऱ्याखोऱ्यांतून सावजांच्या पाठीमागे धावणारा शिकारी, स्वतः माती उपसून, समाजाला मदत करून मुख्यमंत्री झाला. सोन्याची फुले उधळीत लक्ष्मी याच्या घरी आली. आणि अजूनही ते, ही फुले समाजावर उधळतात. का नाही समाज त्यांच्या पाठीशी असणार !

गोव्याच्या मातीचे सोने होत आहे. बांदोडकर मुख्यमंत्री असताना जर का कोठे गावाला गेले, तर सर्वजण त्यांना हात जोडून नमस्कार करतात. त्यांच्यावर फुले उधळतात. भाऊंनी त्यांना आता शिक्षण द्यावयास सुरुवात केली आहे. ह्या शिक्षणातून माझे लोक तयार होतील, ते ही माती काढतील आणि त्याचे सोने करतील ह्या त्यांच्या लोकांकडून अपेक्षा आहेत. समाजाने शिकावे, सुशिक्षित व्हावे, धंदे करावे, सधन व्हावे; आणि स्वतःच्या पायांवर उभे राहून राष्ट्रसेवा करावी.

आपल्या मातींत आपण सोने बनवायचे ते आपल्यासाठी. परक्यांसाठी नाही. त्यासाठी त्यांनी समाजाला पाठीशी घातले, समाजाला बरोबर घेतले आणि आता तो समाज महाराष्ट्रात यावा म्हणून, क्षणाचाही विलंब न करता, राजसत्तेचा त्याग करून परत आपला गोव्याच्या मातीत दोन हात करायला विरोधकांशी सिद्ध झाले त्यांना खात्री आहे, की विरोधकांचा फज्जा उडणार म्हणून.

—असे हे भाऊसाहेब बांदोडकर.

पॅड पाहावं –"

बांदोडकरांची वृत्ती धीमी आणि शांत आहे. क्षमाशील आहे. ते मोजके बोलतात आणि मुद्दा सोडून कधीच बोलण्याला फाटे फोडत नाहीत. लांबलचक भाषणे ठोकण्याचा त्यांना कंटाळा आहे; नव्हे ती राजकारणी वृत्तीच त्यांच्यात नाही. कुणी खोटे बोललेले त्यांना मुळीच खपत नाही. कुणी त्यांच्याशी खोटेपणा केला की त्यांना वाईट वाटते. ते अस्वस्थ होतात. शांतपणे, प्रामाणिकपणे, सत्याला चिकटून तत्त्वासाठी झुंज देण्याचा त्यांचा स्वभाव आहे. एकदा त्यांना एखाद्या गोष्टीची सत्यता पटली तर त्यासाठी ते वाटेल ते कष्ट घेतील, चिकाटीने त्या गोष्टीमागे लागतील. मुख्यमंत्रिपदाचा त्यांनी कधी पगार घेतला नाही की सरकारी गाडी वापरली नाही.

गोवा महाराष्ट्रात विलीन होताच राजकारणातून निवृत्त होण्याची बांदोडकरांची खूप इच्छा आहे. पण विलीनीकरण झाले तरी त्यांची ही इच्छा पूर्ण होईलच असे नाही. कारण गोमंतकीयांना अद्यापही त्यांची खूप गरज आहे. ●

## असे हे दातृत्व आहे.

आपल्या समाजाला आपल्या भाषेतून शिक्षण द्यावे अशा मताचे बांदोडकर आहेत. पोर्तुगीज काळात पोर्तुगीजशिवाय इतर भाषांना बंदी होती. मराठीची तोंडओळख होईल एवढेच शिक्षण. परंतु बांदोडकर मंत्रिमंडळ आल्यावर या मंत्रिमंडळाने ४५० शाळा बांधल्या. त्यांमधून ९७,००० मुले शिक्षण घेतात. त्यांपैकी ९०,००० (नव्वद हजार) मुले मराठी शिक्षण घेतात. ही प्रगती फक्त गेल्या तीन वर्षांतील आहे. ह्या शाळा बांधण्यास सेंट्रल गव्हर्नमेंटने ६० टक्क्यांपासून ९० टक्के मदत केली आहे. गेल्या वर्षी पाकिस्तानशी युद्ध सुरू झाले तेव्हा पंचवार्षिक योजनेत कपात करण्यात आली. त्यात गोव्याच्या शिक्षण खात्याच्या शाळांना ही झळ लागली. याच सुमारास एके दिवशी तीन शाळांचे उद्घाटन भाऊसाहेब करणार होते. आम्ही त्यांच्याबरोबर होतो. आदल्या दिवशी 'शिक्षण खात्यात कपात' करण्याची बातमी येऊन थडकली होती. गावच्या पुढाऱ्यांच्या मागण्या होत्या. त्या वेळी भाऊसाहेबांनी स्पष्ट सांगितले, 'यंदा झाले एवढंच सरकारचं, आपल्या भारत सरकारजवळ जादा पैसा नाही. युद्ध चालू आहे. राहिलेल्या कामासाठी माझे रु. ५,००० मी देतो. अशा रीतीने त्यांनी त्या दिवशी तीनही शाळांना मिळून १५,००० रु. दिले आणि सांगितले, सरकारवर अवलंबून राहू नका, दुसरीकडे मागू नका, स्वतःच स्वतःच्या पायांवर उभे राहा. असे हे दातृत्व आहे. तेव्हा नेतृत्व येतं.



**श्री.** नारायण भिकाजी राजगुरू, वय वर्षे ६८. यांना तुरुंगातील जीवनाचा तीस वर्षांचा अनुभव, कैदी म्हणून नव्हे तर सरकारी नोकर म्हणून. १९२४ साली ते त्या वेळच्या मुंबई इलाख्याच्या जेलखात्यात पुण्याला कारकून म्हणून लागले आणि १९५४ साली सेवानिवृत्त झाले. कारकून, मुख्य कारकून, हेड स्टुअर्ट, नायब जेलर, ऑफिस सुपरिंटेंडेंट म्हणून त्यांनी तुरुंगात कामे केली. या तीस वर्षांच्या नोकरीत त्यांनी धुळे, साबरमती (अहमदाबाद), शकारपूर (पाकिस्तान), येरवडा (पुणे), नाशिक, आर्थर रोड (मुंबई) व बेळगाव येथील तुरुंगांत भ्रमंती केली. त्यांचे काम मोक्याचे असल्याने त्यांचा संबंध खालचे शिपाई व कैदी यांच्याशी व वरचे अधिकारी यांच्याशीही अगदी जवळचा येत असे. त्यामुळे दोन्हीही गोटांतील जीवनाचा त्यांचा जवळून परिचय.

श्री. राजगुरु हे हुतात्मा शिवराम हरि राजगुरु यांच्याच घराण्यातील भगतसिंग कटाच्या वेळी त्यांच्या साऱ्याच घराण्याला त्रास झाला. यांच्याही घरी झडत्या वगैरे झाल्याच. पण त्याहीपेक्षा वेगळाच प्रसंग स्वतः श्री. नारायणराव राजगुरू यांच्यावर ओढवला होता. पण तो निभावला. भगतसिंग, सुखदेव व राजगुरू यांच्यावरील खटल्याचा निकाल लागला आणि त्यांना फाशीची शिक्षा झाली. त्यांना फाशी द्यावयाचे ठरले ते साबरमती तुरुंगात. त्या वेळेस श्री. नारायणराव राजगुरू हे साबरमती तुरुंगातच होते. फाशी जाणाऱ्यांचे मृत्यूपत्र लिहून घेण्याचे काम त्या वेळी ते करीत.

त्यांना जेव्हा या तीन क्रांतिकारकांना फाशी देण्यासाठी साबरमतीला आणणार, असे कळले, तेव्हा यांच्या मनाचा मोठा गोंधळ उडाला. नोकरी सरकारी

# शिकारपूरच्या तुरुंगात

निवेदक : श्री. नारायण भिकाजी राजगुरू

असली तरी त्यांचे रक्त क्रांतिकारकांच्या घराण्यातील होते. त्यांनी मोठी रजा घेण्याचे ठरविले. आकसाने रजा मंजूर न झाल्यास नोकरीवर लाथ मारण्याचाही निर्णय घेतला.

पण तो प्रसंग आला नाही. शेवटी क्रांतिकारकांना लाहोरच्या तुरुंगातच फाशी दिली.

राजगुरूंच्या घराण्यातील दुसरा हुतात्मा श्री. नारायणरावांच्याच पोटी जन्मला. त्यांचा चौथा मुलगा पॅराट्रूपर लान्स नाईक शरद हा भारत-पाकिस्तान लढ्यात गेल्या सहा सप्टेंबरला कामी आला. "बातमी आली तेव्हा घरावर कुऱ्हाड कोसळल्यासारखे वाटले. पण शास्त्रीजींचे स्वतःच्या हस्ताक्षरातील सांत्वनाचे पत्र आले, तेव्हा मनाला कसे बरे वाटले," राजगुरू सांगतात.

आज साताऱ्यात ते राहतात त्या रस्त्याला 'वीर शरद राजगुरू पथ' असे नाव देण्यात आले आहे.

सेवानिवृत्तीनंतर श्री. राजगुरू यांनी आपले घर साताऱ्याला हलविले. त्यांचे पाच मुलगे चांगल्या जागी नोकरी करीत आहेत व दोन मुलगे आणि एक मुलगी अजून शिकत आहेत.

वयोमानपरत्वे आणि दम्यामुळे कधी कधी त्यांची स्मृती दगा देते. पण आपल्या तुरुंगातील आठवणी सांगताना मात्र ते रंगून जातात. तासन् तास भान हरपून ते बोलत राहतात. आणि एकेक रोमांचकारक सत्यकथा त्यांच्या मुखातून बाहेर पडते.

**ही अशी एक सत्यकथा..........**

## : १ :

शिकारपूरच्या तुरुंगाच्या ऑफिसमध्ये आम्ही काम करीत बसलो होतो. जेलर-साहेब त्यांचे डोळे दुखत होते म्हणून त्या दिवशी रजेवर होते. त्यामुळे मी नायब जेलर असल्याने एवढ्या मोठ्या जेलची जबाबदारी माझ्यावरच होती. आत सात-आठशे कैदी होते आणि त्यातले बहुतेक निगरगट्ट असे बलुची पठाण होते.

तेवढ्यात एकाएकी 'अल्ला हो अकबर' असा जोराचा घोष तुरुंगाच्या आतल्या बाजूने ऐकू आला आणि पठाण कैद्यांचा एक मोठा जमाव एकच गिल्ला करीत तुरुंगाच्या मुख्य दाराच्या रोखाने येत असलेला दिसला. तो जमाव अगदी रक्त-बंबाळ झालेल्या आमच्या जमादाराचा पाठलाग करीत होता.

हे भयंकर दृश्य पाहताच आमच्या ऑफिसमधील साऱ्याच लोकांचे धाबे दणाणले. आमचे ऑफिस मेनगेटच्या शेजारीच होते. डॉक्टर, कंपाऊंडर, क्लार्क आणि दोन शिपाई ऑफिसमध्ये होते. ते सारे आपल्या खुर्च्यांवरून उड्या मारून पळाले. पळता पळता डॉक्टर ओरडले, "नायबसाहेब, चला पळा. मोठा दंगा आहे ......"

तो क्षण आठवला म्हणजे अजूनही माझ्या छातीत धडकी भरते. आयुष्यातल्या काही काही घटना अशा असतात, की त्या कधीच आपण विसरू शकत नाही. आणि जेव्हा जेव्हा त्यांची स्मृती जागृत होते तेव्हा क्षणभर तरी हृदयात धडकी भरल्या-वाचून राहत नाही. तशीच ही घटना होती.

१९३८ चे ते दिवस होते. शिकारपूरच्या तुरुंगाच्या स्टाफमध्ये मी त्या वेळी एकटाच मराठी माणूस होतो. त्या वेळच्या मुंबई इलाख्यात कर्नाटकापासून तो सिंध प्रांताच्या उत्तर सीमेपर्यंतचा मुलुख येत होता. आपली मराठी मंडळी सिंधमध्ये बदली करवून घेण्यास विशेष राजी नसायची. पण मी मात्र नवनवीन देश, लोक पाहण्यास आसुसलेला, त्यामुळे मोठ्या हौसेने शिकारपूरच्या तुरुंगात आलो होतो. शिकारपूर सक्कर जिल्ह्यामध्ये कराचीच्या उत्तरेस सुमारे अडीचशे मैलांवर आहे. सध्या ते पाकिस्तानात आहे.

तुरुंगाचा जेलर सिंधी होता. त्याच्या वर्तनामुळे कैद्यांचा त्याच्यावर मोठा राग. महिना-दोन महिन्यांतून तुरुंगातून राऊंड घेताना एखादा तरी कैदी अधून मधून त्याला धरून बडवीत असेच. कधी कधी दोन-चार कैदी आवारातल्या एखाद्या झुडुपाखाली लपून बसत आणि अचानक जेलरला पकडून ठोकून काढीत. अर्थात जेलरला आतल्या बातम्या सांगण्यासाठी चुगल्या करणारे कैदीही आत असायचेच. त्यामुळे अशा एखाद्या कटाची बातमी जेलरला कळली की तो त्या कैद्यांना आधीच धरून ठोकून काढीत असे.

या वैमनस्यातून कैद्याकैद्यांमध्येही आपापसांत मोठ्या मारामाऱ्या होत.

त्या दिवशी जेलरला कैद्यांनी केलेल्या एका मोठ्या कटाची बातमी कळली. सारे कैदी एकदम ऑफिसवर चाल करून येऊन जेलरचा त्या दिवशी खून करणार होते. तो घाबरला. त्याने मला चिठ्ठी पाठवली –' माझे डोळे फार दुखतात, काम करणे अशक्य आहे. तेव्हा मी आज जेलमध्ये येणार नाही. तुम्ही जा.'

जेलरचे सकाळचे पहिले काम म्हणजे जेल सुपरिटेंडेंटबरोबर सर्व जेलमधून राऊंड मारणे. राऊंड मारणे म्हणजे प्रथम साऱ्या जेलमधून चक्कर मारणे. प्रत्येक बरॅकची पाहणी करणे. सर्व व्यवस्थित आहे ना, याची खात्री करून घेणे आणि नंतर ज्या कैद्यांची शिक्षा पूर्ण झाली असेल त्यांना सोडून देणे.

त्याप्रमाणे सुपरिटेंडेंट आला. आम्ही दोघे आत गेलो. सुपरिटेंडेंटही सिंधीच होता. तो सुस्वभावी होता आणि माझा चांगलाच मित्र होता. त्याचा माझ्यावर विश्वासही होता. आम्ही दोघे राऊंड घेऊन आलो. सर्व ठाकठीक होते. पुढे काही घडणार आहे, याची यत्किंचितही कल्पना तेव्हा मला आली नाही. सुपरिटेंडेंटने रजिस्टरवर सह्या केल्या आणि तो सिव्हिल हॉस्पिटलमध्ये निघून गेला. आणि मी आमच्या ऑफिसमध्ये नेहमीप्रमाणे गेलो.

आणि एकाएकी दंगा झाला. 'अल्ला हो अकबर'चा घोष झाला आणि एकच गडबड उडाली. ऑफिसमधले सारे लोक पळून गेले. चार-पाचशे कैदी गिल्ला करीत हातात काठ्या, दगड, लोखंडी सळ्या घेऊन ऑफिसच्या रोखाने येऊ लागले. जेलच्या आत बंदोबस्तासाठी ठेवलेले शिपाई कुठे लपून बसले होते कुणास ठाऊक. मी क्षणभर घाबरलो. काय करावे ते सुचेना. जेलचा मीच इन्चार्ज होतो. मी पळून गेलो असतो तर माझ्यावर ठपका आला असता आणि तेथेच राहिलो असतो तर जिवावरचा धोका होता. मी ठरवले काय होईल ते होवो. घाबरून पळायचे नाही.

त्या कैद्यांनी पद्धतशीर कटच केला होता. जेवण झाल्यानंतर ते एकदम उठले आणि चगल्या करणाऱ्या कैद्यांच्या अंगावर धावून गेले. जेलच्या स्वयंपाकखान्यात दोघांचे खून पडले. बंदोबस्ताचे बरेचसे शिपाई जेलरच्या वर्तनावर आणि त्याच्या खाबूगिरीवर नाखूष होते. कैद्यांचा तो धिंगाणा पाहून ते लपून बसले. काही कैदी जमादाराच्या अंगावर धावून गेले. हा जमादार माझ्या बंगल्याच्या आऊट हाऊसमध्ये राहत होता. मी महाराष्ट्रीय, त्यातल्या त्यात पुण्याचा. त्या वेळी मुंबई इलाख्याचे इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलिसचे ऑफिस पुण्यालाच होते. त्यामुळे हा आपल्याविरुद्ध चुगल्या तर करणार नाही ना म्हणून माझ्या हालचालींवर नजर ठेवण्यासाठी जेलरने मुद्दाम त्या हवालदाराला माझ्या आऊट हाऊमध्ये ठेवले होते. तो जेलरचा विश्वासू माणूस होता. आणि एक नंबरचा चुगलखोर होता. त्यामुळे सारे कैदी त्याच्यावरही खार खाऊन होते.

कैदी त्या हवालदाराच्या अंगावर धावले आणि त्याला त्यांनी ठोकून रक्तबंबाळ

करून सोडले. तो कसातरी निसटून धावत धडपडत मेनगेटच्या रोखाने येत होता. ते दृश्य पाहताच मी एकदम पुढे सरसावलो आणि मोठ्याने ओरडलो, " अरे मर जायगा आदमी...मर गया...अब बस करो..." मी साधारण कुणाच्या अध्यात मध्यात नसल्याने माझे कुणाशी वाकडे नव्हते. सारे कैदीही साधारणपणे मला वचकूनच असत. त्यामुळे त्यांच्यासमोर जाण्याची मला मुळीच भीती वाटत नसे. त्या दिवशी त्यांच्या कटाची मला मुळीच कल्पना नव्हती. (जेलर रजेवर असल्याची कैद्यांनाही माहिती नव्हती.) आत दोन खून अगोदर पडले आहेत हेही माहीत नव्हते. त्यामुळे मी मुळीच न घाबरता पुढे होऊन कैद्यांना आवरण्याचा प्रयत्न करू लागलो.

मला बघून त्या गिल्ल्यातही काही कैदी ओरडले, " नायबसाब, तुम आगे मत आना........चुकून तुम्हांला लागेल. तुम्ही आत जा........जेलरसाहेब कुठे आहेत ?... "

मला मारण्याचा त्यांचा इरादा नाही हे समजताच माझी हिंमत दुपटीने वाढली आणि त्यांना आवरण्याचा मी मोठमोठ्याने ओरडून प्रयत्न करू लागलो. एव्हाना जमाव मेनगेटपर्यंत आला होता. मी मोठ्याने ओरडलो, " बस...आता पुरे झाले मारणे...सोडा त्याला...तुमच्या काय अडचणी आहेत त्या मला सांगा..."

कैदी एकदम मोठमोठ्याने ओरडून मला सांगू लागले. जेलरला, जमादाराला शिव्या देऊ लागले. तेवढ्यात मी त्यांना बोलण्यात गुंतवून ठेवून डोळ्यांनी खूण करून जमादाराला मेनगेटबाहेर पळून जाण्यास सांगितले.

मी पुन्हा कैद्यांना सांगितले, " तुम्ही स्वस्थ बसा, काही काळजी करू नका. तुमच्या अडचणी काय आहेत ते मला सांगा. आता आपापल्या बरॅक्समध्ये परत जा... " आत खून पडले असतील ही कल्पनाच मला नव्हती.

परंतु कैदी ऐकेनात. ते म्हणाले, " आम्ही इथेच बसतो. तुम्हाला काय करायचे ते करा. " ह्या वेळेपर्यंत मेनगेटबाहेरच्या एका हुशार शिपायाने धोक्याची घंटा वाजविली होती. ही घंटा आजूबाजूच्या एक मैलाच्या परिसरात ऐकू जात असे. ती ऐकताच बाहेरचे हत्यारी शिपाई हाती बंदुका घेऊन तुरुंगाच्या भिंतींवर व बुरुजांवर चढून बसले होते. परिस्थिती थोडीशी आटोक्यात आल्याचे पाहताच मी त्या कैद्यांच्या जमावाला तेथेच शांत करून बसविले आणि बाहेर सटकून जेलर-कडे गेलो.

जेलरचा बंगला जवळच होता. त्याला मी सर्व परिस्थिती समजावून सांगितली. आणि सांगितले, " तू चल, तुझी उपस्थिती तिथे आवश्यक आहे. " पण तो कसला खट् ! त्याला ठाऊक होते कैदी आज आपल्याला मारणार आहेत. तो यायला तयार होईना. तो म्हणाला, " तूच जा आणि काय करायचे ते कर. " मी विचारले, " मी काय करू ?" बाहेर पडताना एका शिपायाला सुपरिंटेंडेंटकडे मी पिटाळले होते हे

मी जेलरला सांगितले नव्हते. कारण आपल्यावरचे संकट टाळून माझ्यावरच ते सारे प्रकरण ढकलण्याचा त्याने प्रयत्न चालविला आहे, हे मी त्या वेळपर्यंत समजून चुकलो होतो. त्याचे डोळे तर चांगले होते.

जेलर म्हणाला, "गोळीबार कर-दे हुकूम गोळ्या मारण्याचा. मरू देत एक-दोन कैदी मेले तर."

मी म्हणालो, "पण तू तेथे चल. वाटल्यास आत येऊ नकोस. मेनगेटवर बस आणि तेथून हुकूम दे गोळ्या सोडण्याचा."

पण त्यालाही तो तयारच होईना. मी म्हणालो, "मी तसा गोळीबार करणार नाही." तो म्हणाला, "काय वाट्टेल ते कर."

हा काही आता येत नाही असे दिसून आल्यावर मी निघून आलो. जेलच्या अगदी आत दंगल चालू होतीच. मी इकडे आलो तेवढ्यात आणखी एका कैद्याचा खून पडला होता. मेनगेटवर पो चतो तेवढ्यात तेथे सुपरिटेंडेंटसाहेब आले होते. मी त्यांना सांगितले, "तुम्ही आत तसे जाऊ नका." मग बंदुका घेतलेले चार पोलीस पुढे, चार मागे, चार बाजूला अशा पहाऱ्यात मी आणि सुपरिटेंडेंट आत शिरलो. संगिनी शिपायांचे पहारे ऑफिसमध्ये बसवले.

सुपरिटेंडेंटने विचारले, "बाकीची ऑफिसमधली मंडळी कुठे गेली ?" ती सारी पळून गेली असे कुणीतरी सांगताच त्याने आश्चर्याने मला विचारले, "एवढ्या दंग्यामध्ये तुम्ही कसे काय शिरला ? तुम्हांला भीती वाटली नाही ?"

समोरच्या पटांगणात कैदी एव्हाना शांतपणे बसले होते. आता त्यांच्या रिंग-लीडर्सच्या जबान्या घ्यायच्या होत्या. सुपरिटेंडेंटसाहेबांनी जेलरची चौकशी केली. मी त्यांना सांगितले, "त्याला गँगलीडर्सची चांगली माहिती आहे. घटकाभर तरी तुम्ही त्याला बोलवाच. ही त्याची सकाळची चिठ्ठी." सुपरिटेंडेंट काय समजायचे ते समजले. त्यांनी जेलरला चिठ्ठी लिहिली, 'ताबडतोब निघून ये. डोळे दुखत असतील तर मी अगोदर औषध देईन. (सुपरिटेंडेंट हाच त्या वेळी सिव्हिल सर्जनही असायचा.) तुला तासाभरात परत जाता येईल.' चिठ्ठी पोचताच जेलरला धावत यावे लागले. त्याचे डोळे वगैरे काही दुखत नव्हतेच. शेवटी त्याला आम्ही रात्री दहा वाजेपर्यंत राबवला.

नंतर आम्ही बरॅक्समधून राऊंड घेत होतो तो आत जागोजागी कैदी घायाळ होऊन पडलेले. तिघे मरून पडलेले. तेव्हा परिस्थितीचे गांभीर्य माझ्या ध्यानात आले आणि कुठल्या भयंकर प्रसंगात आपण सापडलो होतो याची मला कल्पना आली. नंतर आम्ही ही साद्यंत हकीकत कळवणाऱ्या तारा सक्कर जिल्ह्याचे डी. एस. पी., होम इन्स्पेक्टर, पुण्याचे आय्. जी. पी. यांना केल्या. कैद्यांच्या जबान्या घेतल्या, जखमी कैद्यांना आणि शिपायांना हॉस्पिटलमध्ये पोचवले आणि अगदी थकून रात्री दहा वाजता बंगल्यात परत आलो.

## : २ :

आजूबाजूचा मुलूख महाद्वाड. त्यामुळे मी माझे कुटुंब शिकारपूरला कधीच नेले नव्हते. बंगला खूप मोठा होता. आवारही चांगले होते. माझ्याबरोबर उत्तर प्रदेशचे दोघे भय्ये शिपाई त्या बंगल्यात राहत. ते प्रकृतीने चांगले दणकट, धार्मिक आणि सालस होते. माझ्या सरळ स्वभावामुळे ते माझ्यावर फार प्रेम करीत आणि माझ्या हिताची व संरक्षणाची सतत काळजी घेत.

शिकारपूरला उकाडा फार. तेथून जाकोबाबाद जवळ. रात्री घरात झोपणे अशक्य त्यामुळे आम्ही बाहेर झोपत असू. मला तर तेथील उकाडा आणि गरम वारे एवढे असह्य होत असे की, पलंगावर ओली सतरंजी घेऊन अंगावर ओली चादर टाकून मी निजत असे. माझ्या दोन्ही बाजूंनी ते दोघे भय्ये शिपाई झोपत. तेथे रात्री बऱ्याच चोऱ्यामाऱ्या होत. त्यामुळे ही काळजी. एक भय्या अंथरुणाखाली फरशी ठेवी तर दुसरा कुऱ्हाड. ते म्हणत, "नायबसाब, तुम फिकर मत करो. पहले हम मरेंगे, मगच तुम्हांला धोका." त्यामुळे मी निर्धास्त झोपत असे.

त्या रात्री अगदी ढगाळ हवा होती. त्यातही विजेचे दिवे गेलेले. दिवसभराच्या घटनांनी आणि नंतरच्या कटकटींनी डोके अगदी भणभणून गेले होते. दोघे भय्ये स्वयंपाक करीत होते. आमचे जेवण झाल्यावर अंगणात येऊन आम्ही झोपलो. ते दोघे भय्ये तुरुंगात चालणाऱ्या लांडयालबाड्या सांगू लागले. मला झोप येत होती. तेवढ्यात रामसुंदर नावाच्या भय्याने विचारले, "साहेब, समोरचं फाटक लावलं आहे ना?"

मी म्हटलं, "राहू दे रे; आपल्या बंगल्यात कोण येतंय मारायला."

पण तो जखमी हवालदार आमच्याच बंगल्याच्या आऊट हाऊसमध्ये राहत असे. हॉस्पिटलमधून तो घरी आला होता आणि आऊट हाऊसच्या अंगणात खाटेवर पडून आपल्या एका नातेवाइकाशी गप्पा मारीत पडला होता. मला केव्हा झोप लागली तेही समजले नाही.

एकाएकी उठलेल्या एका भेसूर किंकाळीने रात्री एकच्या सुमारास मी दचकून जागा झालो. "दगा, दगा, बाबूजी सावध, तुम्ही आत चला." भय्ये ओरडू लागले. मी पाहिले तो हवालदाराच्या खाटेवर चार-पाच लोक कुऱ्हाडीने घाव घालीत होते.

तुरुंगातील कैद्यांचे बाहेरच्या टोळक्यांशी जबरदस्त सं ान होते. तुरुंगातील दुपारच्या दंग्यात जेलर आणि हा हवालदार निसटला होता. पण त्या दोघांना मारायचे असा त्या कैद्यांनी कटच केला होता. आत ते सापडले नाही तेव्हा त्यांनी बाहेरच्या टोळक्यांना निरोप धाडले. त्याप्रमाणे आठ-दहा पठाणांचे एक टोळके त्या रात्री आमच्या बंगल्याच्या आवारात झाडामागे बंदुका, कुऱ्हाडी घेऊन लपून

बसले होते. अगोदर हवालदाराचा खातमा करून नंतर जेलरचा समाचार घ्यायचा असा त्यांचा बेत होता. रात्री सर्वत्र निजानीज झाल्यावर ते लोक त्या हवालदाराच्या खाटेवर धावून आले आणि कुऱ्हाडीचे घाव घालू लागले. परंतु हवालदाराकडे त्याचा दुसरा पाहुणा आला होता. त्यामुळे मारेकऱ्यांचा गोंधळ उडाला होता. त्या गडबडीत हवालदाराच्या हातावर घाव पडला. तेवढ्यातही तो निसटला आणि काटाकुट्यांच्या कंपाऊंडमधून कशीतरी उडी मारून तो पळाला आणि शेजारच्या एका टांगेवाल्याच्या पडक्या घरात लपून बसला.

हे सारे काही क्षणांतच घडले. तेवढ्यात त्या दोघा भय्यांनी मला धरून बंगल्यात नेले आणि बाहेरून कड्या लावून कोंडून टाकले आणि "नायबसाब, बाहेर पडू नका, दगा आहे," असा इशारा देऊन कंदील घेऊन ते बाहेर गेले.

एवढ्यात आजूबाजूचे पोलीस जमा झाले होते. मारेकरी दुसऱ्या संधीसाठी झाडाआड लपून बसले होते. पण पोलीस जमा झालेले पाहताच ते पळून जाऊ लागले. पाठलागावर येणाऱ्या पोलिसांना ते मागे वळून गोळ्या झाडीत आणि पुढे पळत. शेवटी ते निसटलेच.

नंतर मोठ्या पोलिसांच्या तुकडीसह सुपरिटेंडेंट तेथे आले. पण तोवर गुन्हेगार पळून गेले होते. सुपरिटेंडेंटनी मला सांगितले, तुम्ही इथे राहू नका. इथे कधी तुम्हांलाही धोका होईल. पण मी ऐकले नाही. राहिलो तेथेच. शेवटी त्या सर्व वस्तीत पोलिसांचा कडक पहारा बसवण्यात आला.

पुढे या सर्व प्रकरणाची केस कोर्टात सुरू झाली. पुण्याहून इन्स्पेक्टर जनरल ऑफ प्रिझन्स डॉयल नावाचे गोरे साहेब पाहणीसाठी आले. डॉयलसाहेबांचे माझ्याविषयी फार चांगले मत होते. कारण, मी आपणहून या भागात बदली करून घेण्यास मान्यता दिली होती. त्यामुळे त्यांनी माझी एक-दोन वेळा वैयक्तिक विचारपूस करून मला शाबासकीही दिली होती. म्हणून त्यांच्या पाहणीची मला मुळीच भीती वाटत नव्हती.

पण डॉयलसाहेब पुण्याहून तुरुंगांची पाहणी करीत निघाले ते सिंध विभागात प्रथम कराचीत आले. आणि कराचीच्या तुरुंगात एक अशी घटना घडली की आम्ही उगाचच घाबरून गेलो.

पाहणीच्या वेळी आय. जी. पी. आपल्या सर्व लवाजम्यासह तुरुंगात येत असे. तुरुंगातील सर्व कैद्यांना मोकळ्या जागेत बसवीत. मग आय. जी. पी. त्यांना तुमची काही अडचण आहे काय म्हणून विचारी. त्यावर कुणी आपली अडचण सांगितल्यास आय. जी. पी. त्यावर आपले उत्तर देई.

त्याप्रमाणे डॉयलसाहेब आपल्या सर्व लवाजम्यासकट कराची तुरुंगात आले. आणि कैद्यांच्या रांगांत हिंडत विचारपूस करू लागले. त्या तुरुंगात उत्तर प्रदेशातील दोन आडदांड कैदी होते. कराचीची हवा त्यांना बिलकुल मानवत नव्हती. त्यामुळे

त्यांनी सांगितले, "आमची येथून आमच्या प्रदेशात बदली करा. आम्हांला यथील हवापाणी सोसत नाही."

गुन्हेगारांच्या एखाद्या मोठ्या टोळीला शिक्षा झाली असली म्हणजे टोळी फोडण्यासाठी त्या कैद्यांना दूरदूरच्या तुरुंगात टाकतात. यासाठी प्रांतातील कैद्यांची अदलाबदलदेखील होते व त्यानुसार उत्तर प्रदेशातील ते दोघे कैदी कराचीला आले होते. त्यामुळे डॉयलने त्यांना सांगितले, "तुम्ही म्हणता ते ठीक आहे. त्याप्रमाणे मी शिफारस करीन. पण हे काम फक्त आमच्याच हाती नाही. त्यासाठी उत्तर प्रदेश सरकारचीही मंजुरी लागेल. म्हणून काम होईलच हे निश्चित सांगता येत नाही."

त्यावर त्यांच्यापैकी भडक माथ्याच्या एका कैद्याने संतापून सरळ डॉयलसाहेबांच्या श्रीमुखात भडकावली. सारेजण पाहत होते, आजूबाजूला पोलिसांचे संरक्षण होते. तशात कुणाचीही पर्वा न करता त्या कैद्याने हे कृत्य केले. स्वत: डॉयल दणकट होता. त्याचा चष्मा एका बाजूला उडून पडला. हॅट दुसऱ्या बाजूला उडाली आणि तो रागाने लालबुंद झाला. त्याने त्या कैद्याला तेथल्या तेथे तीस फटके मारण्याची शिक्षा दिली.

कराची आटपून डॉयलसाहेब शिकारपूरला येत होते. अगोदरच आमच्या तुरुंगाची दुष्कीर्ती होती. त्यात नुकताच हा दंगा झालेला त्यामुळे आम्हांला सारखी धाकधूक वाटत होती. पण तसे काही झाले नाही. सारी पाहणी शांतपणे पार पडली. डॉयलसाहेबांनी मुद्दाम मला बोलावून शाबासकी दिली. सेशन्स जज्जानेही मला शाबासकी देऊन साऱ्या घटनेचा जेलरवरच ठपका ठेवला. शेवटी त्या खटल्यात ८ जणांना जन्मठेपेच्या शिक्षा मिळाल्या आणि दोन-तीन जणांना किरकोळ. तुरुंगखात्याने जेलरची येथून बदली केली आणि एक-दोन शिपायांना बडतर्फ केले आणि प्रकरण मिटले.

पण अजूनही त्या घटना आठवल्या म्हणजे उरात धडकी भरतेच.

• • •


स्वादिष्ट मिठाईसाठी
आम जनतेची निवड

**शर्मा स्वीट मार्ट**

दत्तमंदिराशेजारी,
मंडई रस्ता, पुणे २.

*निवेदक* : **विजय परुळकर**

*लेखक* : **अनिल हवालदार.**

या जोडीने सादर केलेले **२** *लेख*

□ कलिंगाच्या प्रदेशांत

□ पूर्व रंगातल्या रात्री

वाचकांच्या स्मरणात आहेतच.

आणि आता

# मॅन्डारिन्सची अखेर

ही त्याच जोडीची एक नवी झलक

सायगावच्या सालाई (Xaloi) पॅगोडावर धाड घालून मादाम न्हूच्या हस्तकांनी अनेक बुद्ध भिक्षूंची अक्षरशः परवड केली. त्या छाप्यात 'अहिंसावादी' भिक्षूंच्या देवळांत अनेक शस्त्रे लपवून ठेवलेली सापडली. धरपकड झाली ! भगव्या वस्त्रा-आड दडलेल्या त्या छुप्या कम्युनिस्टांचा समूळ नाश करण्याचा मादाम न्हूने चंग बांधला आणि त्याला उत्तर म्हणून बुद्ध भिक्षूंनी स्वतःला जाळून घेण्याचा अघोरी उपाय सुरू केला !

या पेटत्या भिक्षूंची फिल्म घेण्याची कामगिरी जर्मन टेलिव्हिजनने माझ्यावर सोपवली. भारताबाहेर जाण्याचा माझ्यावर पहिलाच प्रसंग ! सायगावला जाण्याच्या रोमांचकारी कल्पनेनं मी अगदी हरखून गेलो होतो. सायगाव हे व्हिएटनाममध्ये आहे आणि व्हिएटनाम नकाशावर पूर्वीच्या इंडोचायनामध्ये आहे हे शोध मला त्या वेळी प्रथमच लागले. टेलिव्हिजन कॅमेरामन म्हणून काम करायला लागून मला जेमतेम दोन-अडीच महिने झाले होते. अचानक ही एवढी कामगिरी आलेली पाहून मी क्षणभर भांबावलोच ! त्यातच दिल्लीच्या विमानतळावर कस्टम्स्‌मध्ये झालेला माझा गोंधळ ! माझ्याजवळ कॅमेरा, लाईटस् हा सगळा मामला धरून जवळजवळ सोळा बॅग्ज होत्या. त्या कॅमेऱ्यांची, त्यांच्या लेन्सेसची मोजणी करता करता कस्टम्सवाल्यांसमोर मी अगदी मेटाकुटीला आलो.

२५ ऑक्टोबर १९६३ ला मी सायगावच्या दिशेनं पहिली झेप घेतली. मनात नाना कल्पनांचा गोंधळ झाला होता. सायगाव शहर कसं असेल याची नजरेसमोर निश्चित कल्पना उभी राहत नव्हती. पण स्वतःला रस्त्यावर जाळून घेणारी माणसं जिथं आहेत त्या शहराबद्दल फारसं आशावादी चित्र उभं करणं अवघड होतं !

सायगावच्या टॉन्स न्युट (Ton Son Nhut) विमानतळावर उतरत असताना अपेक्षाभंगाचा गोड धक्का मला बसला. कस्टम्सवाल्यांनी मी 'प्रेस' चा आहे म्हणताच माझ्या सामानाची अजिबात तपासणी न करता मला बाहेर सोडलं ! मी सायगावला उतरलो त्याच दिवशी युनायटेड नेशन्सचं 'फॅक्टस् फाइंडिंग कमिशन' तिथं येऊन दाखल झालं होतं. माझा कॅमेरा मी ताबडतोब त्यांच्यावर चालवला !


विमानतळावर मला न्यायला थॉमस थू नावाचा दुभाष्या आला होता. अवघ्या साडेचार फूट उंचीच्या या व्हिएटनामी तरुणाला पाच-सहा भाषा अवगत असलेल्या पाहून मी थंडच झालो. थॉमस भेटताच विमानतळावर मी त्याला फर्मान सोडलं- "थॉमस, मला ताबडतोब 'पेटता भिक्षू' मिळवून दे ! "

माझी ही भयानक मागणी ऐकून दुसरा कुणी घाबरला असता. पण थॉमस अगदी गंभीरपणे म्हणाला- "होय साहेब ! मी शोधून काढतो !"

माझं सामान घेऊन थॉमस थू दुसरी टॅक्सी करून येणार होता. मी ऐटीत एका टॅक्सीत बसलो आणि ड्रायव्हरला फर्मान सोडलं- "हॉटेल कॅराव्हेल ! "

तो टॅक्सीवाला बावचळून म्हणाला- "नो हॅव ! "

मी म्हणालो- "हॅव ! कॅराव्हेल ! कॅराव्हेल !!" – भाषेची अडचण मला जाणवली. मला फ्रेंच येत नव्हतं आणि तिथल्या लोकांना इंग्रजी समजत नव्हतं ! बऱ्याच गोंधळानंतर 'कॅराव्हेल' चा उच्चार 'कॅराव्हे' आहे हे मला समजलं आणि सबंध सायगावभर मला फिरवल्यावर ड्रायव्हरसाहेबांनी मला एकदाचं 'कॅराव्हेल' (चुकलो ! कॅराव्हे ! ) मध्ये आणून सोडलं !



[ मादाम न्हू च्या हस्ते उभारलेल्या वास्तूची दुर्दशा ]

सायगाव पाहून माझी तबियत अगदी खूष झाली ! प्रशस्त आणि स्वच्छ रस्ते ! रस्त्याच्या दुतर्फा हिरवळीचे पट्टे ! सुबक बांधणीची घरं आणि रस्त्यांवरून छोटचा छोटचा स्कूटरेटसवरून वेगानं जाणाऱ्या सायगावच्या मुली ! वर्षानुवर्षं व्हिएट-नाममध्ये चाललेल्या युद्धाची पुसटशी निशाणीसुद्धा सायगावच्या पहिल्या दर्शनात माझ्या नजरेला पडली नाही.

मी सायगावमध्ये उतरलो, त्याच्या दुसऱ्या दिवशी (२६ ऑक्टोबर १९६३) दक्षिण व्हिएटनामचा 'प्रजासत्ताक दिन' साजरा झाला. प्रेसिडेंट दिएमनं (खरा उच्चार 'जिएम' आहे) लष्कराची मानवंदना स्वीकारली. अवघ्या दोन–चार दिवसांतच दिएमची राजवट उलथून पडणार आणि त्याचा अमानुष खून होईल, याची पुसटशी कल्पनासुद्धा कुणाला नव्हती.

## उत्तर–दक्षिणेचा झगडा

उत्तर आणि दक्षिण व्हिएटनामच्या झगड्याची सुरुवात तशी फार पूर्वीच झालेली आहे. सुमारे चार हजार वर्षांपूर्वी दक्षिण चीनमधून काही लोकांनी स्थलांतर केलं आणि ते आताच्या उत्तर व्हिएटनाममध्ये स्थायिक झाले. त्यानंतर हजार वर्षांनी या चिनी वसाहतींनी चिनी राजसत्तेचे जोखड झुगारून स्वातंत्र्य मिळवलं आणि हळू हळू दक्षिणेकडं सरकायला सुरुवात केली. दक्षिणेत कंबोडियातल्या 'खमीर' लोकांची वस्ती होती. या खमीरांना पिटाळून उत्तर व्हिएटनाममधले काही लोक दक्षिणेत आले. इ. स. १६६० पासून उत्तर–दक्षिणेचा या ना त्या कारणांवरून झगडा सुरू झाला. वारंवार रक्तपाताचे प्रकार घडू लागले. त्यांच्यांत तात्पुरता समझोता होऊन फाळणी झाली. आता उत्तर–दक्षिणेमध्ये जी सीमारेषा आहे त्याच ठिकाणी त्या वेळची सीमारेषा ठरली. सुमारे दीडशे वर्षांचा काळ लोटला आणि फ्रेंच व स्पॅनिश आरमाराने सायगाववर तोफा डागल्या. इ. स. १८५९ मध्ये सायगाव फ्रेंचांच्या ताब्यात आलं! १८६३ मध्ये त्यांनी कंबोडिया व्यापला. टोनकिंग (उत्तर व्हिएटनाम – Tonking) आणि अन्नाम (मध्य व्हिएटनाम— Annam) इथल्या लढायांनंतर फ्रेंचांनी सबंध इंडोचायनावर आपलं वर्चस्व प्रस्थापित केलं. पाश्चात्त्य वसाहतवादाला कडवा विरोध व्हिएटनामी आणि सयामी लोकांनी केला. सयामी लोकांनी (थायलंड) आपलं स्वातंत्र्य अबाधित राखलं. पण व्हिएटनामी लोकांना फ्रेंच वर्चस्व पत्करावं लागलं!

१३ मार्च १९५४ ची पहाट उजाडली! व्हिएटनामच्या इतिहासाला एक नवी कलाटणी मिळाली. लाओसच्या सीमेनजीकच्या उत्तर व्हिएटनाममधल्या दिएन बिएन फू या खेड्यात डॉ. हो चि मिन्हच्या व्हिएटमिन्हनी बंडाचा झेंडा फडकावला. हा उठाव एवढा जबरदस्त होता की, फ्रेंच वसाहतवादाचा एकदम कणाच मोडला. व्हिएटनाममधला फ्रेंचांचा लष्करी प्रमुख जनरल नव्हारी (Navarre) अटीतटीनं दिएन बिएन फू लढवत होता. २६ एप्रिल १९५४ रोजी जिनेव्हा परिषद होणार होती. तिथपर्यंत फ्रेंचांना टिकाव धरावयाचा होता. पण २३ एप्रिललाच परिस्थिती कठीण झाली. अमेरिकन हवाई दलानं मदत करावी अशी जनरल नव्हारीनं केवल केली. व्हिएटमिन्हना चीनची मदत आहे ही वार्ता फ्रान्सचे पंतप्रधान जोसेफ लॅमिये (Joseph Lamiel) यांनी जाहीरपणे जगाला प्रथमच सांगितली. या चिनी हस्तक्षेपाला थांबवण्यासाठी त्यांनी अमेरिकेच्या मदतीची मागणी केली. त्या वेळी अमेरिकेचे जॉन फॉस्टर डलेस म्हणाले होते– "जर अमेरिकेने या युद्धात भाग घेतला तर आमची शान राखण्यासाठी आम्हांला हे युद्ध वाटेल ती किंमत देऊन जिंकलंच पाहिजे!" त्यांच्या या उद्गारांवरून अमेरिका आज एवढी प्रचंड किंमत देऊन व्हिएटनाममध्ये का लढते याचे उत्तर मिळते!

पण त्या वेळी अमेरिकेनं प्रत्यक्ष युद्धात भाग घेतला नाही. 'युद्ध ताबडतोब थांबवायचं असेल तर अणुबाँब टाका' असा जॉन फॉस्टर डलेसनी सल्ला दिला. फ्रेंच घाबरले. अखेर ८ मे १९५४ रोजी दिएन बिएन फू पडलं आणि फ्रेंच सत्ता व्हिएटनाममधून लयाला गेली ! उत्तर व्हिएटनाम डॉ. हो चि मिन्हकडे गेला. दक्षिण व्हिएटनाम तिथल्या बाओदाई राजाच्या ताब्यात आला. दिएम हा बाओदाईचा प्रधान होता. १९५८ मध्ये दिएमने दक्षिण व्हिएटनाममध्ये सार्वत्रिक निवडणुका घेतल्या आणि बाओदाईला पदच्युत करून तथाकथित प्रजासत्ताक राज्याची स्थापना केली. 'मॅन्डारिन्स'ची राजवट सुरू झाली. (उच्चभ्रू लोकांना चिनी समाजात 'मॅन्डारिन' म्हणून ओळखतात.)

## व्हिएटनामची क्लिओपात्रा

गो दिन् दिएम् (Ngo Dinh Diem) हा दक्षिण व्हिएटनामचा प्रेसिडेंट झाला. त्याचा धाकटा भाऊ गो दिन न्हू (Ngo Dinh Nhu) त्याचा राजकीय सल्लागार बनला. या न्हूची जबरदस्त महत्त्वाकांक्षी बायको मादाम न्हू ! अतिशय रेखीव बांध्याची 'अपऱ्या नाकाची' ही 'व्हिएटनामची क्लिओपात्रा'. तिच्या कणखर राज्यकारभारामुळे ती जगभर गाजली ! दिएम आणि न्हू तिच्याच तंत्रानं चालत होते ! दिएमनं अमेरिकेची मदत विकास योजनांसाठी घेतली. अमेरिकेचे लष्करी सल्लागार आणले. पण प्रत्यक्ष अमेरिकन सेना व्हिएटनामच्या भूमीवर उतरवायला तो राजी नव्हता ! या मुद्द्यावरच तो अमेरिकेची सहानुभूती गमावून बसला. दिएम अधिकारावर आल्यानंतर व्हिएटकाँग चळवळीचा उगम झाला. (व्हिएटकाँग म्हणजे व्हिएटनामीज कम्युनिस्ट ऑर्गनायझेशन.) दहशतवादाच्या पहिल्या काही घटनांनंतर २५ जाने. १९६० रोजी टायनिन्ह (Ty-Ninh) प्रांतात टुआ हाई (Tua-Hai) इथल्या फौजेवर व्हिएटकाँगनी पहिला मोठा हल्ला चढवला. तिथपासून व्हिएटनामच्या भूमीवर रोज रक्ताचं सिंचन व्हायला सुरुवात झाली. सगळ्या जगाचं लक्ष वेधलं आणि सायगावमध्ये आम्हा वार्ताहरांचा आणि छायाचित्रकारांचा तळच पडला !

'पेटता भिक्षू' मिळत नव्हता म्हणून मी अस्वस्थ होतो. थॉमस थू माझ्याबरोबर सारखा फिरत होता. मला सायगावला येऊन आठवडा लोटला तरी कुणीही स्वतःला पेटवून घेणारा भिक्षू दिसला नाही. मी अगदी निराश झालो. जर्मन टेलिव्हिजननं माझ्यावर प्रथमच सोपवलेली कामगिरी मी पार पाडू शकत नव्हतो. तिथले मुरलेले वार्ताहर मला मदत करायला अजिबात तयार नव्हते. अखेर हॉर्स्ट फास् (Horst Fass) नावाच्या अमेरिकन वार्ताहराला माझी दया आली. तो मला त्याच्याबरोबर व्हिनलॉनला घेऊन गेला. (या हॉर्स्ट फास्ला व्हिएटनामच्या उत्कृष्ट वार्तापत्राबद्दल यंदा पुलित्झर प्राईज मिळालं आहे.)

व्हिनलॉनला आम्ही संध्याकाळी पोचलो तेव्हा नोव्हेंबरची एक तारीख होती. रात्री गप्पा मारत बसलो होतो त्या वेळी सायगाववरून जबरदस्त धक्का देणारी बातमी आली. सायगावमध्ये लष्करी क्रांती झाली ! तातडीनं पहाटेच आम्ही सायगावच्या विमानतळावर उतरलो. रस्त्यात रणगाडयांची धावपळ चालली होती, गोळयांचा पाऊस पडत होता. काहीच समजत नव्हतं ! क्रांतीचं मला घडलेलं ते पहिलं दर्शन ! माझे वरिष्ठ जर्मन अधिकारी श्री. डेरिक्स यांच्याबरोबर मी कॅमेरा घेऊन धावत होतो. रस्त्यात एका ठिकाणी डेरिक्स रणगाडयांची दृश्यं घेत होते. मी त्यांना 'लाईट' धरून उभा होतो. माझ्या हातातला दिव्याचा प्रखर झोत पडताच एका रणगाडयाने झटकन् आमच्या दिशेनं तोफ वळवली. माझी बोबडीच वळली. तत्क्षणी मी तो प्रकाशझोत डेरिक्स यांच्या तोंडावर टाकला. त्यांच्या हातातला कॅमेरा दिसताच रणगाडयातल्या सैनिकाने तोफ दुसरीकडं वळवली. नाहीतर त्या क्रांतीत आम्ही सायगावच्या भूमीवर कायमचे आडवे झालो असतो !

## मॅन्डारिन्स राजवटीची अखेर

दिएमच्या राजवाडयावर एकच रणधुमाळी माजली होती. दिएमचे विश्वासू सैनिक रात्रीपासून राजवाडा शर्थीनं लढवत होते. बंडखोरांनी राजवाडयाच्या तोफा डागून अखेर राजवाडयाच्या उजव्या बाजूला मोठं खिंडार पाडलं. त्या बंडखोरांचं नेतृत्व करणारा पुढारी पाहून मी हबकलोच ! टॉन थॉट दिन [Ton Thot Din] तो व्हिएटनामी जनरल होता. क्रांतीपूर्वी दिएमचा तो शरीरसंरक्षक म्हणून काम करीत होता. सालॉर्द पॅगोडावर धाड घालण्यात त्याने पुढाकार घेतला होता. बुद्धांना शिव्या घालून दिएमचा उदोउदो करणारी मुलाखत चारच दिवसांपूर्वी आम्हांला दिली होती. क्रांती यशस्वी झाल्यानंतर याच टॉन थॉट दिनने बुद्धांचा जयजयकार करून दिएमची नाचक्की करणारी मुलाखत दिली. या दोन्ही मुलाखती आम्ही मुद्दा-मच टेलिव्हिजनवर सलग दाखवल्या ! राजकारणातल्या घटके घटकेला बदलणाऱ्या खेळाची मला झालेली पहिली जाणीव !

बंडखोरांच्या बरोबरच आम्ही राजवाडयात घुसलो. गोळयांचे आवाज मला फटाक्यासारखे वाटत होते. परिस्थितीचं गांभीर्य लक्षात येत नव्हतं ! समुद्रावर शिंपले गोळा करावे तसा मी राजवाडयाच्या पटांगणात काडतुसांची टोपणे गोळा करीत होतो. चुकून मी एक ग्रेनेड खिशात टाकला. डेरिक्सनी ते पाहिलं ! खस्सकन मला हिसकून त्यांनी तो ग्रेनेड बाहेर काढला आणि म्हणाले, "गाढवा, मरायचं आहे का ?" मी चेहरा टाकला आणि मुकाटयानं त्यांच्यामागे धावू लागलो.

राजवाडा सकाळी नऊ वाजता बंडखोरांनी ताब्यात घेतला. राजवाडयावर पांढरं निशाण लागलं ! सैनिकांनी राजवाडयात नुसता धुडगूस घातला. खिडक्यांचे

पडदे फाडले. फर्निचरची नासधूस केली. खाण्याचे सगळे पदार्थ फस्त केले. राजवाड्याचा कोपरा न् कोपरा त्यांनी विंचरून काढला. पण दिएमचा आणि न्हूचा त्यांना पत्ता लागला नाही.

दिएमचा आणि न्हूचा हृदयद्रावक अंत आम्हांला दुपारी कळला. दिएमनं अमेरिकनांची मदत मागितली. पण ते स्वस्थ राहिले. चारी बाजूंनी तो घेरला गेला तेव्हा तो शोलॉन या सायगावच्या जवळच्या शहरात पळाला. त्याला आणि त्याच्या भावाला तिथल्या चर्चमध्ये प्रार्थना करताना पकडलं! टॉन थॉट दिन्ने त्याला त्याची शरणागती जाहीर करायला हातात मायक्रोफोन दिला. तो दिएमने भिरकावून दिला तेव्हा त्याने चिडून दिएम आणि न्हूला गोळ्या घालून मारलं! क्रांतिकारकांच्या अधिकाऱ्यांनी त्या दोघांच्या देहांचे सूडाच्या भरात तुकडे तुकडे केले. [त्यांच्या मृत्यूच्या चार कथा आहेत. त्यातली ही एक! दिएमचा खरा अंत कसा झाला हे कुणालाच माहीत नाही.] परंतु दिएम आणि न्हू यांना Accidental Suicide केली, अशी बातमी प्रसारित केली गेली. ह्या चमत्कारिक शब्दप्रयोगाचा अर्थ अजूनं मला कळला नाही! दुसऱ्या दिवशी दुपारी त्या दोघांचा अंत्यविधी होणार म्हणून जाहीर झालं! दोन खड्डे खणले गेलं! आम्ही सगळे वार्ताहर–छायाचित्रकार-सकाळपासून तिथं बसलेले! दुपारपर्यंत कशाचाच पत्ता नाही! कंटाळून मी भूक लागली म्हणून जेवायला सायगावच्या हॉटेलात आलो. परतताना टॅक्सी ड्रायव्हरनं गोंधळ केला. दफनभूमीचं क्रॉस काढून मी त्याला चित्र दाखवलं तर तो मला विमानतळावरच घेऊन गेला! बऱ्याच धावपळीनंतर मी दफनभूमीवर पोहोचलो. ते दोन खड्डे रिकामेच राहिले होते. ती प्रेतं लोकांच्या समोर आणण्याच्या अवस्थेत नव्हती म्हणे! कुठेतरी जंगलात पडलेल्या त्या प्रेतांचे फोटो महिन्यानंतर 'लाईफ' मासिकात प्रसिद्ध झाले!

मॅन्डारिन्सची राजवट संपली! मादाम न्हू पळाली म्हणून वाचली! एका रात्रीत सायगावचा नूर बदलला! रस्त्या–रस्त्यांवर रक्ताचा सडा पडला! सुवासिक रस्ते कचऱ्याच्या दुर्गंधीनं भरले! माणसं बदलली. त्यांचा चेहरा-मोहरा बदलला! धिंगाण्याला ऊत आला! आयुष्य बेबंद बनलं! सायगाव तेव्हापासून बिघडलं ते बिघडलंच! नंदनवनाचा नरक बनला! विषण्ण मनानं मी तो बदल पाहत होतो!

● ● ●



पुस्तके

# थोर व्यक्तिमत्त्वाचे संवेदनाशील मनावरील ठसे

हे एक वेगळ्या प्रकारचे पुस्तक आहे. हे चरित्र नाहीच; व्यक्तिचित्र नाही; किंबहुना व्यक्तिमत्त्वाचे चित्रण करण्याचाही लेखकाचा अट्टाहास नाही. एका थोर व्यक्तिमत्त्वाचे एका संवेदनाशील मनावर उठलेले. हे ठसे आहेत हळुवारपणे जतन केलेले. निष्ठेने जपलेले.

बालपणीच साथी एस्. एम्. जोशी तळवलकरांच्या जीवनात आले. जवळचे बनले. सांगाती झाले. त्यांच्या आयुष्याची साठी पूर्ण झाल्यावर त्यांच्या प्रभावी संगतीचा आढावा तळवलकरांनी या छोटया पुस्तकात समर्थपणे घेतला आहे. " हे चरित्र नाही, कारण त्यात आत्मचरित्राचा बराच भाग आला आहे. पण हे आत्मचरित्रही नाही. कारण याचा नायक स्वतः लेखक नाही. दोन मित्रांच्या सुमारे चार तपांच्या प्रदीर्घ मैत्रीची ही थोडक्यात हकीकत आहे. " ही लेखकाची या पुस्तकाच्या निर्मितिमागील भूमिका आहे. म्हणूनच मी सुरुवातीला म्हटले, की एका थोर व्यक्तिमत्त्वाचे संवेदनाशील मनावर उमटलेले हे ठसे आहेत. या व्यक्तिमत्त्वाची थोरवी पटवून देण्याचा, त्याच्या विविध पैलूंचे दर्शन घडविण्याचा, त्याचा साक्षात प्रत्यय आणून देण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न येथे नाही. पण हे ठसेच इतके बोलके आहेत, इतके घडीव आहेत की त्यातल्या रेषान् रेषा नकळत रेखीवपणाने उमटल्या



आहेत. एसेमच्या व्यक्तिमत्त्वावर येथे विश्लेषक भाष्य अथवा चिकित्सा आढळणार नाही पण बालपणापासून साथ देणाऱ्या आणि पाहता पाहता पुढे जाऊन अस्मानी झेप घेणाऱ्या कर्तबगार सोबत्याचे जीवन तळवलकरांनी इतक्या जवळून अनुभवले आहे, किंबहुना त्यांच्या स्वतःच्या जीवनात ते इतके जवळिकीने मिसळलेले आहे, की त्या जीवनाच्या खाचाखोचा, त्यातील चढउतार सारे यात प्रतिबिंबित झाले आहेत.

शाळेत शिक्षकांनी केलेल्या शिक्षेबद्दल समजूत घालण्याच्या निमित्ताने एसेम तळवलकरांच्या आयुष्यात आले. प्रेमळ, दिलासा देणाऱ्या कनवाळू मैत्रीचा हा पहिला हळुवार ठसा. तिथून पुढे एसेमची विविध रूपे अशीच प्रीतीने, मैत्रीने, भक्तीने कोरलेली आहेत. मित्राच्या प्रगतीत खंड पडू नये आणि तो परावलंबी होऊ नये म्हणून काळजी वाहणारे एसेम, शिक्षकांना मुद्देसूद मार्मिक प्रश्न विचारून खटयाळ गंमत करणारे एसेम, धडाडीने तुरुंगात जाणारे आणि सभेत गरजणारे निर्भय एसेम, ताराबाईंच्या निग्रही प्रीतीपुढे हार खाणारे एसेम – अशी अनेक चित्रे एसेमच्या व्यक्तिरेखेचा घाट बनवितात. अलोट मित्रप्रीती आणि पराकाष्ठेची निष्ठा यांची जोड सहृदयतेला मिळाल्यामुळे या व्यक्तिरेखेला जिव्हाळयाचे चैतन्य लाभले आहे.

ठसे उमटण्यासाठी भूमीसुद्धा विशिष्ट प्रकारची असावी लागते. तळवलकरांची मनोभूमी अशीच सुसंवादी आहे. सहानुभावाने मऊ, हळुवार बनलेली आहे. तेजस्वी प्रतिभेची रेषान् रेषा शोषून घेण्यासाठी, आत्मसात करण्यासाठी ती आसुसलेली आहे.

एसेमच्या लोकजीवनाचे सहजच तीन भाग पडतात. विद्यार्थी, तारुण्य आणि प्रगल्भ व्यक्तित्त्व. या तिन्ही अवस्थांत एसेमनी नेतृत्व भूषविले. किंबहुना त्यांच्याकडे ते चालत आले. विद्यार्थ्यांचा लाडका पुढारी, तरुणांचा उत्साही प्रतिनिधी आणि भारतीय लोकजीवनाचा अभ्यासू नेता या तीन पायऱ्यांनी त्यांचे नेतेपद वाढत गेले. तळवलकरांच्या मनावर या तिन्ही नेतावस्थांचे खोल परिणाम झालेले दिसून येतात. "शाळेत एसेम कुठल्याही वर्गात अथवा तुकडीत असले तरी शाळेतल्या सर्व लहानथोर मुलांचे ते नैसर्गिक नेते समजले जात. एसेम कुणाला माहीत नाहीत आणि एसेमला कुणी माहीत नाही, असे कधीच झाले नाही. शिक्षकांना त्यांनी दिलेली चोख उत्तरे, त्यांना परीक्षेत मिळालेले गुण, त्यांनी केलेल्या कोटया आणि सांगितलेल्या ग्रामीण आख्यायिका हा सर्व एकंदर शाळेचा विषय असे."... "हा तुमचा एसेम म्हणजे वाघ आहे नुसता! अंधारात उडी घ्यायला घाबरला नाही. त्याच्या साऱ्या जीवनाचा प्रश्न आहे." . . . "सुमारे तीन तपांच्या काळात एसेम समाजजीवनात अगदी खोल खोल गेले. त्यांनी नुसता यांत्रिक प्रचार केला नाही तर सहृदयपणे समरस होऊन सारा समाज पाहिला." याप्रमाणे त्यांच्या नेतृत्वाचे स्वरूप दाखविणारी कितीतरी विधाने ठायी ठायी आढळतील. किंबहुना एसेमचे हेच खरे जीवन म्हणावे लागेल. या समाजपुरुषांच्या जीवनाचा धर्मच वेगळा असतो. त्याचा आलेख व्यवहाराच्या पटावर काढता येत नाही. त्या आलेखाचे अक्षरही वेगळे आणि परिमाणेही वेगळी. तळवलकरांनी ही परिमाणे मुद्दाम शोधण्याचा अट्टाहास केलेला नाहीच. पण एसेमच्या भव्यतेचे अवलोकन करीत असता आपोआपच हे आलेखन घडले आहे. एसेमच्या 'विवाहमंगल' प्रसंगीही त्यांची वर्तणूक याच साच्यातली. आपल्या त्यागनिष्ठ कलंदर जीवनात ताराबाईंच्या प्रीतीची साथ कुठवर राहील म्हणून सचिंत असणारे आणि शेवटी "आपलं काही कुणावर प्रेम बसलं नाही. मग निदान जिचे आपल्यावर निस्सीम प्रेम आहे तिलाच जोडीदारीण केलेलं काय वाईट?" असा मार्ग काढणारे एसेम अंतर्बाह्य समाजजीवनानेच भारलेले दिसतात यात काहीच नवल नाही.

## शुद्ध मैत्रीचा झरा

या समाजजीवनाचे प्रत्ययकारी वर्णन केल्यावर एसेमच्या स्वभावाची वैयक्तिक बाजूही तवळवलकरांनी सहजपणे दाखविली आहे. एसेमची बुद्धिमत्ता, वाईटातून चांगले पाहण्याची त्यांची वृत्ती, अपूर्ण मानवी जीवनातील पूर्णतेचे कण शोधण्याची

धडपड, त्यांचे सौजन्य यांचा मोठा परिणाम त्यांच्यावर झालेला आहे. त्यामुळे ते भारलेलेच आहेत. त्यामुळेच त्यांच्यावर परिणाम करणाऱ्या 'जे' रूटचे एसेम एक घटक ठरले आहेत. जीझस्, जवाहरलाल, जे. कृष्णमूर्ती यांच्या पंक्तीला जाऊन बसले आहेत.

गोपीनाथ तळवलकरांची भाषा सौहार्दाने भरलेली. सहजतेचे अलंकार धारण करणारी. माटचांची वा य. गो. जोशांची ( हाही एक 'जे' रूटच. ) आठवण करून देणारी. एसेमविषयी बोलताना ते भावाकुल होत नाहीत, पाल्हाळ लावत नाहीत. पण शुद्ध मैत्रीच्या प्रीतीचा सानंद झरा त्यांच्या लेखणीतून सतत वाहत असतो. 'काही रुखरुख आणि काही हुरहूर' ते व्यक्त करतात तीसुद्धा याच प्रेमळ-पणाने. "एकप्रकारची विद्ध झालेली सात्त्विकता डोळ्यांत दिसते...", "एसेमचे अक्षर फार सुंदर होते. त्यांच्या स्वभावासारखे मोकळे आणि झपाटेबाज......", "पाण्याचा धर्म वाहणे किंवा सूर्याचा धर्म प्रकाश देणे. त्यामागे काही मतलब असतो का ? तसे एसेमचे आहे." यांसारखी त्यांच्या लेखणीने लिहिलेली काही वाक्ये एसेमच्या व्यक्तित्वाचे सहजासहजी 'स्केच' काढू पाहतात. रेखीव वळणे कोरीत न बसता, सहजतेने चैतन्याची जाणीव करून देतात.

असे हे आपल्या 'सांगाती'चे गोपीनाथ तळवलकरांनी घडविलेले दर्शन. संवेदनाशील मनावरचे हे ठसे. मात्र यातच त्यांची मोहकता आणि आकर्षण आहे, तसेच यातच त्यांची मर्यादाही आहे. विशेषत:, "आत्माविष्कार करताना त्यापासून इतरांना–विशेषत:,–संस्कारक्षम मनाच्या कुमार–युवकांना–काही जीवनसत्त्व द्यावे ही माझी भूमिका कधी सुटत नाही" अशी प्रौढी जेव्हा लेखक मिरवतो, तेव्हा ही मर्यादा जाणवते. जीवनसत्त्वांचा पुरवठा करण्यासाठी एसेमच्या भव्य व्यक्तिमत्त्वाचे भव्यत्व उलगडून दाखवले गेले असते तर जास्त मदत झाली असती. 'जे रूट'-सारखे बालिश योगायोगही खुपतात. ही यादी आणखीही वाढविता येईल किंवा प्रत्येक आद्याक्षरांची अशी यादी करता येईल. ते असो. पुस्तक वाचल्यावर मनावर परिणाम करते ती विशुद्ध मैत्रीतल्या आनंदाची आणि मैत्रीविषय झालेल्या भव्य-त्वाच्या स्पर्शाने पाझरणाऱ्या धन्यपणाची आल्हादक जाणीव. एसेमचे 'दिव्य जीवन दीर्घकाल ज्याला समरसतेने पाहण्याचे भाग्य लाभले' त्या या त्यांच्या मित्राविषयी धन्योद्गार काढावेत असे हे लिखाण आहे.

**—निशिकांत मिरजकर**

**[ 'माझा सांगाती' – गोपीनाथ तळवलकर : कॉन्टिनेन्टल प्रकाशन : किंमत : दोन रुपये : पृष्ठे ९७ ]**

# मधल्या भिंती | बुडत्याचा पाय खोलात

## मुंबई येथे अन्तिम स्पर्धेत उतरणार

### शरद गोखले

राज्य नाटच महोत्सवाच्या पुणे केंद्रातील स्पर्धेमध्ये शेवटच्या आठवड्यात झालेल्या रंगतदार प्रयोगांनी स्पर्धेतील चुरस वाढली. या आठवड्यात नगरचा अपवाद वगळता सर्व प्रयोग स्थानिक नाटचसंस्थांनी सादर केले. पण 'दर्जा'मध्ये मात्र पुणेकरांच्या बरोबरीचे नगरकर राहिले.

प्रयोगात्मक यशांचे दृष्टीने विचार करता महाराष्ट्रीय कलोपासक या संस्थेचे 'मधल्या भिंती' श्रेष्ठ दर्जाचे वाटले. विजय तेंडूलकरांची नाटके तिरकस असतात. कथावस्तू छोटी असते. कथानक पुढे म्हणून जात नाही. प्रेक्षक त्रासतो. परंतु नटसंच चांगला असेल, नाटककाराने लिहिलेले प्रेक्षकांपर्यंत पोहोचविण्याची ताकद त्यांच्यामध्ये असेल तर तेंडूलकरांची नाटकेही यशस्वी होतात. हाच अनुभव 'मधल्या भिंती'च्या वेळीही आला.

'मधल्या भिंती' सादर करताना कलोपासकांनी नाटकाच्या निर्मितीची व कलात्मक बाजूंची भरपूर तयारी करून नाटच-स्पर्धेत उतरून या बाबतीतील आपला लौकिक कायम ठेवला.

दिग्दर्शक राजा नातू यांनी कलाकारांच्या निवडीपासून ते सेटवरील बारीकसारीक तपशिलांपर्यंत बारीक लक्ष घातल्याचे दिसून आले.

एक मध्यमवर्गीय कुटुंब, त्यातील माणसांच्या सुख-दुःखाचा मागोवा घेणारी ही कथा आहे. आज समाजात या वर्गाच्या संदर्भात ज्या गोष्टी आढळतात, त्यांचा प्रत्ययकारी आविष्कार या नाटकामध्ये पाहावयास मिळतो. या घरामध्ये माणसे पाच, प्रत्येकाचा स्वभाव वेगळा, वृत्ती वेगळी, परिस्थितीच या माणसांच्या स्वभावाचे जडणघडण करीत आहे.

मॅट्रिकपर्यन्तचे शिक्षण कसेबसे उरकून नोकरी करणारा सदा, या शिक्षणालाही मुकावे लागणारा प्रभा, आणि शिक्षण घेण्यासाठी धडपडणारा परंतु परिस्थितीची जाण असलेला दत्तू येथे पाहावयास मिळतो. कुटुंबप्रमुख आपल्यापरीने

गाडा ओढण्याचा प्रयत्न करत असतो. अडचणी आल्या तरी मानवी जीवनाचे काल-चक्र चालू राहते. घरामध्ये सदूच्या लग्नाचा विषय सुरू होतो. एका विशिष्ट परिस्थितीमध्ये सदूने आपल्या आईला ' तू पसंत केलेल्या मुलीशी मी लग्न करीन, ' असे वचन दिलेले असते. लेकाच्या वचनावर सर्वस्वी अवलंबून राहून आई मुलगी ठरवते. भावनेच्या भरात दिलेले वचन इच्छा असूनही सदूकडून पाळले जात नाही. मुलावरील विश्वासास तडा जाऊन सोसलेल्या खस्ता अहंकाराच्या जिद्दीने उभ्या राहतात. सदू आपल्या पसंतीच्या मुलीशी—मंदाशी—लग्न करतो. त्यातून निर्माण झालेल्या गुंतागुंतीतून कुटुंब विनाशाकडे वाटचाल करू लागते. बोटभर कथा तीन अंकांमध्ये सांगितली असल्यामुळे मानसिक संघर्ष व व्यक्तिरेखांच्या मनोविश्लेषणा-त्मक बाजूंना नाटकात महत्त्वाचे स्थान आहे.

## यशाची चढती कमान-कलोपासक

" यशाचे दृष्टीने धोकादायक नाटक " पत्करूनही कलोपासकांनी प्रथम श्रेणीचे यश मिळवले. भरपूर मेहनत, कलाकारांची अभिनयाची अचूक समज, नाटकाचे यश द्विगुणित करणारा श्री. आनंद पै यांचा सेट; मोजके परंतु परिणामकारक पार्श्व-संगीत आणि नाट्य—निर्मितीच्या या सर्व अंगांवर श्री. राजा नातू यांनी घेतलेले परिश्रम यांतून प्रयोगाचे यश साकार झाले आहे.

नवीन कलावंतांना स्पर्धेमध्ये संधी देण्याची या संस्थेने यंदाही परंपरा पुढे चालवली. ' पुरुषोत्तम करंडक स्पर्धे 'मध्ये ' फर्ग्युसन 'च्या ' अबोल झाली सतार '-मध्ये चमकलेल्या दिलीप कोल्हटकर व रेखा किर्लोस्कर यांनी ' मधल्या भिंती '-मधून राज्य पातळीवरील स्पर्धेमध्ये प्रथमच भाग घेऊन आपली निवड अचूक असल्याचे सिद्ध केले. सदाची भूमिका करणाऱ्या अरविन्द साने यांची प्रगती वाखाणण्या-सारखी आहे. प्रत्येक नवीन भूमिकेबरोबर ते पुढे सरकत आहेत.

नाटकातील सर्व स्त्री कलावंतांचे भावनाविष्काराचे कौशल्य वाखाणण्यासारखे होते. अत्यंत अवघड भूमिका वाट्यास येऊनही कु. उत्तरा बिडये यांनी आत्म-विश्वासाने साकार केलेली शालन प्रेक्षकांची सहानुभूती घेऊन गेली.

अयत्या वेळी पात्र-योजनेत बदल करून गोपीनाथ टिपणीसांकडे नानाची भूमिका सोपवण्यात आली. स्पर्धेतील उत्कृष्ट कलावंत म्हणूनच त्यांचा गौरव करावा लागेल. भूमिकेशी कमालीचे तादात्म्य, संवादफेकीचे अचूक ज्ञान व रंगभूमीवर वावरताना आवश्यक असणारी सहजता यांचा वापर करून त्यांनी ' नाना ' उभा केला. उषा जोग (आई) यांनी त्यांना उत्कृष्ट साथ दिली.

## ' भोवरा ' वेगळा वाटला

स्पर्धा निकाल अंदाजाला शेवटच्या आठवड्यात जी अनेक वळणे मिळाली, त्यां-मध्ये नगरच्या ' भोवरा ' या नाटकाने भर घातली. वेगळा विषय, मोजकी पात्रे व उत्कृष्ट प्रयोग या त्रयींची सांगड लेखक-दिग्दर्शक-नट प्रा. एम्. डी. तोडरमल

यांच्या या नाटकामध्ये पाहावयास मिळाली.

दारिद्र्यामुळे प्रेमाला मुकावे लागल्याने वृंदावनचा तोल ढळतो. पुत्रहीन धनिकाचा आश्रय मिळाल्याने दारिद्र्य जाते. बुद्धिमत्तेच्या जोरावर यशस्वी संपादक म्हणून नावलौकिक मिळतो. ' ज्वाला 'सारख्या दैनिकाचा वापर संविसाधूंची ढोंगे उजेडात आणण्यासाठी होऊ लागतो. याच मनोवृत्तीत तयार झालेल्या – जगावर सूड उगवण्याची आकांक्षा बाळगणाऱ्या मोहन गंधेचे (मोहन मुंगी) त्यांना सहकार्य लाभते. सूडाच्या आगीतून अनेकांना होरपळत वृंदावन भाऊसाहेबांपर्यन्त येऊन पोहोचतो. एके काळी आपली कन्या देण्यास नकार देणाऱ्या भाऊसाहेबांना तो कोंडीत पकडतो. नियती येथेही त्याला दगा देते. भाऊसाहेब आत्मघात करतात. वृंदावनची सूडाची आकांक्षा अपुरी राहते. आपला मार्ग चुकल्याचे मोहन गंधेला उमजते. वृंदावन ते समजू शकत नाही. अपुऱ्या सूडाच्या धक्क्यातच तो मरण पावतो.

प्रा. तोडरमल यांचा वृंदावन म्हणजे आत्मविश्वासाच्या अभिनयाचा आविष्कार. स्वत: लेखक असल्याने अपेक्षित वृंदावन साकार करणे त्यांना सुलभ झाले आहे. नाटकातील अन्य दोन्ही पात्रे भाऊसाहेब (पद्माकर गंवे) व शंकर (मधू देशमुख) प्रभावी ठरल्याने उत्तम संच म्हणूनही या संघास यश मिळू शकले.

**' श्रीमंता 'चे घोडे रेसला मागे**

तेंडूलकरांच्या सामान्य नाटकामध्ये ' श्रीमंत 'ला अग्रस्थान द्यावे लागेल. अत्यंत वैभवसंपन्न सेट, हे या नाटकाचे मुख्य आकर्षण. म्हणजे नाटकही तसं बरं झालं, पात्रांना समज दिसली, पण ' ग्रिप का कायसंसं म्हणतात ते न सापडल्याने स्पर्धेच्या ' रेस ' मध्ये ' श्रीमंतां 'चे घोडे मागे पडले. स्पर्धेतील यशाची भरपूर पूर्वपरंपरा असल्यामुळे पी. डी. ए. व कलोपासक या नाटय–संस्थांच्या प्रयोगाला नेहमीच ' हाऊस फुल्ल ' गर्दी असते. यंदाही तोच अनुभव आला.

**' भ्रमाचा भोपळा ' आवाजाशिवाय फुटला**

पी. डी. ए. चे एक सदस्य श्री. जोगळेकर यांनी लिहिलेले ' ज्वालेत उभी मी ' हे नाटक घेऊन ही संस्था स्पर्धेत येणार होती. परंतु ऐन वेळी स्पर्धा-समितीने नाटकास परवानगी नाकारल्याने संस्थेने आचार्य अत्रे यांचे ' भ्रमाचा-भोपळा ' हे चावून चोथा झालेले नाटक स्पर्धेत उतरवले. ( ' ज्वालेत उभी मी ' या नाटकास नाटक-तमाशा समितीने मान्यता दिली असल्याने त्याचे प्रयोग अन्यत्र होऊ शकतील हा भाग निराळा. ) प्रयोग बऱ्यापैकी झाला असला तरी स्पर्धेतील यशाच्या दृष्टीने या नाटकास किंचितही स्थान नाही. एक करमणूक करून गेलेला रंजक प्रयोग एवढेच मर्यादित प्रशस्तीपत्र यंदा या नाटचसंघास द्यावे लागले.

दिग्दर्शक म्हणून श्रीराम खरे यंदा स्पर्धेमध्ये प्रथमच आले. ' चांगल्या टीमचे समाधानकारक ' नाटक देण्यापलीकडे त्यांची उडी जाऊ शकली नाही. नेपथ्यकार श्रीधर राजगुरू यांनी उभे केलेले ' भोपळे-भवन ' कृत्रिमतेमुळे न पटणारे वाटले.

## ‘ पराभव ’

नाशिक युवक सांस्कृतिक मंडळ या नवीन संघटनेचे स्पर्धेतील हे पहिलेच वर्ष. बाळ भाटे यांचे ‘ पराभव ’ हे कोरे नाटक या मंडळींनी स्पर्धेमध्ये उतरवले. लेखक बाळ भाटे व दिग्दर्शिका कुमुद अभ्यंकर या दोघांनाही गेल्या वर्षी स्पर्धेमध्ये चांगले नाव मिळाले होते. स्वाभाविकपणेच अधिक भरीव कामगिरीची त्यांच्याकडून अपेक्षा होती.

सत् आणि असत् यांचा झगडा सतत चालू आहे. ‘ अंतिम विजय सत्याचाच होतो,’ ही आपली सर्वसाधारण धारणा. याच कल्पनेची बैठक घेऊन भाटे यांनी आपल्या नवीन नाटकाची उभारणी केली आहे. एका अत्यंत सत्प्रवृत्तीच्या शिक्षकाला परिस्थितीमुळे आपला जीवनमार्ग बदलावा लागतो. नव्हे नकळत तो प्रवाहपतित होतो. गुंडांकडून अब्रू लुटलेल्या आपल्या कन्येचा स्वीकार करण्याची विनंती मास्तर आपल्या जुन्या व त्यांच्यावर परम श्रद्धा ठेवणाऱ्या विद्यार्थ्यास करतात. आणि त्यांचा हा विद्यार्थी–‘ शुद्ध जोशी ’ या गोष्टीस तयार होतो. सतत कटू अनुभव आलेल्या मास्तरांना दिलासा मिळतो आणि ‘ अंतिम विजय ’ सत्याचाच होतो.

नाटकामध्ये सर्वप्रकारचा मालमसाला आहे. ‘ हुंडा पद्धतीवर टीका, चुकीचे निकाल जाहीर करून नंतर ते दुरुस्त करणाऱ्या विद्यापीठांवर टीका– या चुकीच्या संभाव्य परिणामांची दखल, भिकार नाटकांवर टीका, कोल्हटकरांची भरपूर चेष्टा आदी सर्व घटनांनी कथानकाची गती बदलली आहे. नाही म्हणायला, सर्वांच्या हेटाळणीस पात्र झालेल्या संगीतवेड्या ‘ श्रीधर’ची व्यक्तिरेखा मात्र प्रभावी व सुसंगत वाटते. कोल्हटकरांची टिंगल उडवणारा ‘ सदू ’ नाटकामधून सबंध उचलला तरी कथावस्तूला किंचितही धक्का लागणार नाही. ‘ रिलीफ ’साठी मात्र सदूचा चांगला उपयोग करून घेतला आहे.

नाटकाचे प्रायोगिक यश समाधान देणारे होते. गुंडगिरीवर पुढारीपण मिळवू पाहणाऱ्या दादा काळे यांच्या भूमिकेसाठी आवश्यक असणारी फिगर व आवाज असूनही श्री. शंकर गवळी प्रभावी ठरू शकले नाहीत. कृत्रिम अभिनयाचा आधार घेतल्याने त्यांच्या यशास मर्यादा पडल्या आहेत. मास्तरांभोवती संपूर्ण कथानक उभे असल्याने त्यांच्या ‘ यशास ’–प्रयोगास–महत्त्वपूर्ण स्थान आहे. श्री. विष्णू दातार यांना अभिनयाची समज असल्याचे दिसून आले.

सखारामच्या छोट्या भूमिकेत रामदास बर्वे प्रेक्षकांची पावती घेऊन गेले.

नाटकाची निर्मितीमूल्ये समाधानकारक होती. विशेषतः, सुरेश कुलकर्णी यांनी परिश्रमपूर्वक उभे केलेले मास्तरांचे घर नाटकाच्या यशामध्ये भर टाकून गेले.

मराठी रंगभूमीवरील रहस्यमय नाटकांचे प्रमाण सध्या वाढत असले, तरी त्यांचा दर्जा मात्र फारसा समाधानकारक नसतो. स्पर्धेमध्ये या प्रकारच्या नाट-

कांना यश मिळाल्यामुळे नाट्यमहोत्सवात एखाद दुसरे तरी रहस्यमय नाटक हमखास पाहावयास मिळते.

'अठ्ठावीस दिवस' हे श्री. रंगा संत यांचे नाटक. मूळ नाटक मॉरी डायलचे असले, तरी श्री. संत यांनी या नाटकास 'मराठी साज' चांगल्या प्रकारे चढवला आहे. 'सरस्वती मंदिर' नटसंघाने नाटकावर भरपूर मेहनत घेऊन त्याचा उत्कृष्ट प्रयोग सादर केला. एखादे रीळ दाखवून टायटल्स दाखवण्याचे हिंदी रहस्यमय चित्रपटाचे तंत्र, श्री. अनंत ओक यांनी उत्तम प्रकारे राबवले.

राज कर्णिक हा रंगभूमीवरील नावाजलेला कलावंत. पत्नीचा अपघाती मृत्यू होऊनही परिस्थितिजन्य पुराव्यामुळे राजवर खुनाचा आरोप ठेवण्यात येतो. या आरोपातून सुटण्याचा एकमेव मार्ग म्हणून 'वेडाच्या भरा'त हे कृत्य केले असल्याचे राज कबूल करतो. वेडयांच्या हॉस्पिटलमधून सुटण्याची शक्यता नाही, याची खात्री झाल्यावर राज तेथून पळून जायचा निर्णय घेतो. हॉस्पिटलच्या नियमाप्रमाणे पळून गेल्यापासून 'अठ्ठावीस दिवस' पुन्हा पकडला न गेल्यास त्याच्या केसचा पुनर्विचार होऊन त्यातून त्याची सुटका होण्याची शक्यता असते. या नियमाची निश्चित माहिती करून घेऊन राज तेथून पळून जातो व एका बाजूला असलेल्या एका बंगलीचा आश्रय घेतो. 'अठ्ठावीस दिवस' संपण्यास काही मिनिटांचा काळ बाकी असताना त्याच बंगलीच्या मालकाच्या खुनाचा आरोप त्याच्यावर येतो. परंतु याच वेळी खुनाचा एक एक धागा उलगडला जाऊन खरा खुनी उजेडात येतो.

नाटकाची बांधणी पुष्कळच तर्कशुद्ध आहे. नाटकात 'रिलीफ' मुळीच नाही. आणि तरीही प्रेक्षकास शेवटपर्यंत म्हणण्याजोगा कंटाळा येत नाही. या वस्तुस्थितीतच नाटककाराचे यश आहे.

नाटकाचे दिग्दर्शक श्री. अनंत ओक यांनी बारीक तपशीलांमध्येही लक्ष घालून प्रयोग निर्दोष करण्याचा प्रयत्न केला आहे. कलावंतांची निवडही त्यांनी चोखंदळपणे केली असून प्रत्येक कलाकाराच्या अभिनय-गुणांचा पुरेपूर लाभ उठवला आहे. डॉ. फाटक (पुरुषोत्तम सहस्रबुद्धे), राज कर्णिक (शाम पटवर्धन), शिला तांबट (जयश्री जोशी) ही तिन्ही प्रमुख पात्रे प्रभावी ठरल्यामुळे प्रयोगाचे यश चांगलेच उंचावले.

स्पर्धेतील एक उत्कृष्ट नेपथ्यही याच प्रयोगात पाहावयास मिळाले. नेपथ्याबद्दल प्रेक्षकांकडून टाळी घेणारे हे स्पर्धेतील पहिलेच नाटक. 'सेट वरील' प्रॉपर्टीच्या मांडणीमध्येही कल्पकता आढळून आली. आणि सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे दिग्दर्शक श्री. अनंत ओक यांनी मांडके–केळकर या जोडीने उभारलेल्या या सेटचा पुरेपूर उपयोग करून घेतला. कलाकारांचा 'मनमोकळा' व वास्तव अभिनय याचाही या प्रयोगाचे एक वैशिष्टय म्हणून उल्लेख केला पाहिजे. दोन अंकांतील वेळेत बचत करण्याची फार आवश्यकता होती. रहस्यमय नाटकाला या गोष्टीकडे विशेष लक्ष

द्यावे लागते; अन्यथा कथानकामध्ये गुंतून राहिलेला प्रेक्षक चटकन कथा–कक्षा ओलांडून बाहेर पडतो. आणि प्रेक्षकांना पुन्हा कथानकाकडे नेण्याचे प्रयत्न कलावंतांना करावे लागतात. यंदाच्या स्पर्धेतील यशस्वी प्रयोगांमध्ये 'अठ्ठावीस दिवस'चे स्थान पुष्कळच वरचे आहे.

**'दर्वबिंदूंचे मोती झाले'**

नाटककार श्रेष्ठ, की त्याची कलाकृती रंगभूमीवर साकार करून तिला प्रायोगिक यश देणारा कलाकार श्रेष्ठ या वादाचे उत्तर पुष्कळच गुंतागुंतीचे आहे. कारण यशावर दोघेही हक्क सांगतात. परंतु अपयशाचे खापर मात्र प्रत्येकजण दुसऱ्यावर फोडण्याचा प्रयत्न करतो.

कॉस्मॉपॉलिटन कल्चरल सोसायटीने स्पर्धेमध्ये केलेल्या 'दर्वबिंदूंचे मोती झाले' या नाटकाचे निमित्ताने वरील बाबीची आठवण झाली. क्रांतिकारी राजकारणाशी संबंधित असणारे एक वेगळ्या प्रकारचे नाटक श्री. रमेश सुळे यांनी लिहिले आहे. परंतु नाटक सादर करणाऱ्या कॉस्मॉपॉलिटन कल्चरल सोसायटीच्या नटवर्गाची ताकद फार कमी पडल्यामुळे प्रयोगाचा दर्जा पुष्कळच खालावला.

लष्करी क्रांती यशस्वी करून व तिचा दीर्घकाळ उपभोग घेऊन निवृत्त झालेल्या एका कर्नलच्या साठाव्या वाढदिवशी प्रतिक्रांतिकारकांशी सहकार्य केल्याचा आरोप त्याच्यावर ठेवण्यात येऊन त्यास नजरकैद करण्यात येते. 'कर्नल'चा अत्यंत जिवलग स्नेही असलेल्या मेजर दळवींवर ही कामगिरी सोपवण्यात येते. परिस्थितीमुळे मित्रद्रोह करावयास निघालेल्या 'मेजर'च्या मानसिक संघर्षाची परिणती त्याच्या आत्महत्येत होते. नाटक अधिक परिणामकारक करण्यासाठी प्रतिक्रांती यशस्वी होते. ही घटना टाळणे आवश्यक होते.

नाटकातील सर्व स्त्री–पात्रे सुमार आहेत. ब्रिगेडिअर झालेल्या जोशींची संवाद म्हणताना बोवडी वळल्याने प्रसंगाचे गांभीर्य नाहीसे झाले. कर्नलांनी (मधुकर गिजरे) अकारण केलेला आरडाओरडा अवास्तव वाटला. भूमिकेस आवश्यक असणारे व्यक्तिमत्त्व नसूनही 'खर्ज' लावून संवाद म्हणण्याच्या पद्धतीमुळे मेजर दळवी (गोविंद करमरकर) उठून दिसले. राघवेंद्र कडकोळ (मोहन) यांनी नाटकात कामे करण्याचे सोडून गोपीकृष्णकडे नृत्याचे पाठ घेण्यासाठी तातडीने रवाना व्हावे, अशी आमची आपली एक सूचना आहे. बाकीची अंगे फारच बेताची.

एखाद दुसऱ्या नाटकाची 'उंची' फार वर व बाकीची पुष्कळच खाली असे दृश्य यंदा दिसले नाही. दर्जाच्या दृष्टीने तीन गटांमध्ये वर्गीकरण करावयाचे झाल्यास चार नाटके 'क' वर्गामध्ये, ६ नाटके 'ब' वर्गामध्ये व ६ नाटके 'अ' वर्गामध्ये मोडतात. दीर्घकाळ चाललेल्या या महोत्सवास नाट्यरसिकांचा उदार आश्रय लाभला होता.

●

# भिंतीच्या तुंबड्या

सुधाकर राजे

## ☐ ॲटोमॅटिक सावकार

पूर्वी आपल्याकडे सावकारी पाशावर हृदयद्रावक नाटके लिहिली गेली. नाही तरी सावकार म्हटला की निर्दय, दामदुप्पट व्याजाने पैसे लुबाडणारा व नाटकातल्या व्हिलनप्रमाणे वेळी अवेळी खुनशी हास्य करणारा एक भयंकर माणूस अशी माझी-देखील समजूत होती. पण आता सावकार नामक माणूस जगातून नष्ट झाला आहे. म्हणजे त्याची जागा यंत्राने घेतली आहे. पैसे उसने देणारे एक ॲटोमॅटिक यंत्र जपानमध्ये तयार झाले आहे ! चला, एक मोठा प्रश्न सुटला. आता हे यंत्र हिंदुस्थानात तयार व्हायचा अवकाश की सर्व मध्यमवर्गीयांच्या अर्थकारणाला ॲटोमॅटिक आधार मिळेल. आता आमचेच बघा. महिन्याची वीस तारीख उलटली की माझी सर्व भिस्त शेजारच्या बन्या केळुस्करच्या पाकिटावर, अन् बन्याची भिस्त पलीकडच्या आप्पा खोताच्या पाकिटावर असते. बरोबर एकवीस तारखेला मी नित्यनेमाने बन्याच्या घरी जातो. टूथपेस्टच्या जाहिरातीसारखे हास्य करतो, बन्यालाच विचारतो, " काय बन्याबापू, आहात का ? " अन् मग सहज आठवल्यासारखे करून म्हणतो, " बरी आठवण झाली. बन्याबापू, या वेळी साली अन्‌एक्स्पेक्टेड अडचण आलीय्...आमचा बॉस चाललाय् ट्रान्स्फरवर अन् त्याला फेअरवेल पार्टी द्यायचीय. लेकाच्यांनी वर्गणी ठेवलीय् एकदम पाच रुपये.—जरा देता का ? एक तारखेला नक्की आणून देतो. " बन्या मुकाट्याने माझ्या हातावर पाचाची नोट काढून ठेवतो.

तसा बन्या लाख माणूस.—कारण दर एकवीस तारखेला मला अपेक्षेप्रमाणे अनपेक्षित अडचण कशी येते हे तो मला विचारीत नाही. दर दोन महिन्यांनी माझ्या साहेबाची बदली कशी होते हेही तो मला विचारीत नाही. रोज आठ आण्याची भाजी या हिशेबाने महिन्यातल्या उरलेल्या दहा दिवसांचे पाच रुपये मी बन्याकडून घेतलेले असतात हे त्याला माहीत असूनही तो तसे दाखवीत नाही. का ? एक तर बन्या लाख माणूस आहे म्हणून. अन् दुसरे म्हणजे अगदी कानामात्रेचाही फरक न

करता हीच रेकॉर्ड लावून त्याला बावीस तारखेला आप्पा खोताकडून दहा रुपये काढावयाचे असतात म्हणून.

तसे पाहिले तर मी, बन्या अन आप्पा, तिघेही मध्यमवर्गीय. पण त्यातल्या त्यात बन्याचा पगार माझ्यापेक्षा पंचवीस रुपये पासष्ठ पैशांनी जास्त आहे, अन आप्पा खोताला तर बन्याहून पंचवीस रुपये जास्त मिळतात. म्हणजे आम्हा तिघांत बन्या मध्यम-मध्यमवर्गीय, मी कनिष्ठ मध्यमवर्गीय अन आप्पा उच्च मध्यमवर्गीय. (-खरे म्हणजे आप्पादेखील तेवीस तारखेला त्यांच्या हपिसातल्या संतू चपराश्या-कडून उसनवारी करतात अशी मला कुणकुण लागली आहे. )

पण आता आमचे नष्टचर्य संपले. आता उसन्या पैशाची लयलूट होणार. आता बटण दावले की पैशाचा पाऊस पडणार.-पण मला एक मात्र धास्ती पडली आहे. ती म्हणजे या अ‍ॅटोमॅटिक सावकाराला सत्यशोधक अ‍ॅटॅचमेंट लावले तर आम्हा तमाम उसनखोरांची दैना उडायची. कारण, " बॉसला निरोपाची पार्टी द्यायचीच " असे आम्ही म्हटले अन हात पसरला की यंत्रातून हिरवी नोट बाहेर पडायच्या ऐवजी टाइप केलेली नोट हातात पडायची- " आपला बॉस गेल्याच महिन्यात नवीन आला असून ऑफिसच्या नियमानुसार आता किमान तीन वर्षे तरी तो बदलणार नाही. सबब ही सबब नामंजूर आहे. " तेव्हा या यंत्राला पाझर फुटेल अशी सबब शोधून काढणे महाकठीण होऊन/ बसायचे. नकोच ते ! असल्या चिकित्सक यंत्रापेक्षा बन्याच बरा !

## □ परमेश्वराच्या फॅक्टरीतला नुकसानी माल

परमेश्वराच्या हपिसात एखादा अमेरिकन 'एफिशियन्सी एक्सपर्ट' तपासणीला गला तर परमेश्वरावर डिस्मिस् व्हायचीच पाळी यायची असे आता मला वाटू लागले आहे. मागे एकदा देवाने न पोहता येणारे बदक केले होते. आता तर चक्क पांढरा कावळा केला आहे. असा एक कावळा म्हणे हल्ली मधून मधून आसाममध्ये एका ठिकाणी दिसतो असे परवा पेपरात वाचले. काय हा गलथानपणा ! किती कावळे तयार करावयाचे आहेत अन् काळा रंग किती उरलाय् याचा आधीच अंदाज घेऊन वेळच्या वेळी इंडेंट पाठवायला नको का ? बरं, रंग नाही तर तयार केलेला कावळा निदान फॅक्टरीतून बाहेर पाठवायचा तरी नाही. खरोखर, परमेश्वराची ही बेपर्वाई फक्त हिंदुस्थानातल्या एखाद्या सरकारी कारखान्यातच चालू शकेल. छे, छे, परमेश्वरा, माल जरा पाहून पाठवीत जा बुवा ! नाही तर साबण घासून घासून गोऱ्या होणाऱ्या कावळ्याची सुरस आणि चमत्कारिक कथा अक्षर बालवाङ्मयातून काढून टाकावी लागायची.

●

२४ डिसेंबर १९६६

# कै. गणपतराव बोडस

## आणि

# बालगंधर्व

## □ धोरणी गणपतराव

'गंधर्व नाटक मंडळी' ही धनाढ्य व रसिक संस्थानिकांच्या—विशेषतः, बडोदे संस्थानच्या—उदार आश्रयाखाली, तसेच नटसम्राट बालगंधर्व, गणपतराव बोडस, पटवर्धन, मा. कृष्णराव, देवधर इत्यादी नटसंच, देवल, गडकरी, खाडिलकर यांच्यासारख्या नाटककाराच्या व स्वतः बोडस, बाळासाहेब पंडित यांसारखी व्यवहार-कुशल मंडळी या सर्वांच्या हार्दिक सहकार्यावर चढत्या चंद्रकलेने वाढत होती, भरभराटीस लागली होती.

पण पुढे पुढे बालगंधर्वांचे अव्यवहारी धोरण, खर्चिक वृत्ती व बेहिशेबी स्वभाव-धर्म अशा अनेक गोष्टींमुळे 'गंधर्व संस्थेत' हलके हलके सावकार शिरू लागला व कर्जाचा आकडा दिवसेंदिवस फुगत चालला. नटश्रेष्ठ बोडस हे त्या वेळी ज्या-प्रमाणे 'गंधर्व संस्थे'तील जबाबदार कलावंत होते, त्याचप्रमाणे संस्थेचे ते एक भागीदारही होते व त्यामुळेच वेळोवेळी नटसम्राटांच्या अशा वागण्यामुळे ते त्यांची कानउघाडणी करीत असत. पण त्याचा उपयोग मात्र फारसा होत नव्हता व संस्थेचा कर्जबाजारीपणा वाढतच चालला होता. एवढेच नव्हे तर या गोष्टींना व्यवस्थापक श्री. पंडित व श्री. बोडस या व्यक्तीही कमीअधिक प्रमाणात जबाब-दार आहेत अशी चर्चा व प्रचार नटसम्राटांचे पाठीराखे व असंतुष्ट व्यक्ती करीत असत. पण वादंगामुळे अथवा एकमेकांच्या उखाळ्यापाखाळ्या काढून संस्था कर्ज-मुक्त होणार नव्हती तर सर्वांनीच जबाबदारीने व खबरदारीने राहून संस्था एकदा कर्जमुक्त करावी या भावनेने श्री. बोडस, पंडित वगैरे गप्प बसत व वादविवाद न वाढविता कर्जमुक्त कसे होऊ याकडेच ते अधिक लक्ष देत असत. पण याही शांततेने व्हावा तसा उपयोग होत नव्हता ! संस्थेचे कर्ज जवळ जवळ तीन लाख

रुपयांच्या घरात गेले होते व गंधर्व संस्था मुंबईच्या विख्यात सॉलिसिटर लाड यांच्याकडे गहाण पडली. तेव्हा वेगळे होऊन अथवा भांडणतंटा करून स्थिती सुधारणार नाही व त्यात प्रतिष्ठाही कोणाचीच नाही, म्हणून समंजसपणाने, प्रसंगी थोडीशी मानहानीही पत्करून, नटसम्राटांच्या कलाकलानेच घेऊन, या सर्वांनी हरप्रयत्नाने, लवकरच संस्था कर्जमुक्त केली व मोठ्या मनाने याचे श्रेय बालगंधर्वांना दिले आणि मग मात्र नटसम्राटांना बोडसांनी बजावले की, ' अशाच धोरणी आणि व्यवहारी वृत्तीने संस्था पुढे चालू ठेवा. अन्यथा नेहमीच्या तुमच्या फाजील खर्चिक व बेहिशेबीपणाने संस्था पुन्हा सावकाराच्या घशात घालाल. त्या वेळी मात्र तुमचे पितळ उघडे पडेल; मग मात्र बोडसाला अथवा पंडितांना दोष देता येणार नाही ' असे स्पष्ट बजावून, योग्य वेळी श्री. बोडस उजळ माथ्याने गंधर्व-संस्थेतून बाहेर पडले.

## □ गाढविणीचे दूध

बालगंधर्वांच्या बेहिशेबी वृत्तीमुळे बोडस त्यांचेवर रागावत असत, तर कधी कधी रागाच्या भरात बालगंधर्वांना ते " तुम्ही गाढव आहात " म्हणूनही बोलत, संभावना करीत असत ! पण पालथ्या घागरीवर पाणी ! नटसम्राटांचा हा असा ' गाढवपणा ' वरचेवर चालायचा व बोडसांचे त्यांना अधूनमधून हे असे शेरे मिळणे चालूच राहावयाचे !

एकदा बोडसांची थोरली मुलगी ही फिट्सने आजारी होती. त्या वेळी त्यांचा मुक्काम पुण्याला होता. तेव्हा बोडसांच्या मुलीची प्रकृती पाहायला म्हणून बालगंधर्वांच्या मातोश्री बोडसांच्या घरी आल्या होत्या. गणपतराव बोडसही त्या वेळी घरीच होते. बोलता बोलता बालगंधर्वांच्या मातोश्री बोडसांना म्हणाल्या की, " तुम्ही तुमच्या मुलीला गाढविणीचे दूध का देत नाही ? " गाढविणीचे दूध हे एक औषध आहे याची बोडसांना बिलकुल कल्पना नव्हती. तेव्हा त्यांनी एकदम चमकून विचारले,

" काय म्हणालात ? "

" अहो, गाढविणीचे दूध देत चला तुमच्या मुलींना ! मीसुद्धा माझ्या सर्व मुलांना गाढविणीचे दूध देत असते अधून मधून ! "–बाई उत्तरल्या

आश्चर्याने बोडस क्षणभर पाहतच राहिले व एका गूढ गोष्टीचा उलगडा झाल्याच्या आनंदाने बोडस उद्गारले, " तरीच ! "

बालगंधर्वांच्या गाढवपणाचा आता त्यांना बरोबर संदर्भ लागला व लगेच अंगावर कपडे चढवून थेट राम गणेश गडकरी यांच्या घरी ते दाखल झाले व गडकऱ्यांना त्यांनी ही दुधाची भानगड सांगितली. साऱ्या महाराष्ट्राला खदखदा हसविणारे गडकरीदेखील पोट धरधरून हसले !

## ☐ इमान

१९५६ मध्ये बोडसांची प्रमुख भूमिका असलेले 'संशयकल्लोळ' व 'मानापमान' हे दोन खेळ कराड येथे लावले होते. बोडस यांच्याप्रमाणेच गायक नट राम मराठे, मीनाक्षी इत्यादिकांच्या भूमिका त्यात होत्या. पण 'बोडसांची भूमिका' हे आकर्षण मोठे होते. त्यामुळे प्रयोगास गर्दी खूप होती. पण त्यामध्ये एक मोठी उणीव राहून गेली होती. 'संशयकल्लोळ' या प्रयोगातील दुसऱ्या व तिसऱ्या अंकातील कुळंबिणीच्या भूमिकेसाठी ज्या दोन साहाय्यक स्त्री-कलावंत होत्या, त्यांना पुण्याहून वेळेवर निघणे जमले नाही व त्यामुळे ते प्रवेश गाळून नाटक 'साजरे' करण्याची वेळ आली होती. पण हे घडावे कसे? ोडसांना तर या गोष्टीची बिलकुल कल्पना नव्हती. कारण नेहमीप्रमाणे सर्व काही सिद्ध असेल या कल्पनेने ते निर्धास्त होते. बरे, त्यांच्या कडक स्वभावाची कल्पना असल्यामुळे ही गोष्ट त्यांच्या कानांवर घालून 'वेळ मारून' नेण्याची विनंतीदेखील करण्याचे धाडस होईना! अंक व प्रवेशाची वेळ जसजशी जवळ येऊ लागली तसतसे "अहो, तुम्ही व्हा पुढे! छे:, बुवा तुम्हीच सांगा!" असे घडू लागले. पण शेवटी मनाचा हिय्या करून संस्थेचे चालक श्री. बाळासाहेब कुलकर्णी हे बोडसांच्या खोलीत गेले आणि हा प्रकार त्यांच्या कानांवर घातला! काही वेळ तर बोडस हे अवाक् होऊन विस्मयाने श्री. कुलकर्णी यांच्याकडे पाहतच राहिले! पण अशा प्रसंगी ते तरी काय करणार? मोठ्या कष्टी मनाने त्यांनी हे सर्व 'सांभाळून' घेण्याचे कबूल केले. पण त्याच वेळी लगेच त्यांनी बजावले की, "उद्याचा 'मानापमान' सुरू होण्यापूर्वी सर्व कलावंत मंडळी मी समक्ष पाहूनच मग तिसरी घंटा देण्यास सांगेन! अन्यथा मी रंगभूमीवर पाऊल टाकणार नाही."

प्रेक्षकांची फसवणूक होत आहे याचे क्लेश मनाला होत असतानादेखील या गाळलेल्या प्रवेशांची यत्किंचितही कल्पना प्रेक्षकांना न लागू देता, कौशल्याने बोडसांनी पुढील अंक व प्रवेश सफाईने पार पाडले!

**[कै. बोडस यांच्या प्रथम वर्षदिनानिमित्त श्री. राजाराम कृष्णाजी कुलकर्णी यांनी पाठविलेल्या काही आठवणी.]**

---

**'आणि ड्रॅगन जागा झाला' ी लेखमाला**
**सात जानेवारीच्या अंकापासून सुरू होईल.**

---

# राशी भविष्य : श्री. गो. जोशी : सायनाचार्य, नाशिक.

२४ डिसेंबर ते ३० डिसेंबर १९६६

**मेष** :– कच खाऊपणाचे तटस्थतेचे धोरण सोडून देऊन काही भरीव व विधायक कार्य करण्याची वेळ आता आलेली आहे. ग्रहयोगही आपणांस साथ द्यायला उद्युक्त आहेत. सूर्य–शुक्रांचे भाग्यस्थानातील अस्तित्व आपणांस स्वयंप्रेरित बनवील.

प्रवासाचे प्रस्थान ठेवले जाईल, अनेकांच्या हार्दिक सहकार्यामुळे नव्या व्यवहाराची उभारणी मोठ्या हिरीरीने केली जाईल. हुकलेला लाभ, गेलेली प्रतिष्ठा पुन्हा मिळवू शकाल; साडेसातीची क्षिती न बाळगता आपण निर्धाराने वाटचाल करू लागाल तर यश अपेक्षेबाहेर पदरी पडेल.

हा आठवडा खूपच घाईगर्दीचा जाणवेल. असंख्य कामे हातावेगळी करून टाकाल. पैसा माफक मिळाला तरी प्रतिष्ठा फार मोठी मिळेल.

दि. २७–२८–२९ अपेक्षासाफल्याचा काल.

**वृषभ** :– शनी एकादशात–गुरू पराक्रमात. विशाल तेजोगोलांचा हा महान् त्रिकोण तुम्हांला हवं ते द्यायला कटिबद्ध आहे.

आपले व्यवसायिक क्षेत्र कोणतेही असो, प्रतिज्ञेने यश मिळवाल. नाट्य, साहित्य, कला ही तुमची खास क्षेत्रे. त्यातील तुमच्या वाट्यास येणारे विक्रमी यश पाहून अनेकांना तुमचा हेवा वाटू लागेल. बाराव्या राहूबद्दल ना खेद ना खंत. थोडेफार विरोधक डोके वर काढतीलही पण त्यांना ठोकरून काढणे कोणत्याही क्षणी शक्य आहे.

व्यवसाय क्षेत्रात काही भव्य-दिव्य-नव्य करून दाखवण्याचे तुमचे फारा दिवसांचे स्वप्न याच वेळी आकार घेऊ लागेल. पैसा अनेक मार्गांनी हाती येईल, तुमचे कर्तुत्व अपेक्षेबाहेर यश घेऊन उठेल. नव्या आशा अंकुराला लागतील. अपेक्षा बऱ्याच प्रमाणांत सफल होतील.

दि. २८–२९–३० गतिमान चारित्र्याचा प्रत्यय यावा.

**मिथुन** :– या आठवड्यापासून मंगळाची कठोरता, कटुता ओसरू लागल्याचा प्रत्यय येऊ लागेल. गेल्या ८–१५ दिवसांत झालेल्या अमाप खर्चाची भरपाई व्हावी, असे काही महत्त्वपूर्ण कार्य आपल्या हातून-घडून यावे.

दुसरा गुरू आणि दहावा शनी या दोघांनी जरी मनात आणले तरी तुमच्या लाख विवंचना मिटून प्रसन्न व प्रगत दिवस तुम्हांला दिसू लागतील. चौथ्या मंगळाची खडतर कारकीर्द आता संपुष्टात आल्यासारखीच आहे.

या आठवड्यात मनावरचे दडपण दूर झाल्यासारखे वाटू लागेल. स्थगित कामे गती घेऊ लागतील. भंगलेल्या आशा सांधल्या जातील. चारित्र्य पुनश्च निष्कलंक बनू लागेल. प्रत्यक्ष फार मोठा लाभ जरी या वेळी झाला नाही तरी भविष्यकालीन प्रगतीची आशा वाटू लागेल. जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पाडू शकाल. ऐन वेळी मित्र-हितचिंतकांची मदत मिळू लागेल.

दि. २८–३० काही प्रमाणांत यश लाभावे.

**कर्क :–** प्रसन्न चित्त आणि अमर आशा हेच तुमच्या यशस्वी जीवनाचे गमक. त्या तुमच्या मनोवृत्तीला अधिक पोषक असे वातावरण या वेळी निर्माण झालेले असल्यामुळे, तुम्ही हाती घेतलेले कार्य कितीही अवघड असो, ते अपेक्षेबाहेर यशस्वी ठरल्यावाचून राहणार नाही.

गेल्या ४–६ महिन्यांतील अपयश या वेळच्या अनुकूल ग्रहस्थितीमुळे धुवून निघेल. गेलेली प्रतिष्ठा पुन्हा लाभेल, हुकलेली संधी पुन्हा चालून येईल. अपयश, पराभव, नैराश्य हे सारे आता इतिहासजमा होईल.

नव्या व्यवसाय-धंद्याची योजना आकार घेऊ लागेल, अनेकांचे हार्दिक सहकार्य लाभू शकेल. या वेळी कुटुंबियांच्या मुलाबाळांच्या जीवनात अनंत प्रगतीच्या घटना भराभर घडून यायला लागतील. थोडक्यात, आपल्या जीवनातील हा एक चिर-स्मरणीय काल समजला जाईल.

दि. २४ ते २६ या कालावर सारे लक्ष केंद्रित करा.

**सिंह :–** आठव्या शनीचा काही काल विसर पडावा इतका हा चांगला काल तुमच्या वाटयास आलेला आहे. पंचमातील र. शु. बु. तुम्हांला कोणत्याही गोष्टीची विवंचना जाणवू नये म्हणून प्रयत्नांची शिकस्त करीत राहतील.

वैचारिक पातळी बरीच उंचावेल, पुढाऱ्यांचे सहकार्य कोणत्याही क्षणी लाभेल, व्यवसाय क्षेत्र खूपच विस्तारेल.

प्रत्यक्ष लाभ जरी फारसा झाला नाही तरी प्रतिष्ठा लाख मोलाची लाभेल, प्रज्ञा विकसेल. राजदरबारात सर्वोच्च मानाचे स्थान लाभेल. जवळपासचे प्रवास घडतील. प्रगतीच्या नव्या वाटा दृष्टिक्षेपात यायला लागतील. आपल्यावरील जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पाडल्यामुळे तुमचे महत्त्व आणि माहात्म्य या वेळी हजार पटीने वाढेल. प्रामुख्याने यांत्रिक, विद्युत् क्षेत्रातील व्यावसायिकांना हा अत्युत्तम यशाचा काल जाणवेल.

दि. २७ ते २९ अपेक्षित यशाचा काल.

**कन्या :–** गुरू एकादशात आहे म्हणून ठीक आहे. नाही तर या वेळच्या शनि–मंगळांनी तुम्हांला चांगलेच धारेवर धरले असते.

सूर्य–शुक्रादी ग्रह चौथे असल्यामुळे हा आठवडा काहीसा यथातथाच. या वेळी कोणतेही काम झटपट अपेक्षेप्रमाणे घडून येण्याची शक्यता कमीच. अजूनही काही

आठवडे तरी अडखळत, घडपडत वाटचाल करावी लागणार आहे.

मनामध्ये अनंत विचारांचे काहूर उठेल. चित्तवृत्ती, प्रक्षुब्ध बनू लागतील. भागीदारांची मने क्षुल्लकशा कारणांनी कलुषित बनायला लागतील. एकच एक गुरू अकरावा आहे. या साऱ्या प्रसंगामधून तो तुम्हांला तडीपार करील, असा मला विश्वास वाटतो.

प्रकृती आणि पैसा या दोन्ही दृष्टींनी हे दिवस फारसे चांगले नाहीत.

दि. २८ ते ३० बरीचकामें अपेक्षेप्रमाणे घडावीत.

**तूळ** :– तृतीयांतील सूर्य–शुक्रांनी बाराव्या मंगळाची धार वरीच बोथट केली असल्यामुळे. आता तुमचा प्रगतीचा मार्ग रोखला जाणार नाही. शिवाय गुरु-शनीचे सहकार्य आपणांस सतत मिळत राहणार आहेच.

गेल्या १।।–२ महिन्यांतील सारी स्थगित कामे आता गती घेऊ लागतील आणि त्यामुळे अप्रतिष्ठेचा धोका टळेल. वैचारिक संघर्ष मिटतील. हितशत्रू मागील दाराने पसार होतील.

राजकारणातील तुमचा दबलेला आवाज आता उठेल. सहज टाकलेले पाऊलही आत्म विश्वासात पडायला लागेल.

मंगलकार्ये ठरतील. पैशाचा ओघ अपेक्षेप्रमाणे वाहू लागेल. नोकर चाकरांचे सहकार्य लाभू लागेल. वाहनांची प्रकृती सुधारायला लागेल. व्यवसाय-धंद्याचा व्याप विस्तार बराच वाढू लागेल. मनावरचे दडपण कमी झाल्याने कार्यक्षेत्रात मुक्त संचार सुरू होईल.

दि. २५ ते २८ या काळी अनेक कामे झटपट आखली जातील. ––

**वृश्चिक** :– ग्रहमान अनुकूल असले म्हणजे मनुष्य केवढे अचाट कार्य करू शकतो याचे प्रात्यक्षिक म्हणून या वेळी वृश्चिक राशी व्यक्तींचाच नामनिर्देश करावा लागेल.

प्रजापती लाभस्थानी, एवढी एकटी ग्रहस्थितीही जीवनात दिव्यता प्रकट करावयास समर्थ ठरेल. शिवाय गुरूचे सहकार्य सतत मिळेल ते वेगळेच.

व्यावसायिक क्षेत्रात आवाज उठवाल, तुम्ही जाल तिथे तुमचे सत्कार होऊ लागतील. प्रतिष्ठेची उंची तर इतकी वाढेल की, हिमालयही थिटा वाटावा.

व्यवहार-धंद्याचे अभिनव तंत्र आत्मसात कराल. सामाजिक क्षेत्रांतील मान्यतेचे स्थान संपादू शकाल. राष्ट्रीय कार्यक्रमात सदैव आघाडीवर राहाल.

दि. २८–२९–३० वर सारे लक्ष केंद्रित करायला हवे.

**धनू**– तुमची चतुर्थ–दशमस्थाने शनि-मंगळांनी व्यापलेली आहेत. यामुळे काही काल गोंधळून गेल्यासारखे वाटेलही पण रवि-शुक्रांच्या सहानुभूतीने त्यातूनही आपण आपले व्यक्तिमत्त्व निष्कलंक राखू शकाल. हे दिवस फारच धावपळीचे व

घाईगर्दीचे जाणवतील. स्वीकारलेल्या फार मोठ्या जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी जिवाचे रान करावे लागेल.

स्थावराच्या राहत्या जागेच्या समस्या आता सुटण्याची शक्यता दिसू लागेल वाहनांची विवंचना मिटेल.

यांत्रिक, रासायनिक क्षेत्रातील व्यक्तींना या काली, अपेक्षेबाहेर लाभ उठवता येईल. प्रगतीचे नवे क्षेत्र दृष्टिक्षेपात यायला लागेल. परिश्रमाने का होईना घव-घवीत यश पदरी पडावे.

दि. २६ ते २८ या काली अनेक संस्मरणीय घटना घडाव्यात.

**मकर**– व्ययस्थानच्या रवि-शुक्राची दखल घ्यायची गरज मासूच नये एवढे फार मोठे सहकार्य भाग्यस्थ हर्षलमुळे आपणास लाभणार आहे.

अभिनव–अनन्यसाधारण असे कार्य आपल्या हातून घडावे, अशीच या वेळच्या ग्रहस्थितीची इच्छा दिसते. कर्तृत्वाला दाही दिशा मोकळ्या दिसतील. यांत्रिक–तांत्रिक क्षेत्रातील व्यक्तींना तर हेवा करण्यासारखे यश लाभते. साहित्य संमेलने गाजवाल, ऐतिहासिक स्थलांना भेटी द्याल, अगदीच नवे, अद्ययावत असे कार्यक्षेत्र निर्माण कराल. तुम्हांपैकी काहींना परदेशगमनही घडावे.

दि. २५ ते २७ हा काल अनेक लाभदायक घटनांनी भरलेला जाणवेल.

**कुंभ**– एकादशातील रवी, शुक्र, बुध ही त्रिग्रही म्हणजे निसर्गाचे वरदानच. अपेक्षा साफल्याचा योग तो हाच. एवढी समर्थ ग्रहरचना पाठीशी उभी असल्यावर शनि-मंगळाबद्दल डर कशाला ?

या कालात अनेकांचे हार्दिक सहकार्य लाभेल, नवे स्नेहसंबंध जोडले जातील, न होणारे लाभ होतील, धनोत्पादनाचे नवेनवे मार्ग दृष्टिक्षेपात यायला लागतील. या वेळचा गुरु-शनी योग आपणांस नवे कार्यक्षेत्र मिळवून देईल.

शैक्षणिक क्षेत्रात, संशोधन विभागात काही असाधारण कार्य हातून घडावे अशीच इच्छा दिसते.

थोडेफार जपायला हवे. आरोग्याबद्दल दि. २७ ते २९ या कालाचे महत्त्व प्रकर्षाने जाणवेल.

**मीन**– या वेळी आपल्या वाट्याला काही आत्यंतिक इष्ट तर काही खडतर अनिष्ट योगही आलेले आहेत. ते निश्चित यशलाभ देतील, पण अविश्रांत परिश्रमा-नंतर. सामाजिक, राजकीय प्रतिष्ठा मिळवून देतील पण विरोधकांशी झगडून थोडाफार ताण बसेल. प्रकृती मनस्थितीवरही. भागीदारीचे व्यवहार खूपच ताणले जातील पण ते तुटू नयेत याबद्दल दक्षता बाळगा.

नवे साहस करण्याचा हा काल नव्हे. प्रत्येक गोष्ट दहा वेळा विचार करून करा. दूरच्या प्रवासास उद्युक्त होऊ नका. दि. २८ ते ३० या कालात अनेक महत्त्वाचे लाभ उठवू शकाल. ●

# आई

# भस्मासुराचा उदयास्त

रा. म. शास्त्री

मूल्य रुपये पंचवीस


राजहंस प्रकाशन
४१९ नारायण, पुणे २

MANOOS (Weekly) । 40 Paise । Regd. No. M H–649

प्रगतिपथावरील पुढचे पाऊल...

स्वस्तिक

चप्पल्स



स्वस्तिक रबर प्रॉडक्ट्स लिमिटेड, खडकी, पुणें ३.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९ नारायण पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. **श्री. ग. माजगावकर**